सोनार बांगला : २
डॉ. कमाल हुसेन
आणि डॉ. हमिदा हुसेन
– न्या. हेमंत गोखले

संस्थापक
साने गुरुजी
साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
३० जानेवारी २०२१
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ४४)

# शेतकरी आंदोलन :
# कोणाच्या खांद्यावर कोणाची बंदुक?

रमेश जाधव





MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
MKCL
॥ ज्ञानदीप लावू जगी ॥
www.mkcl.org
जर साथ असेल MS-CIT ची, तर खात्री उज्वल भविष्याची !
आता MS-CIT केंद्रात जाऊन शिका
किंवा घरून आपल्या कंप्यूटरवर शिका
किंवा आपल्या स्मार्टफोनवरून शिका
MS-CIT करा आणि जॉब रेडी व्हा !
www.mkcl.org/join
या लिंकवरून आजच प्रवेश घ्या
किंवा नजिकच्या MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
३० जानेवारी २०२१
वर्ष ७३ / अंक – २४
संपादक :
विनोद शिरसाठ
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल
मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 /**
**Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./ चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र.**60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रम

४ ...संपादकीय
**७२ व्या प्रजासत्ताकदिनाच्या पार्श्वभूमीवर**

७ **शेतकरी आंदोलन : कोणाच्या खांद्यावर कोणाची बंदूक?**
...रमेश जाधव

१३ **डॉ. कमाल हुसेन आणि डॉ. हमिदा हुसेन**
...न्या. हेमंत गोखले

१९ **आक्रसणारी लोकशाही : विश्लेषणाच्या दोन दिशा**
...सुहास पळशीकर

२५ **'अ प्रॉमिस्ड लॅन्ड' या पुस्तकाच्या निमित्ताने संवाद**
...बराक ओबामा

३२ **दलितांचे दु:ख व अश्रू मध्यमवर्गीय भारतीयांचे होत नाहीत**
...सूरज येंगडे

३९ **गुमनाम है कोई...**
...संजीवनी खेर

## संपादकीय

# ७२ व्या प्रजासत्ताकदिनाच्या पार्श्वभूमीवर

साधनाच्या मागील दोन व प्रस्तुत एक अशा तीन अंकांमध्ये विशेष महत्त्वाचे असे तिघांचे लेखन प्रत्येकी तीन भागांत प्रसिद्ध केले आहे. बराक ओबामा व सूरज येंगडे यांच्या मुलाखती आणि सुहास पळशीकर यांचे भाषण. या तिघांचेही हे दीर्घ लेखन प्रत्येकी तीन भागांत छापावे लागले ते केवळ पानांची मर्यादा व अधिकाधिक वाचकांकडून वाचले जावे म्हणून. परंतु यातील प्रत्येकाचे तिन्ही भाग एकत्र वाचायला हवेत, किंबहुना तिघांचेही लेखन एकाच वेळी वाचायला हवे. तिघांच्याही दृष्टिकोनात थोडासा फरक आहे, मात्र तिघांचेही विवेचन व विश्लेषण परस्परांना पूरक म्हणता येईल असे आहे. असे व इतके की, या तिघांच्या लेखनाचा एक विशेष अंक होऊ शकला असता. अर्थातच हे लेखन जास्तीचे गंभीर-वैचारिक असल्याने कोणत्याही चांगल्या वाचकांना काहीसे 'जड' वाटणार आहे. पण त्यांचा विषय आणि त्यातील आशयाचा रोख, कोणत्याही राष्ट्राच्या लोकशाही वाटचालीसंदर्भात चिंतनीय म्हणावा असा आहे. अधिक महत्त्वाचे म्हणजे भारतीय प्रजासत्ताक ७२ व्या वर्षात पदार्पण करीत असताना तो आशय भारतीय नागरिकांना अंतर्मुख करायला लावणारा आहे.

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी आपल्या आठ वर्षांच्या कारकिर्दीचे सिंहावलोकन करणारे तीन खंड लिहिण्याचा संकल्प केला आहे, त्यातील पहिला खंड गेल्या महिन्यात 'द प्रॉमिस्ड लँड' या नावाने प्रकाशित झाला आहे. त्या पुस्तकाच्या निमित्ताने 'द अटलांटिक' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मुलाखत मोठा परिप्रेक्ष्य वाचकांच्या समोर उभा करते. ओबामा यांच्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झालेल्या डोनाल्ड ट्रम्प यांनी मागील चार वर्षांत जे कारनामे केले, त्या पार्श्वभूमीवर ही मुलाखत घेण्यात आली आहे. वस्तुत: आफ्रो-अमेरिकन वंशाचे ओबामा राष्ट्राध्यक्ष म्हणून आठ वर्षे राहिल्यानंतर अमेरिकेने एका नव्या पर्वात प्रवेश केला आहे, असे मानले जात होते. मात्र त्यांच्यानंतर ट्रम्प यांना अध्यक्षपदावर निवडले जाणे हा खूपच मोठा धक्का होता, अमेरिकेसाठी आणि जगासाठीही. त्याहून मोठी कमाल अशी की, नंतरच्या चार वर्षांत ट्रम्प यांनी केलेले वर्तन व व्यवहार अनेकानेक प्रकारचे उल्लंघन करणारे होते आणि तरीही अमेरिकन लोकशाही ते सर्व सहन करीत राहिली. ट्रम्प यांची अरेरावी शेवटपर्यंत इतकी राहिली की, जगाच्या इतिहासात कोणत्याही लोकशाही राष्ट्रातील राज्यकर्त्यालाही लाजवणारी होती. 'निवडणुकीचे निकाल विरोधात गेले तर ते मी मानणार नाही', अशी उघड धमकी त्यांनी निवडणुकीच्या आधीच दोन-चार महिने द्यायला सुरुवात केली. नंतर 'निवडणुकीत माझा पराभव झालेलाच नाही' असे ते शेवटपर्यंत म्हणत राहिले. त्यानंतर अमेरिकन संसदेवर हल्ला करण्यासाठीची चिथावणी त्यांनी आपल्या समर्थकांना दिली. अखेरीस, 'नवे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांच्या



शपथविधीला मी हजर राहणार नाही', असे बेधडकपणे सांगून त्यांनी आपला शब्द खरा करून दाखवला. हे सारे एकापेक्षा एक निर्लज्ज प्रकार 'आता आणखी किती घसरण बाकी राहिली' असे वाटायला लावणारे होते. सव्वादोनशे वर्षांचा लोकशाही इतिहास असणाऱ्या आणि मागील पाऊणशे वर्षे जगातील सर्वांत मोठी महासत्ता असणाऱ्या अमेरिकेत हे घडणे, हे कमालीचे आश्चर्यजनक होते. जॉर्ज बुश (ज्युनिअर) यांनी खूप अरेरावी केली म्हणून, 'ओबामा का निवडून आले' याचे कारण 'ते बुश नाहीत म्हणून' असे सर्वत्र मानले गेले होते. मात्र आता बायडेन का निवडून आलेत, याचे कारण सांगताना 'ते ट्रम्प नाहीत म्हणून' असा सूर कुठेही ऐकिवात नाही. इतके ट्रम्प यांनी अति केले आहे आणि तरीही बायडेन काठावरचे बहुमत घेऊन आले आहेत.

अशा पार्श्वभूमीवर ट्रम्प व बायडेन हे केवळ प्रतिनिधी आहेत, त्या-त्या प्रकारच्या जनमानसाचे. म्हणजे खरा बिघाड झालेला आहे तो जनमानसात आणि म्हणून एका मर्यादेनंतर ट्रम्पसारख्यांना दोष देता येत नाही. त्यांना निवडून देणाऱ्या व दीर्घ काळ चालवून घेणाऱ्या जनतेलाच त्यासाठी दोषी धरावे लागेल. पण मुख्य मुद्दा उपस्थित होतो तो असा की, हा प्रकार जगातील सर्वाधिक बलाढ्य लोकशाही राष्ट्राबाबत होत असेल तर ही प्रक्रिया किती दीर्घकालीन असेल आणि अन्य राष्ट्रांच्याही अंतरंगात किती मुरलेली असेल! ही प्रक्रिया अद्याप कोणालाही उलगडून दाखवता आलेली नाही आणि बराक ओबामा यांनीही तशी कबुली या मुलाखतीत दिली आहे. ओबामा यांनी आपल्या मुलाखतीत मांडलेली कित्येक निरीक्षणे चकित करणारी आहेत. मात्र त्यातही सर्वाधिक चकित करणारे आहे त्यांच्या मुलाखतीतील शेवटच्या प्रश्नाचे उत्तर! ते म्हणतात, 'शाळा-कॉलेजात असताना दिसणारी गटबाजी, दादागिरी, उथळपणा, अन्याय व संधी नाकारली जाणे हे सर्व प्रकार आपण मोठे झाल्यावर अनुभवाला येणार नाहीत असे आपल्याला वाटत असते. पण तुम्ही राज्य विधिमंडळात जाता, तिथेदेखील मूर्खपणा व क्षुद्रपणा पहायला मिळतो. मग तुम्ही संसदेत जाता आणि जी-२० शिखर परिषदेलाही, पण तिथेही तुमच्या लक्षात येते की, आपण शाळा-कॉलेजच्या वातावरणातच आहोत.' ओबामांचे हे निरीक्षण व भाष्य मर्मभेदी आहे. आठ वर्षे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून वावरलेल्या व आख्खे जग पालथे घातलेल्या

नेत्याचे हे मत आहे, त्यामुळे त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. तरीही ओबामा आशावादी आहेत. त्यासंदर्भात 'काळाचा किती मोठा पट तुम्ही स्वत:समोर ठेवता, यावर तुम्ही किती आशावादी किंवा निराशावादी आहात हे ठरते,' हे त्यांचे विधान कोटेबल कोट म्हणावे असे आहे.

डोनाल्ड ट्रम्प हे ज्या प्रकारच्या मूल्यांचा पुरस्कार करतात, त्यात धर्म, वंश, अर्थ, राष्ट्र यांचे वर्चस्व या ना त्या प्रकारे गृहीत धरलेले आहे. आणि ते वर्चस्व राजकारणाच्या माध्यमातून प्रस्थापित करता येते हे उघड आहे. या पार्श्वभूमीवर सूरज येंगडे या तरुण अभ्यासकाची मुलाखत लक्ष्यवेधी आहे. नांदेड ते हॉर्वर्ड व्हाया इंग्लंड व दक्षिण आफ्रिका, असा वेगवान प्रवास त्याने मागील केवळ दहा वर्षांत केला आहे. जातीसंस्था हे केंद्र मानून प्रस्थापित व्यवस्थांना त्यांनी खडे सवाल विचारले आहेत, त्यांची उत्तरे देणे भल्याभल्यांना अडचणीचे वाटणारे आहे. जगाचा खूप मोठा पट समोर असणाऱ्या सूरजने या मुलाखतीत प्रामुख्याने भारतीय समाजजीवन समोर ठेवले आहे. मात्र त्याच्या विवेचन-विश्लेषणातही काळाचा खूप मोठा पट अंतर्भूत आहे. त्यामुळे ओबामा यांनी आपल्या मुलाखतीत ज्या विषयाला बाजूला ठेवले आहे किंवा ओझरता स्पर्श केला आहे, त्या विषयाचे दालन उघडणारी व त्यातील अन्यायग्रस्त परिस्थितीकडे लक्ष वेधणारी सूरजची मुलाखत आहे.

सुहास पळशीकर यांचे भाषण वरील दोघांच्या मुलाखतींना भारतीय संदर्भात पुढे घेऊन जाणारे आहे. राज्यशास्त्राचे अभ्यासक असलेल्या पळशीकरांनी तो विषय लोकशाहीच्या भोवती फिरणारा आहे असे सूचित केले आहे. आणि म्हणून 'लोकशाहीची वाटचाल : जागतिक आव्हानाचा क्षण' हा त्यांच्या भाषणाचा विषय अधिक गांभीर्याने घ्यायला हवा. जागतिक स्तरावर लोकशाहीसाठी काय स्वरूपाची आव्हाने आहेत, हे सांगताना 'आगामी दशक लोकशाहीच्या ओहोटीचे असणार आहे' असे भाकित त्यांनी केले आहे. आगामी काळात 'लोकशाहीबद्दल कोणीही वाईट बोलणार नाही, पण लोकशाहीचा अर्थ बदलून ती आतून पोखरण्याचे प्रयत्न होतील' ही भीती व्यक्त केली आहे. मात्र हे रोखण्यासाठी कोणतेही ठोस उत्तर दिसत नाही, हेही त्यांनी स्पष्टच नोंदवले आहे.

वरील तिघांच्याही लेखनातील मध्यवर्ती सूर 'एकूण जगाचे मानस चिंताजनक आहे' असाच आहे. त्यामुळे, अमृतमहोत्सवाच्या जवळ आलेले भारतीय प्रजासत्ताक राखण्यासाठी व अधिकाधिक उन्नत करण्यासाठी कधी नव्हे इतके सावध होण्याची गरज आता निर्माण झाली आहे. म्हणजे सव्वादोनशे वर्षांच्या लोकशाहीनंतरही बलाढ्य अमेरिकेची अशी अवस्था होत असेल, तर पाऊणशेच्या उंबरठ्यावरील भारतीय लोकशाहीला भविष्यात किती तरी गंभीर धोक्याचा सामना करावा लागू शकतो, असाच या सर्व विवेचनाचा सांगावा आहे.

0

## छोटा पण महत्त्वाचा बदल...!

प्रिय वाचकहो,

७२ वर्षांची परंपरा असलेल्या साधना साप्ताहिकाचे अंक वर्गणीदार वाचकांना दर आठवड्याला पोस्टामार्फत रवाना केले जातात. प्रत्येक सोमवारी अंक छापायला जाणे, गुरुवारी पोस्टात टाकणे, शनिवारी वाचकांच्या हातात पडणे आणि त्या अंकावर पुढील शनिवारची तारीख असणे, असे नियोजन मागील बारा वर्षांपासून होते. या अंकापासून ते नियोजन थोडे बदलत आहोत. प्रत्येक शुक्रवारी अंक छापायला जाणे, सोमवारी पोस्टात टाकणे, बुधवारी वाचकांच्या हातात पडणे आणि त्या अंकावर लगेच येणाऱ्या शनिवारची तारीख असणे, असे नियोजन यापुढे राहील. संपादकीय विभागाची गैरसोय कमी करणे आणि हातात आलेल्या अंकांवरील तारखा पाहून काही लेखक व वाचक यांचा होणारा गोंधळ संपुष्टात आणणे, असे दोन हेतू समोर ठेवून हा छोटा पण महत्त्वाचा बदल केलेला आहे.

**....संपादक**

रमेश जाधव

# शेतकरी आंदोलन : कोणाच्या खांद्यावर कोणाची बंदूक?

सर्वोच्च न्यायालयाने आपली प्रतिष्ठा पणाला लावून शेतकरी आंदोलनात मध्यस्थी करण्याची भूमिका घेतली खरी, परंतु न्यायालयीन हस्तक्षेपाच्या कृतीचा नेमका अर्थ स्पष्ट होऊ लागल्यावर तर्क-वितर्कांचे आग्यामोहोळ उठले. न्यायालयाने चाकोरी सोडून जी सक्रियता दाखवली आणि नवा (घातक) पायंडा पाडणारी भूमिका घेतली, त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. संसदेने संमत केलेल्या कृषी कायद्यांच्या 'अंमलबजावणी'ला तात्पुरती स्थगिती देण्याचा ऐतिहासिक आदेश न्यायालयाने दिला. तसेच आंदोलक व सरकार यांच्यात मध्यस्थी करण्यासाठी तज्ज्ञ समितीची स्थापना केली. त्याआधी न्यायालयाने सरकारच्या कारभाराबद्दल स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त करून खडे बोल सुनावले होते. या सगळ्या घडामोडी पाहता, सर्वोच्च न्यायालयाने मोदी सरकारला चांगलाच दणका दिल्याचा सूर उमटला. कडाक्याची थंडी आणि अवकाळी पावसाला न जुमानता दिल्लीच्या सीमेवर ठाण मांडून बसलेल्या आंदोलकांचा हा नैतिक विजय असल्याचे चित्र रंगवले गेले; परंतु असे मानणे ही दिशाभूल ठरेल. घटना-घडामोडींची संगती लावली आणि बिट्‌विन दि लाइन्स व गाळलेल्या जागा वाचता आल्या, तर न्यायालयाच्या तडफदार भूमिकेमुळे सरकारची गोची नव्हे तर सुटकाच झाल्याचे दिसून येईल. केंद्र सरकारने शेतकरी आंदोलनाच्या गुंत्यात अडकलेली आपली मान अलगड सोडवून घेण्यासाठी आणि आपली आडमुठी भूमिका पुढे रेटण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या खांद्यावर बंदूक ठेवून शेतकऱ्यांवर निशाणा साधला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात घटनात्मक बाबींवर निवाडा करण्यापेक्षा लवादाची (मध्यस्थीची) भूमिका पार पाडण्याचा पवित्रा घेतला आहे. न्यायपालिका आणि कार्यपालिका (सरकार, संसद) यांच्यातील अधिकारांच्या विभागणीचे हे उल्लंघन असल्याचे मानले जात आहे. कारण

सरकार आणि आंदोलक या दोघांनीही एकेक पाऊल मागे येण्याची आवश्यकता आहे. कृषी सुधारणा व्हायलाच हव्यात, पण त्यासाठी वादग्रस्त कृषी कायद्यांतील गंभीर त्रुटी दूर केल्या पाहिजेत. कॉर्पोरेट्सची मक्तेदारी निर्माण होऊ नये यासाठी खबरदारी घेणे, सध्याची बाजार समित्यांची रचना मोडीत न काढता त्यांना बळकट करणे, बाजारात स्पर्धा निर्माण करणे, लहान शेतकऱ्यांना संरक्षण देणे, शेतकऱ्यांची विक्री व्यवस्थेतील जोखीम कमी करण्यासाठी आणि त्यांना उत्पन्न सुरक्षेची हमी मिळण्यासाठी संस्थात्मक रचना उभी करणे- या मुद्द्यांवर आता चर्चा पुढे जायला हवी. सरकारने अहंकार बाजूला ठेवत आंदोलनकर्त्या संघटनांचे आक्षेप व संभाव्य धोक्यांचे निराकरण करून कायद्यांत फेरबदल करण्याची किंवा नवे कायदे आणण्याची लवचिकता दाखवावी.

धोरणात्मक निर्णय घेणे हे काही न्यायालयाचे काम नाही, तो कार्यपालिकेचा अधिकार आहे. संसदेने मंजूर केलेल्या कायद्यांची घटनात्मक वैधता तपासणे, घटनात्मक तरतुदींशी ते सुसंगत आहेत की नाही याचा निर्णय घेणे, कायदे करताना विहित वैधानिक प्रक्रियेचे पालन झाले आहे की नाही हे पाहणे आदी गोष्टी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येतात. हे कायदे वैध आहेत की नाहीत, हा मुद्दा अजून न्यायालयाने विचारात घेतलेला नाही. पुढील सुनावणींत त्यावर खल होण्याची शक्यता आहे. घटनात्मक मुद्यांवर सुनावणी न घेता न्यायालयाने कायद्यांच्या अंमलबजावणीला थेट स्थगिती देऊन टाकली. कायदे चांगले की वाईट, हा वेगळा मुद्दा आहे; परंतु संसदेने संमत केलेल्या कायद्यांना अशा प्रकारे स्थगिती देऊन न्यायालयाने राजकीय व्यवस्थेच्या अधिकारक्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे मानले जात आहे.

अर्थात संसदेने केलेले कायदे स्थगित किंवा रद्दबातल करण्याचा विस्तृत अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे, परंतु त्यासाठी सबळ कारणे असावी लागतात. संसदेने मंजूर केलेला कायदा घटनेच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत आहे, या कायद्यामुळे मूलभूत अधिकारांचे हनन होते, विहित कायदेशीर प्रक्रिया पार पडली गेली नाही, असे न्यायालयाचे प्रथमदर्शनी मत झाले; तर न्यायालय त्या कायद्याला स्थगिती देऊन घटनात्मक मुद्यांवर युक्तिवाद ऐकून अंतिम निकाल देत असते. परंतु कृषी कायद्यांच्या अंमलबजावणीला स्थगिती देताना न्यायालयाने असे कारण दिलेले नाही. दुखावलेल्या शेतकऱ्यांमधील कटुता कमी होऊन शेतकरी व सरकार यांच्यात चर्चेसाठी पोषक वातावरण तयार व्हावे, या हेतूने स्थगिती देत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाची ही भावना उदात्त असेल, परंतु स्थगितीसाठीचे ते कारण कसे काय ठरू शकते? अर्थात न्यायालयाने कायद्यांना नव्हे तर कायद्यांच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली आहे. (नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या विरोधात गेल्या वर्षी दिल्लीतील शाहीन बागेसह देशात ठिकठिकाणी आंदोलन सुरू होते. त्या वेळी मात्र न्यायालयाने कायद्याला स्थगिती दिलेली नव्हती.)

संसदेने संमत केलेला कायदा बेकायदा असल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न होत असेल तरच तो कायदा स्थगित करता येतो, असे मत सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती दीपक गुप्ता यांनी व्यक्त केले. कृषी कायद्यांना स्थगिती देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे दूरगामी परिणाम होतील; विविध उच्च न्यायालयांमध्ये सभागृहांनी केलेल्या कायद्यांना पुरेसे कारण न देता स्थगित करण्याचा पायंडा पडेल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

**कायदेशीर मुद्दे**

मुळात दिल्लीच्या सीमेवर आंदोलन करणाऱ्या शेतकरी संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितलेली नव्हती. याचिकाकर्त्यांमध्ये इतर छोट्या-मोठ्या संघटनांचा समावेश आहे. सर्वोच्च न्यायालयात कृषी कायद्यांबद्दल तीन प्रकारच्या याचिका दाखल झालेल्या आहेत. पहिला प्रकार आहे तो या कायद्यांच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांचा. दुसरा प्रकार आहे तो हे कायदे शेतकऱ्यांचे फायद्याचे असल्याचे म्हणणे मांडणाऱ्या याचिकांचा आणि तिसरा प्रकार आहे तो शेतकऱ्यांच्या आंदोलनावर आक्षेप घेणाऱ्या याचिकेचा. शेतकऱ्यांच्या गर्दीमुळे दिल्लीत कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू शकतो, तसेच आंदोलकांनी रस्ते बंद केल्यामुळे जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा विस्कळीत झाला असून नागरिकांच्या मुक्त संचारासही अडथळा येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आंदोलन करण्यापासून रोखावे किंवा त्यांना दुसरीकडे हलवावे, अशी मागणी करणारी याचिका विधी शाखेच्या एका विद्यार्थ्याने केली. सर्वोच्च न्यायालयाने शेतकऱ्यांना अहिंसक आंदोलन करण्याचा अधिकार असल्याच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला आहे. आता उरलेला महत्त्वाचा मुद्दा आहे तो या कायद्यांच्या घटनात्मक वैधतेचा.

घटनात्मक वैधतेच्या बाबतीत दोन प्रमुख मुद्दे आहेत. सरकारने विहित प्रक्रिया पार न पाडल्यामुळे हे कायदे बेकायदा ठरतात, असा प्रमुख दावा आहे. दुसरा आक्षेप आहे तो राज्यांच्या अधिकारक्षेत्रात असलेल्या विषयावर केंद्र सरकारने कायदा केल्याचा. सरकारने कायदे संमत करताना सांसदीय प्रथा व संकेतांना हरताळ फासला, घाई केली, चर्चेला पुरेसा वेळ दिला नाही वगैरे आक्षेपांत तथ्य असले तरी विधेयके संमत होण्याची जी वैधानिक प्रक्रिया आहे, तिचा भंग झाल्याचे दिसत नाही, असे या क्षेत्रातील अभ्यासकांचे मत आहे. सदनातील कार्यवाही हा लोकसभेचे अध्यक्ष आणि राज्यसभेचे सभापती यांच्या अखत्यारीतील विषय आहे; त्यामुळे न्यायालय त्यात हस्तक्षेप करणार नाही, असे ते म्हणतात. परंतु राज्यसभेत मतविभागणी न घेता आवाजी मतदानाने हे कायदे संमत करण्यात आले, त्यामुळे विहित प्रक्रियेचे उल्लंघन झाल्याचे काही तज्ज्ञांचे

म्हणणे आहे. दुसरा मुद्दा आहे तो अधिकारक्षेत्राचा. शेती हा राज्यसूचीतला विषय आहे. परंतु पं.जवाहरलाल नेहरू पंतप्रधान असताना १९५४ मध्ये तिसरी घटनादुरुस्ती करून शेतीमालाचा व्यापार हा विषय राज्यसूचीतून काढून समवर्ती सूचीत समाविष्ट करण्यात आला. समवर्ती सूचीतल्या विषयावर राज्य व केंद्र सरकार या दोघांनीही कायदा केल्यास राज्याचा कायदा आपोआप रद्द होतो. परंतु सगळाच कृषी व्यापार केंद्राच्या अखत्यारित येतो का, याबद्दल तज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत. तसेच याचिकाकर्त्यांनी तिसऱ्या घटनादुरुस्तीलाच आव्हान दिले आहे. घटनात्मक वैधतेच्या मुद्यावर कृषी कायद्यांना घेतलेले आक्षेप न्यायालयात टिकणार नाहीत, असा अनेक अभ्यासकांचा अंदाज आहे; तर या आक्षेपांमध्ये सबळ न्यायिक मुद्दे आहेत, असे काही तज्ज्ञांचे मत आहे.

न्यायालयात केवळ या कायदेशीर बाबींचीच चिकित्सा होईल, धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार तर केंद्र सरकारकडेच आहे. आंदोलनकर्त्या शेतकरी संघटनांचा झगडा धोरणात्मक मुद्याशी संबंधित आहे. हे कायदे घटनात्मक दृष्ट्या वैध असतीलही, परंतु ते शेतकऱ्यांचे हित साधणारे नाहीत, या कायद्यांमुळे बड्या भांडवलदारांच्या एकाधिकारशाहीला आमंत्रण मिळून शेतकरी देशोधडीस लागतील; त्यामुळे हे कायदे रद्दबातल करावेत, अशी आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांची भूमिका आहे. या धोरणात्मक मुद्यावर निर्णय देणे न्यायालयाच्या कार्यकक्षेत बसत नाही. परंतु कृषी कायदे, शेतकरी आंदोलन या विषयांचा न्यायालयातच निकाल लागावा, अशी केंद्र सरकारची सुरुवातीपासूनच खटपट आहे. संसदीय लोकशाहीच्या चौकटीत चर्चेतून मार्ग काढण्याऐवजी सरकार न्यायालयाकडे बोट दाखवून आपली सुटका करून घेऊ पाहत आहे. न्यायालयही घटनात्मक वैधतेच्या मुद्याची तड लावण्याऐवजी आंदोलनात मध्यस्थी करण्यासाठी प्रयत्न करत आहे. या प्रयत्नाचाच एक भाग म्हणजे न्यायालयाने नेमलेली तज्ज्ञ समिती.

**समितीचे कवित्व**

शेतकरी आंदोलनाची कोंडी फोडण्यासाठी सरकार आणि शेतकरी संघटना यांच्याशी बोलून, वाटाघाटी करून चर्चेला अनुकूल वातावरण निर्माण व्हावे; जेणेकरून शेतकरी संघटनांना बोलणी करण्यासाठी भरवसा आणि आत्मविश्वास वाटेल या हेतूने तज्ज्ञांची समिती नेमत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या समितीने आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे ऐकून घ्यावे, सरकारचे मत जाणून घ्यावे आणि दोन महिन्यांत आपल्या शिफारशी न्यायालयाला सादर कराव्यात, असे आदेशात म्हटले आहे. ही समिती कोणाला शिक्षा करणार नाही की कोणता निर्णय घेणार नाही, ती केवळ न्यायालयाला अहवाल सादर करेल.

ही समिती केवळ न्यायालयाला मदत करण्यासाठी आहे,



की तोडगा काढण्यासाठी आहे, या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर मिळत नाही. आम्ही अर्थशास्त्र किंवा शेती या विषयातले तज्ज्ञ नाही, असे वक्तव्य सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी सुनावणीदरम्यान एकदा केले. न्यायालयापुढे अनेक तांत्रिक विषयांतील प्रकरणे येत असतात. न्यायाधीश हे काही त्या तांत्रिक विषयांतले तज्ज्ञ नसतात. (आणि तशी अपेक्षाही नसते.) अशा वेळी न्यायालयाने त्या विषयांतील तज्ज्ञांची मदत घेणे अपेक्षित असते. त्यानुसार शेती व कृषी अर्थशास्त्राशी संबंधित गुंतागुंतीच्या विषयांतले बारकावे जाणून घेण्यासाठी आणि न्यायालयानेच उल्लेख केल्याप्रमाणे जमिनीवरचे वास्तव (ग्राउंड पिक्चर) स्पष्ट होण्यासाठी तज्ज्ञांची समिती न्यायालयाने नेमली असेल, तर ते स्वागतार्ह आहे. या विषयाशी सर्वसंबंधित घटकांशी बोलून समितीने आपले आकलन न्यायालयाला सादर केले की, हा विषय संपेल. परंतु न्यायालयानेच या समितीकडून मध्यस्थाची भूमिका बजावण्याचीही अपेक्षा व्यक्त केली आहे. दोन पक्षांमध्ये मध्यस्थी करायची असेल तर दोन्ही बाजूंना मान्य होणारी, दोन्ही बाजूंवर प्रभाव टाकू शकणारी, दोन्ही बाजू ज्यांचा आदर करतील, दोन्ही बाजू विश्वासाने आपले म्हणणे ज्यांच्यापुढे मांडू शकतील अशी नावे मध्यस्थ समितीमध्ये असणे, ही पूर्वअट ठरते. न्यायालयाने नेमलेल्या समितीमध्ये भारतीय किसान युनियन व अखिल भारतीय किसान समन्वय समितीचे अध्यक्ष भूपिंदरसिंह मान, कृषी अर्थतज्ज्ञ व इंटरनॅशनल फूड पॉलिसी रिसर्च इन्सिट्यूटचे दक्षिण आशिया संचालक डॉ.प्रमोदकुमार जोशी, कृषी अर्थतज्ज्ञ व केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ.अशोक गुलाटी आणि शरद जोशीप्रणीत शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अनिल घनवट यांचा समावेश आहे. या चारही सदस्यांची भूमिका कृषी कायद्यांचे समर्थन करण्याचीच राहिली आहे. त्यामुळे ही समिती सरकारधार्जिणी असल्याचा आरोप होत आहे. तसेच शेतकऱ्यांची दिशाभूल करण्यात आल्यामुळे ते कायद्यांना विरोध करत असल्याचे मतप्रदर्शन काही सदस्यांनी यापूर्वीच केलेले आहे. अशा स्थितीत तक्रारदार शेतकरी त्यांच्याजवळ विश्वासाने आपले गाऱ्हाणे मांडण्याची शक्यताच संपुष्टात येते.

अर्थात या चारही सदस्यांनी आपापल्या क्षेत्रात हयात घालवून मौलिक योगदान दिलेले आहे. त्यामुळे त्यांचा अधिक्षेप करणे योग्य नाही, परंतु कृषी कायद्यांबद्दल त्यांची भूमिका जगजाहीर आहे. मान व घनवट हे दोघेही शेतकरी संघटनेचे संस्थापक-अध्यक्ष शरद जोशी यांच्या अर्थवादी शेतकरी चळवळीशी नाळ सांगणारे आहेत. मान हे राज्यसभेचे माजी खासदार आहेत. आता त्यांचा प्रभाव ओसरला असला तरी एके काळी ते पंजाबमधील प्रमुख शेतकरी नेते होते. ते कृषी बाजारसुधारणांचे समर्थक आहेत. त्यांनी केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांची शिष्टमंडळासह भेट घेऊन कृषी कायद्यांची- काही सुधारणा करून- अंमलबजावणी करण्याची मागणी केली होती. डॉ.जोशी यांनी कृषी कायदे पातळ करणारा कोणताही बदल भारतीय शेतीक्षेत्राला जागतिक पातळीवर उपलब्ध होत असलेल्या संधींचा फायदा घेण्यापासून रोखेल, असा इशारा दिलेला होता. तसेच शेतीमालाचा तुटवडा असताना आणलेली किमान आधारभूत किमतीची व्यवस्था अतिरिक्त उत्पादनाच्या काळात गैरलागू झाल्याचेही त्यांचे मत आहे. घनवट प्रतिनिधित्व करत असलेल्या शेतकरी संघटनेची ताकद आता फारशी उरलेली नाही. कृषी बाजारव्यवस्था खुली करण्याची गरज घनवट सातत्याने मांडत आले असून कृषी कायदे रद्द करू नयेत तर त्यात काही सुधारणा कराव्यात, अशी त्यांची भूमिका आहे. अर्थात शेतकरी संघटनेचे काही नेते शरद जोशींच्या नावाचा जप करत पोथीवादी भूमिका घेऊन दिल्लीतील आंदोलक शेतकऱ्यांवर तुटून पडले आहेत, तशी टोकाची भूमिका घनवट यांनी घेण्याचे टाळले. केंद्र सरकारला नमवण्याची ताकद दिल्लीतील शेतकरी आंदोलनाने दाखवली, या निमित्ताने शेतीक्षेत्रातल्या सुधारणांवर देशव्यापी चर्चा सुरू झाली. आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांच्या मागण्यांशी सहमत नाही; परंतु त्यांची भावना समजून घेतली पाहिजे, असे घनवटांच्या भूमिकेचे सार आहे. डॉ.गुलाटी हे कृषी अर्थकारणातील अधिकारी व्यक्तिमत्त्व आहे. शेतीमालाचे भाव पाडण्याच्या सरकारी धोरणांमुळे शेतकऱ्यांचे कसे शोषण होते, याची मांडणी ते सातत्याने करत आले आहेत. मनमोहनसिंग सरकारच्या काळात ते कृषी मूल्य व किंमत आयोगाचे अध्यक्ष होते, तर वाजपेयी सरकारच्या काळात पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे सर्वात तरुण सदस्य होते. कृषी कायद्यांचे त्यांनी समर्थन केलेले आहे, परंतु शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन या सुधारणा राबवाव्यात यासाठी कायद्यांना तात्पुरती स्थगिती देण्याची सूचना त्यांनी याआधीच केली होती. पंजाबच्या शेतकऱ्यांचे संभाव्य

नुकसान लक्षात घेता तेथे पीकपद्धतीत बदल करण्यासाठी दहा हजार कोटी रुपयांचे पॅकेज द्यावे, अशीही त्यांची सूचना आहे. डॉ.गुलाटी यांचा खुल्या अर्थव्यवस्थेचा, पीकबदलाचा (क्रॉप डायव्हर्सिफिकेशन) एक अजेन्डा जरूर आहे, परंतु त्यांना सरकारधार्जिणे ठरवणे अनुचित होईल. मोदी सरकारचे ते कडवे टीकाकार राहिलेले आहेत. कृषी सुधारणांचे समर्थक म्हणजे मोदी सरकारचे समर्थक अशी धारणा– समितीच्या विद्यमान रचनेमुळे– ठळक झाल्याने डॉ.गुलाटींसारख्या नाणावलेल्या अर्थतज्ज्ञाची अवस्था 'गाढव गेले नि ब्रह्मचर्यही गेले', अशी झाली आहे.

या सदस्यांची मते त्यांच्या ठिकाणी योग्य आहेत. ते आपापल्या भूमिकांशी प्रामाणिक राहिलेले आहेत. त्यामुळे त्यांची पात्रता हा काही वादाचा मुद्दा नाही. विरोधी मतांच्या सदस्यांना या समितीमध्ये स्थान न देण्याबद्दल आक्षेप आहे. कायद्यांच्या बाजूचे, कायद्यांच्या विरोधातले आणि तटस्थ अभ्यासक यांचा समावेश या समितीमध्ये असायला हवा, या अपेक्षेला समितीच्या विद्यमान रचनेमुळे खो बसला आहे. सरन्यायाधीशांनी आधीच्या सुनावण्यांमध्ये या समितीमध्ये ज्येष्ठ पत्रकार पी.साईनाथ, सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश आर.एम.लोढा यांसारख्या व्यक्तींचा समावेश करण्याचे सूतोवाच केले होते. परंतु प्रत्यक्षात जी नावे जाहीर झाली, त्यामुळे आश्चर्याचा धक्का बसला. (कदाचित साईनाथ, लोढा यांनी या समितीचा भाग बनण्यास नकार दिला असेल. परंतु न्यायालयाने समितीच्या सदस्यांची नावे जाहीर करण्याआधी त्यांना विश्वासात घेतले होते काय, याबद्दल स्पष्टता नाही. कारण अनिल घनवट यांनी आपला समितीमध्ये समावेश झाल्याची माहिती दूरचित्रवाणीवरील बातम्यांमधून मिळाल्याचे सांगितले आहे.) निवृत्त न्या.दीपक गुप्ता यांनी समितीचे सदस्य निवडण्याच्या प्रक्रियेवर टीका करताना १३५ कोटी लोकसंख्या असलेल्या देशात कृषी कायद्यांच्या विरोधात भूमिका असलेली, शेतकऱ्यांच्या बाजूने मत असलेली एकही तज्ज्ञ व्यक्ती सापडू नये, याबद्दल आश्चर्य व्यक्त केले आहे. न्यायालयाने सरकार आणि शेतकऱ्यांकडून नावे मागवून त्यांचा विचार समितीचे सदस्य निवडताना करायला हवा होता, असेही मत त्यांनी मांडले आहे. वाढता विरोध लक्षात घेऊन मान यांनी समितीचा राजीनामा देऊन आपली सुटका करून घेतली. समिती सदस्यांवर पक्षपातीपणाचा आरोप होत असल्यामुळे सरन्यायाधीशही व्यथित झाले. 'तुम्हाला समितीसमोर बाजू मांडायची नसेल तर मांडू नका, परंतु समिती सदस्यांवर आरोप करून त्यांची प्रतिमा मलिन का करता?' अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. समिती नेमण्यात न्यायालयाचे हितसंबंध असल्याचे आरोप होत असल्याबद्दलही त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

या साऱ्यातून समितीची विश्वासार्हताच धोक्यात आली आहे. त्यामुळे समिती नेमण्याचा मूळ हेतूच गैरलागू ठरण्याची भीती आहे. 'या समितीपुढे आम्ही बाजू मांडणार नाही', अशी भूमिका आंदोलक संघटनांनी घेतली आहे. 'आमचा मुद्दा धोरणात्मक बाबींशी संबंधित आहे, त्यामुळे आम्ही न्यायपालिकेने नेमलेल्या समितीबरोबर नाही तर कार्यपालिकेबरोबर म्हणजे सरकारशीच चर्चा करणार', असे त्यांचे म्हणणे आहे. समितीमधील चारही सदस्य या कायद्यांचे पाठीराखे असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. न्यायालयाने दिलेली स्थगिती तात्पुरती आहे, आमची मूळ मागणी कायदे रद्द करण्याची आहे, यावर संघटना ठाम आहेत. तर कायदे रद्द करणार नाही, असा निर्वाणीचा इशारा सरकारने दिला आहे.

कायद्यांना स्थगिती आणि समितीची स्थापना यामुळे शेतकरी आंदोलन मागे घेतील, अशी आशा न्यायालयालाही वाटत होती. तसेच एकदा का हा विषय न्यायालयात गेला की आंदोलनात तोडगा काढण्याचा आपल्यावरील दबाव आपोआप कमी होईल, असा सरकारचा हिशोब होता. समितीच्या सोपस्कारामुळे सरकारला हवे असलेले कालहरण निश्चितच होणार आहे. त्यामुळे शेतकरी संघटनांची दमछाक होऊन आंदोलन मागे घेतले जाईल, अशी सरकारची धारणा होती. परंतु संघटनांनी अत्यंत धोरणीपणे हा विषय हाताळल्यामुळे सगळ्यांचेच 'जजमेंट' हुकले आहे.

**धोक्याची घंटा**

वास्तविक केंद्र सरकारने खुल्या दिलाने आंदोलक शेतकऱ्यांशी चर्चा करायला हवी, परंतु सरकार आपला हेका सोडायला तयार नाही. दबावतंत्र, संघटनांमध्ये फाटाफूट, शेतकरी नेत्यांच्या मागे राष्ट्रीय तपास यंत्रणेचा (एनआयए) ससेमिरा लावणे, वेळकाढूपणा करणे आदी उद्योग सरकार करत आहे. न्यायालयाने जी सद्भावना व्यक्त केली, ती खरे तर सरकारकडून अपेक्षित होती. न्यायालयाऐवजी सरकारने कायद्यांना तात्पुरती स्थगिती देऊन चर्चेसाठी नव्याने सुरुवात

करायला हवी होती, परंतु सरकारने तो मार्ग अव्हेरला. सरकारला आपल्या प्रतिमेची चिंता पडलेली असावी. सरकारला बहुधा न्यायालयाच्या काठीनेच साप मारायचा होता. आंदोलनात खलिस्तानवादी संघटनेचा सहभाग असल्याची अधिकृत भूमिका सरकारने न्यायालयात घेतली. तसेच केंद्र सरकारच्या अखत्यारित असलेल्या दिल्ली पोलिसांनी शेतकऱ्यांना २६ जानेवारी रोजी ट्रॅक्टर मार्च काढण्यापासून रोखण्याची मागणी न्यायालयात केली. त्यावर 'हा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न असून त्याबद्दल निर्णय घेण्याचे अधिकार तुम्हाला आहेत, तुमचे अधिकार काय आहेत हे आम्ही सांगावे का?' या शब्दांत न्यायालयाने सरकारची कानउघाडणी केली. थोडक्यात, आपल्या अधिकारात असलेल्या प्रशासकीय बाबीही न्यायालयात घेऊन जाण्याचा सपाटा सरकारने लावला आहे. मागच्या वर्षी शाहीन बाग प्रकरणातही 'प्रशासनाने आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. (न्यायालयात धाव घेऊन) न्यायालयीन आदेशाच्या मागे लपणे किंवा प्रशासकीय कार्यवाहीसाठी तेथून आधार मागणे उचित नाही. (सरकारच्या) कृतींची घटनात्मक वैधता तपासणे हे न्यायालयाचे काम आहे, प्रशासनाला गोळ्या झाडण्यासाठी खांदा उपलब्ध करून देणे नव्हे' अशा शब्दांत सरन्यायाधीशांनी फटकारले होते. परंतु सरकारवर त्याचा फारसा परिणाम झालेला दिसत नाही. न्यायालयाच्या खांद्यावर बंदूक ठेवण्याचा सोस सुटत नाही. परंतु सरकारला आपला खांदा वापरू देणार नाही, या भूमिकेत न्यायालयाने सातत्य ठेवायला हवे; अन्यथा आपल्या राजकीय हेतूंसाठी सीबीआय, ईडी, एनआयए यांसारख्या संस्थांचा विधिनिषेध न बाळगता प्रच्छन्न वापर सरकार करत आहे, त्याच्याशी जोडूनच न्यायालयाच्या खांद्यावर बंदूक ठेवण्याच्या सरकारच्या कृतीकडे पाहिले जाईल. (कृषी कायद्यांच्या संदर्भात न्यायालयाने दिलेल्या निकालावर प्रतिक्रिया देताना 'न्यायालयाच्या मुखातून सरकारच बोलत आहे' अशी प्रतिक्रिया स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी व्यक्त केली. तर न्यायालयाची भूमिका म्हणजे 'ज्युडिशियल जिम्नॅस्टिक' असल्याची टीका ज्येष्ठ पत्रकार पी.साईनाथ यांनी केली.) त्याचा परिणाम म्हणून न्यायसंस्थेची प्रतिष्ठा, धाक, निष्पक्षपातीपणा व सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विश्वासार्हता याबद्दलच सामान्य जनतेच्या मनात चलबिचल सुरू होईल. सुदृढ व निकोप लोकशाहीसाठी ती धोक्याची घंटा ठरेल.

**कोंडी कशी फुटणार?**

शेतकरी आंदोलन हे केवळ कृषी कायद्यांतील कलमे आणि तरतुदींपुरता मर्यादित विषय नाही; तर सरकारचा हेतू व दृष्टिकोन हा मुद्दा येथे निर्णायक ठरतो. सरकारची नियत साफ दिसत नाही. सरकारला कृषी बाजार सुधारणांची आस नसून खरा उद्देश आपल्या मर्जीतल्या चार-दोन कुडमुड्या भांडवलदारांचे हितसंबंध बळकट करण्याचा आहे, तर शेतकरी संघटना कायदे रद्द करण्यावर अडून राहिल्यामुळे त्यांचा बाजार सुधारणांनाच विरोध असल्याचा संदेश जात आहे. सध्याची प्रचलित व्यवस्था शेतकऱ्यांचे हित साधणारी आहे, असा त्याचा अर्थ निघतो. एकीकडे बाजार समित्या शेतकऱ्यांचे कत्तलखाने आहेत, अशी मांडणी करायची आणि दुसरीकडे बाजारस्वातंत्र्याला विरोध करायचा, ही दुटप्पी रणनीती झाली.

या पार्श्वभूमीवर सरकार आणि आंदोलक या दोघांनीही एकेक पाऊल मागे येण्याची आवश्यकता आहे. कृषी सुधारणा व्हायलाच हव्यात, पण त्यासाठी वादग्रस्त कृषी कायद्यांतील गंभीर त्रुटी दूर केल्या पाहिजेत. कॉर्पोरेट्सची मक्तेदारी निर्माण होऊ नये यासाठी खबरदारी घेणे, सध्याची बाजार समित्यांची रचना मोडीत न काढता त्यांना बळकट करणे, बाजारात स्पर्धा निर्माण करणे, लहान शेतकऱ्यांना संरक्षण देणे, शेतकऱ्यांची विक्री व्यवस्थेतील जोखीम कमी करण्यासाठी आणि त्यांना उत्पन्न सुरक्षेची हमी मिळण्यासाठी संस्थात्मक रचना उभी करणे- या मुद्यांवर आता चर्चा पुढे जायला हवी. सरकारने अहंकार बाजूला ठेवत आंदोलनकर्त्या संघटनांचे आक्षेप व संभाव्य धोक्यांचे निराकरण करून कायद्यांत फेरबदल करण्याची किंवा नवे कायदे आणण्याची लवचिकता दाखवावी. सरकार आणि आंदोलक यांच्यात २० जानेवारी रोजी झालेली चर्चेची दहावी फेरीही तोडग्याविना संपली. पण या बैठकीत कृषी कायद्यांना दीड वर्षे स्थगिती देण्याची तयारी सरकारने दाखवली. हा लेख लिहीपर्यंत सरकारच्या प्रस्तावावर शेतकऱ्यांचा निर्णय झालेला नव्हता. शेतकरी आंदोलनाची कोंडी फुटेल की गुंतागुंत अधिकच वाढेल, याचा फैसला त्यानंतरच होणार आहे.

**रमेश जाधव**, पुणे

ramesh. jadhav@gmail. com& Mob. 9922913192

(लेखक ॲग्रोवनचे उपवृत्तसंपादक आहेत. )

न्या. हेमंत गोखले

# डॉ. कमाल हुसेन आणि डॉ. हमिदा हुसेन

बांगलादेशात मला भेटलेल्या दोन महत्त्वाच्या व्यक्ती म्हणजे डॉ.कमाल हुसेन आणि त्यांची पत्नी डॉ.हमिदा हुसेन. डॉ.हुसेन यांचे नाव १९७१ च्या बांगलादेशाच्या मुक्तिसंग्रामापासूनच ऐकले होते. बंगबंधू शेख मुजिबूर रेहमान यांचे सहकारी, स्वतंत्र बांगलादेशचे पहिले कायदा मंत्री आणि त्यांच्या घटना परिषदेचे अध्यक्ष म्हणून. हमिदा हुसेन यांच्या कार्याची मात्र मला माहिती नव्हती.

डॉ.कमाल हुसेन हे ढाक्क्याच्या स्प्रिंग लॉ स्कूलमध्ये व्याख्यानासाठी बोलावणाऱ्या संस्थेचे अध्यक्ष होते. व्याख्यानमालेच्या शेवटच्या दिवशी म्हणजे १४ मार्च २०२० रोजी Valedictory Function साठी ते यावेत, ही अपेक्षा होती. परंतु आता ते वयाने ८२ च्या पुढे आहेत, सध्या Wheel Chair चा वापर करतात आणि प्रकृतिअस्वास्थ्यामुळे ते येतील किंवा काय, याची खात्री नव्हती. तरीही ते आले, आमच्याबरोबर त्यांनी जेवणही घेतले आणि नंतर Valedictory Function मध्ये भाग घेतला. त्यांनी आम्हाला भरपूर वेळ दिला. त्यामुळेच तर त्यांची भेट झाली आणि हमिदा हुसेन तर चक्क योगायोगाने दुसऱ्या दिवशी भेटल्या!

बांगलादेशच्या मुक्तिलढ्याच्या वेळेस मी शरणार्थी शिबिरात काम केले होते, हे ऐकून कमाल हुसेन प्रभावित झाले. आमच्या बोलण्यात त्यांनी त्या वेळचा काळ उभा केला. ते म्हणाले, ''आम्ही यशस्वी होऊ किंवा नाही याची खात्री नव्हती, पण आमचा लढा हा न्यायासाठी होता आणि तो आम्ही शेवटपर्यंत लढणार होतो, हे ठरवले होते.'' मी माझ्या भाषणात म्हणालो, ''डॉ. कमाल हुसेनना भेटणे, त्यांच्या बाजूला बसणे, त्यांचे भाषण ऐकणे- हा माझा एक मोठा सन्मानच होता.'' कमाल हुसेन यांना प्रकृतीमुळे अधिक वेळ थांबणे शक्य नव्हते. Valedictory Function झाल्यानंतर ते परत गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही Research Initiative

१९६५ च्या भारत-पाक युद्धानंतर पाकिस्तानचे राज्यकर्ते पूर्व बंगालचे शोषण करीत आहेत, ही जाणीव पूर्व बंगालमध्ये वाढू लागली. पाकिस्तानच्या परकीय चलनापैकी ७० टक्के चलन हे पूर्व पाकिस्तान मिळवत असताना ती रक्कम पश्चिम पाकिस्तानात सैन्याच्या खर्चासाठी वापरली जात होती. त्यातूनच २३ मार्च १९६६ रोजी शेख मुजिब यांच्या अवामी लीगच्या Six Point Programme चा जन्म झाला. पाकिस्तानने संघराज्याची व्यवस्था स्वीकारावी, संरक्षण आणि परराष्ट्र धोरण हे दोनच विषय केंद्र सरकारकडे असावेत, बाकीचे सर्व विषय राज्यांकडे सोपवावेत, पूर्व पाकिस्तानसाठी परकीय चलन व उत्पन्नाचा वेगळा हिशेब ठेवला जावा, ही त्यातील मुख्य कलमे होती. या चळवळीमुळे शेख मुजिब यांच्यावर Agartala Conspiracy Case हा खोटा खटला भरण्यात आला. तेव्हापासून कमाल हुसेन, वकील आणि सहकारी म्हणून शेख मुजिब यांच्या अधिकच जवळ आले.

Bangladesh (R.I.B.) या संस्थेच्या (Executive Director) कार्यकारी संचालक प्रा. मेघना गुहा-ठाकूरता यांना भेटायला गेलो. त्यांना भेटून मी आणि माझ्याबरोबर आलेले माझे पुण्याचे मित्र अन्वर राजन थोडा वेळ बोलू लागताच, त्या म्हणाल्या की, आपण आणखी बोलू याच. पण आत्ता थोड्या वेळात कमाल हुसेन यांच्या पत्नी हमिदा हुसेन इथे येणार आहेत. आमच्या संस्थेच्या सल्लागारांपैकी त्या एक आहेत आणि त्यांची आत्ता मीटिंग आहे. मी म्हटले, हा फारच चांगला योगायोग आहे. थोड्याच वेळात हमिदाजी आल्या. सडपातळ, हसऱ्या आणि साधी सुती साडी नेसलेल्या. मेघनाजींनी आमची ओळख करून दिली. बहुतेक त्यांना आमची माहिती कमाल हुसेन यांच्याकडून मिळाली असावी, असे त्यांच्या बोलण्यावरून वाटले. थोड्याच वेळात संस्थेचे अध्यक्ष श्री.अब्दुल बारी तिथे आले. त्यांच्याबरोबर हमिदाजी मीटिंगसाठी आतल्या खोलीत गेल्या. मीटिंग संपल्यानंतर त्या पुन्हा बाहेर आल्या आणि बराच वेळ आमच्याशी बोलत राहिल्या.

आदल्या दिवशी मी कमाल हुसेनना म्हटले होते की, त्यांनी त्यांच्या आठवणी लिहिल्या पाहिजेत. त्यावर ते म्हणाले, विचार करतो. हमिदाजींना मी हे सांगितल्यानंतर त्या हसल्या आणि म्हणाल्या, ''बांगलादेशच्या स्वातंत्र्य-लढ्यातील त्यांच्या सहभागाबद्दल त्यांनी आधीच लिहिले आहे. त्यांना ते आठवले नसेल. मी तुम्हाला ते पुस्तक पाठवून देईन.'' आणि आम्ही ज्या उत्तरा क्लबमध्ये उतरलो होतो, तिथे संध्याकाळी त्यांनी ते पुस्तक पाठविलेदेखील; कमाल हुसेन यांची सही आणि शुभेच्छा संदेशासह! २०१३ मध्ये ढाक्क्याच्या University Press Ltd. ने प्रकाशित केलेले- Bangladesh Quest for Freedom and Justice यातील कमाल हुसेन यांचा या लढ्यातील सहभाग हा या पुस्तकाचा विशेष. थोडक्यात तो पुढीलप्रमाणे-

कमाल हुसेन यांनी अमेरिका आणि इंग्लंडमध्ये उच्च शिक्षण घेतले होते. आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये डॉक्टरेट मिळविली, बॅरिस्टर झाले आणि नंतर ढाक्क्याच्या हायकोर्टात वकिली करू लागले. या पुस्तकाच्या पहिल्याच प्रकरणात कमाल हुसेन यांनी बांगलादेशच्या लढ्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली आहे. त्यात सुरुवातीलाच ते म्हणतात, पंचवीस वर्षांच्या कालखंडात बांगलादेशच्या जनतेला स्वातंत्र्य आणि न्यायासाठी दोनदा लढावे लागले. हिंदू जमीनदार आणि मुसलमान शेतकरी यांच्यातील संघर्षाला १९४६ च्या दंगलीनंतर जातीय वळण लागले.

डावीकडून दुसरे शेख मुजिब आणि तिसरे डॉ. कमाल हुसेन- लंडनमध्ये, ९ जानेवारी १९७२





इंदिरा गांधी आणि शेख मुजिब रेहमान

बंगालच्या मुस्लिम लीगचे प्रमुख नेते हुसेन शहीद सुऱ्हावर्दी हे सुरुवातीला देशबंधू चित्तरंजन दास यांना मानणारे होते. कमाल हुसेन लिहितात, 'देशबंधूंच्या १९२५ मध्ये झालेल्या मृत्यूमुळे जातीय ऐक्याची अपरिमित हानी झाली.' महम्मद तालुकदार यांनी संपादित केलेल्या हुसेन शहीद सुऱ्हावर्दींच्या आठवणी या पुस्तकातील एक परिच्छेद त्यांनी उद्धृत केला आहे–

'देशबंधू हे केवळ श्रेष्ठ बंगालीच नव्हे, तर श्रेष्ठ भारतीय आणि गांधीजींच्या इतकेच मोठे, व्यापक दृष्टिकोन असणारे आणि Non-Communal नेते होते. मी त्यांना ओळखत होतो, हे माझे भाग्यच. ते जर अधिक जगले असते तर त्यांनी हिंदू-मुसलमानांमधील संघर्ष व वैमनस्याची कारणे नष्ट केली असती आणि भारताची फाळणी व पाकिस्तानची निर्मिती टाळली असती.' अर्थात ते होणार नव्हते.

सहाकलमी कार्यक्रम या दुसऱ्याच प्रकरणात कमाल हुसेन लिहितात : पाकिस्तानच्या निर्मितीनंतर थोड्याच काळात पूर्व बंगालला दुय्यम दर्जाची वागणूक मिळायला लागली. फेब्रुवारी १९५२ मध्ये उर्दू भाषेच्या सक्तीविरुद्ध विद्यार्थ्यांना आंदोलन करावे लागले. १९६० च्या दशकात रेडिओ आणि टेलिव्हिजनवर रवींद्र संगीतावर बंदी आणण्यात आली. त्याविरुद्ध कलावंतांना लढावे लागले. तेव्हापासून बंगाली भाषा आणि अस्मितेसाठी लढा वाढू लागला होता. १९६५ च्या भारत-पाक युद्धानंतर पाकिस्तानचे राज्यकर्ते पूर्व बंगालचे शोषण करीत आहेत, ही जाणीव पूर्व बंगालमध्ये वाढू लागली. पाकिस्तानच्या परकीय चलनापैकी ७० टक्के चलन हे पूर्व पाकिस्तान मिळवत असताना (विशेषतः ज्यूट उत्पादनातून) ती रक्कम पश्चिम पाकिस्तानात सैन्याच्या खर्चासाठी वापरली जात होती. त्यातूनच २३ मार्च १९६६ रोजी शेख मुजिब यांच्या अवामी लीगच्या Six Point Programme चा जन्म झाला. पाकिस्तानने संघराज्याची व्यवस्था स्वीकारावी, संरक्षण आणि परराष्ट्र धोरण हे दोनच विषय केंद्र सरकारकडे असावेत, बाकीचे सर्व विषय राज्यांकडे सोपवावेत, पूर्व पाकिस्तानसाठी परकीय चलन व उत्पन्नाचा वेगळा हिशेब ठेवला जावा, ही त्यातील मुख्य कलमे होती. यातूनच वाढलेल्या चळवळीमुळे शेख मुजिब यांच्यावर Agartala Conspiracy Case हा खोटा खटला भरण्यात आला. तेव्हापासून कमाल हुसेन, वकील आणि सहकारी म्हणून शेख मुजिब यांच्या अधिकच जवळ आले.

लोकांच्या प्रक्षोभामुळे तो खटला नंतर काढून टाकण्यात आला आणि फेब्रुवारी-मार्च १९६९ मध्ये बंगबंधू यांना Round Table Conference साठी पाकिस्तानचे तेव्हाचे

राष्ट्रपती अयूबखान यांनी रावळपिंडीला बोलावले. बंगबंधूंबरोबरच्या प्रतिनिधींमध्ये कमाल हुसेन होते. त्या परिषदेच्या अखेरीस अयूबखानांनी Six Point Progamme ची तत्त्वे स्वीकारण्यास नकार दिला. परिषद असफल झाली. बंगबंधूंचे प्रतिनिधी मंडळ ढाक्क्याला परत आले.

कालांतराने अयूबखान यांची सत्ता पाकिस्तानचे सेनाप्रमुख मानेनासे झाले. दि.२५ मार्च १९६९ रोजी त्यांनी राजीनामा दिला आणि जनरल याह्याखान हे Martial Law Administrator झाले. मधल्या काळात पूर्व बंगालमध्ये स्वायत्ततेचे आंदोलन आणि त्याबरोबरच सरकारी दमन चालूच होते. अखेर डिसेंबर १९७० मध्ये पाकिस्तानच्या National Assembly ची निवडणूक झाली. पंजाब आणि सिंधमधल्या बहुसंख्य जागा झुल्फिकार अली भुट्टो यांच्या पक्षाला मिळाल्या. परंतु National Assembly मधील ३१३ जागांपैकी १६९ जागा पूर्व बंगालसाठी होत्या. त्यातल्या १६७ जागा जिंकून अवामी लीगने National Assembly मध्ये बहुमत मिळविले. तरीही शेख मुजिब यांना सरकार बनविण्यासाठी बोलावले गेले नाही आणि National Assembly सुद्धा बोलावण्यात आली नाही. पूर्व बंगालमध्ये असंतोष व आंदोलन वाढत गेले. याह्याखान आणि भुट्टो हे दोघेही शेख मुजिब यांच्याशी बोलणी करण्यासाठी ढाक्क्याला आले, परंतु ते नाटक होते. त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. दि.२५ मार्च १९७१ रोजी याह्याखान यांच्याकडून काही प्रस्ताव येईल, अशी अपेक्षा होती. आदल्या दिवशी रात्री १०:३० वाजेपर्यंत कमाल हुसेन हे शेख मुजिब यांच्या घरी थांबले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ते पुन्हा शेख मुजिब यांच्या घरी गेले. शेख मुजिब त्यांना म्हणाले, ‘काहीही प्रस्ताव आलेला नाही. दडपशाही सुरू झाली आहे. तुम्ही इथून निघा. माझी काळजी करू नका. आपण आता स्वतंत्र आहोत. आपले स्वातंत्र्ययुद्ध सुरू झाले आहे.’

दुसऱ्या दिवशी कमाल हुसेन यांना कळले की, बंगबंधूंना अटक करून पश्चिम पाकिस्तानात नेण्यात आले आहे. कमाल हुसेन काही दिवस गुप्त ठिकाणी राहिले. पाकिस्तानच्या सैन्याने २५ मार्चपासून सामान्य जनतेवर अनन्वित अत्याचार सुरू केले. ढाक्क्याच्या रस्त्यांवर लष्कराने रणगाडे आणून निःशस्त्र जनतेवर गोळीबार सुरू केला. कमाल हुसेननाही ३ एप्रिल रोजी अटक करण्यात आली आणि त्यांनाही पश्चिम पाकिस्तानात नेण्यात आले.

मधल्या काळात शेख मुजिब यांचे दुसरे सहकारी ताजुद्दीन अहमद यांनी भारतात येऊन बांगलादेशचे स्वतंत्र सरकार स्थापन केले. पाक सैन्याच्या अत्याचारामुळे एक कोटी लोक भारतात शरणार्थी म्हणून आले. भारत सरकारने अखेर बांगलादेशच्या मुक्ती फौजेबरोबर पूर्व बंगालमध्ये आपले सैन्य पाठवले. दि.१६ डिसेंबर १९७१ रोजी पाक सैन्याने शरणागती पत्करली. पाकिस्तानी सैन्याचे पूर्व बंगालमधील प्रमुख जनरल नियाझी आणि पाकिस्तानचे ९०,००० सैनिक शरण आले. बांगलादेश स्वतंत्र झाला.

कमाल हुसेनना या घटनांची माहिती मिळू शकत नव्हती, कारण तुरुंगामध्ये त्यांना रेडिओ आणि वर्तमानपत्रे दिलेली नव्हती. त्यांच्यावर पाकिस्तानच्या सैनिकी न्यायालयात देशद्रोहाचा खटला भरण्यात आला. मात्र मधल्या काळात त्यांची आई, पत्नी, मुली आणि बहीण यांना पश्चिम पाकिस्तानात आणून त्यांची भेट होऊ दिली. डिसेंबरमध्ये जेलमध्ये अचानक blackout सुरू झाला. सायरन वाजू लागला. लढाई चालू झाली असावी, असा कमाल हुसेनना अंदाज आला. काही दिवसांनी सायरन अचानक बंद झाले. blackout थांबला. त्यांना १६ डिसेंबरला चांगले जेवण दिले गेले. बहुतेक आपला विजय झाला असावा, असा त्यांना अंदाज आला.

नंतर त्यांना रावळपिंडीजवळच्या पोलीस ॲकॅडेमीजवळ एका बंगल्यात हलवले गेले. आश्चर्य म्हणजे, तिथे शेख मुजिब होते. अर्थातच एकमेकांना भेटून त्यांना आनंद झाला. मधल्या काळातल्या सगळ्या घडामोडी कळल्या. शेख मुजिब आधी मियावाली येथील तुरुंगात होते. जनरल नियाझी हे मियावालीचे होते. पाकिस्तानच्या १६ डिसेंबरच्या शरणागतीनंतर मियावलीच्या तुरुंगात तणाव निर्माण झाला. बंगबंधूंचा ताबा असलेल्या पोलीस अधिकाऱ्याच्या हे लक्षात आले की, बंगबंधूंनी तिथे राहणे त्यांना धोकादायक आहे, म्हणून त्याने स्वतःच्या जबाबदारीवर बंगबधूंना रावळपिंडीच्या पोलीस ॲकॅडेमीजवळ हलवले. तिथे त्यांना भेटायला भुट्टो आले. म्हणाले, ‘मी आता पाकिस्तानचा राष्ट्राध्यक्ष झालो आहे. तुमची आता सुटका होईल.’ त्यावर बंगबंधू हसून म्हणाले, ‘अहो, पण हे कसे झाले? National Assembly मध्ये तुमच्या दुप्पट जागा मला मिळाल्या होत्या.’ भुट्टो म्हणाले, ‘तुम्हाला पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष व्हायचे असेल तर होऊ शकता.’ बंगबंधू म्हणाले, ‘मला ती इच्छा नाही. मला



डॉ.हमिदा हुसेन आणि न्या. हेमंत गोखले

लवकरात लवकर बांगलादेशला जायचे आहे.'

बांगलादेशच्या मुक्तिलढ्यामध्ये भारत सहभागी असल्याने पाकिस्तानच्या विमानांना भारतावरून उडण्याची बंदी होती. त्यामुळे शेख मुजिब आणि कमाल हुसेन यांची सुटका झाल्यानंतर कमाल हुसेन यांच्या कुटुंबीयांसह त्यांना ८ जानेवारी १९७२ रोजी प्रथम लंडनला नेण्यात आले. ब्रिटनचे तेव्हाचे पंतप्रधान एडवर्ड हिथ यांनी तिथे भेटून बंगबंधूंचे अभिनंदन केले. नंतर दिल्ली येथे थोडा वेळ थांबून त्यांचे विमान १० जानेवारी रोजी ढाक्क्याला आले. दिल्लीला त्यांच्या स्वागतासाठी भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी सर्व मंत्रिमंडळासह विमानतळावर उपस्थित होत्या. तिथेच एक मोठी सभा झाली. ढाक्क्यामध्ये बंगबंधूंचे प्रचंड मोठे स्वागत झाले. ज्या उद्दिष्टासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले होते, ते साध्य झाल्याचा आनंद त्यांच्या भाषणातून व्यक्त होत होता. स्वातंत्र्यलढ्यामध्ये ज्यांनी प्राणांची आहुती दिली, त्यांना त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली. बांगलादेशच्या लोकांनी २५ मार्चनंतर नऊ महिने भोगलेल्या यातना आणि दिलेला लढा यांचा गौरव करताना त्यांनी रवींद्रनाथ टागोर यांच्या बंगमाता या कवितेच्या ओळी उद्धृत केल्या. निरपराध लोकांवर अमानुष अत्याचार करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची घोषणा केली. काही दिवसांनी इंदिरा गांधीही ढाक्क्याला आल्या, लोकांनी त्यांचेही प्रचंड स्वागत केले. कमाल हुसेन बांगलादेशचे पहिले कायदामंत्री आणि त्यांच्या घटना परिषदेचे अध्यक्ष झाले. राष्ट्रवाद, समाजवाद, लोकशाही आणि सर्वधर्म समभाव मानणारी राज्यघटना त्यांनी बांगलादेशला दिली.

बांगलादेश स्वतंत्र झाल्यानंतर शरणार्थींच्या पुनर्वसनाचे आणि राष्ट्राच्या उभारणीचे मोठे काम होते. तोडलेले रस्ते–पूल पुन्हा बांधणे, बांगलादेशची विस्कटलेली घडी बसविणे इत्यादी कामे सुरू झाली. परंतु, बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्यात पाकिस्तानशी सहकार्य करणारे काही अधिकारी बांगलादेशच्या सैन्यात होते. त्यांना बंगबंधूंचे यश खुपत होते. त्यांनी १५ ऑगस्ट १९७५ रोजी शेख मुजिब यांच्या घरावर हल्ला करून बंगबंधूंसह त्यांच्या घरातील सर्व माणसांची हत्या केली. बंगबंधूंचेच एक सहकारी खोंडकार मुश्ताक अहमद हे राष्ट्राध्यक्ष झाले. ताजुद्दीन अहमद यांनाही पकडून ३ नोव्हेंबर १९७५ रोजी तुरुंगामध्ये ठार मारण्यात आले.

बंगबंधूंवरील या हल्ल्याच्या वेळेस कमाल हुसेन हे

बांगलादेशचे परराष्ट्रमंत्री होते आणि सरकारी कामासाठीच युगोस्लाव्हियाला गेले होते. तिथे त्यांना हत्याकांडाची बातमी कळून धक्काच बसला. शेख मुजिब यांच्या मुली हसीना वाजेद (आत्ताच्या पंतप्रधान) आणि रेहाना त्या वेळेस जर्मनीत बॉन येथे होत्या, त्यामुळेच बचावल्या. कमाल हुसेन त्यांना जाऊन भेटले, त्यांना धीर दिला, आणि पुढे लंडनला गेले. या सगळ्या घटनांमुळे मनःस्ताप होऊन त्यांची तब्येत बिघडली आणि त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल व्हावे लागले. त्यांच्या आजारीपणाच्या कारणास्तव त्यांनी आपली आई, पत्नी आणि दोन मुली यांना ढाक्क्याहून बोलावून घेतले. त्यांना बांगलादेश सोडण्याची परवानगी मोठ्या मुश्किलीने मिळाली आणि तरीही त्यांच्या विमानाचे उड्डाण Military Clearance साठी तीन तास रोखून ठेवण्यात आले. सुदैवाने त्यांच्या कुटुंबीयांना लंडनला येऊ देण्यात आले. पुढे बऱ्याच काळाने ते सर्व जण बांगलादेशला परत आले. नंतर त्यांनी शेख हसीना यांना देशात आणि राजकारणात येण्यासाठी मदत केली. शेख हसीना १९९६ ते २००१ या काळात आणि नंतर २००८ पासून पंतप्रधान आहेत.

कमाल हुसेन यांच्या पुस्तकातील पुढची प्रकरणे बांगलादेशचे भारताबरोबरचे संबंध, पाकिस्तानबरोबरचे संबंध, संयुक्त राष्ट्रात बांगलादेश या विषयांवरची आहेत. पुढे शेख हसीना यांच्या धोरणांबाबत मतभेद झाल्याने कमाल हुसेन हे अवामी लीग पासून दूर झाले आणि त्यांनी 'गणफोरम' ही संघटना स्थापन केली.

हमिदाजी नंतर म्हणाल्या, ''तुम्हाला माहीत आहे का, मी सिंधी आहे आणि कमाल हुसेन यांच्यापेक्षा वयाने मोठी आहे.'' ते ऐकून आम्हाला आश्चर्यच वाटले. पण नंतर त्यांची आणखी माहिती मिळाली, ती अधिकच नोंद घेण्यासारखी. सिंधमधील हैदराबाद येथे त्यांचा जन्म. त्यांचे वडील न्यायाधीश होते. त्यांच्या आजीने फाळणीनंतर भारतातून आलेल्या निर्वासितांसाठी खूप काम केले. हमिदाजींना लहान वयातच अमेरिकेला जाण्याची संधी मिळाली. अमेरिकेत आणि इंग्लंडमध्ये त्यांनी उच्च शिक्षण घेतले, डॉक्टरेट मिळविली. लग्नानंतर त्या पूर्व पाकिस्तानमध्ये आल्या. अनेक विषयांवर त्यांचे अभ्यासपूर्ण लेखन आहे. Company Weavers of Bengal हा East India Company च्या काळातील टेक्सटाईल उत्पादनावर आणि त्यातल्या श्रमिकांवर त्यांनी ग्रंथ लिहिला आहे. बॅरिस्टर सलमा सोभान या ज्येष्ठ महिला कार्यकर्तीबरोबर त्यांनी ऐन ओ सालिश केंद्र ही महिलांच्या प्रश्नांवर काम करणारी संस्था स्थापन केली. १९७१ च्या मुक्तिलढ्यानंतर बलात्कार झालेल्या, एकाकी पडलेल्या महिलांसाठी त्यांनी काम केले. Of the Nation Born-The Bangladesh Papers हा १९७१ च्या लढ्यातल्या आणि एकूणच अत्याचारग्रस्त महिलांविषयीचा ग्रंथ त्यांनी संपादित केला आहे.

नंतर हमिदाजींनी एका विद्यापीठाला दिलेल्या एका मुलाखतीची माहिती मिळाली. त्यात हमिदाजींना बंगबंधूंच्या हत्येसंबंधी विचारले असता, त्यांनी म्हटले आहे : १५ ऑगस्ट १९७५ रोजी मी माझ्या मुलींबरोबर घरीच होते. कमाल हुसेन युगोस्लाव्हियाला गेले होते. आमच्या घरापासून शेख मुजिब यांचे घर दूर नव्हते. अचानक फटाके वाजल्यासारखा आवाज आला. तो १५ ऑगस्टचा दिवस होता. मला वाटले, भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा होत असेल. नंतर हत्याकांडाची खबर ऐकून आम्ही हादरलोच. सुरक्षिततेसाठी कसेबसे दुसरीकडे राहायला गेलो. नंतर काही दिवसांनी कमाल हुसेन लंडनला आजारी आहेत म्हणून आम्हाला तिथे जाण्याची परवानगी मिळाली. बऱ्याच काळानंतर स्थिरस्थावर झाल्यावर ढाक्क्याला परत आलो. १९७१ चा स्वातंत्र्यलढा, शेख मुजिब आणि कमाल हुसेन यांची तेव्हा झालेली अटक, नंतर बांगलादेशमध्ये झालेले अत्याचार, १९७५ मधील शेख मुजिब यांचे हत्याकांड व तेव्हाचे दिवस आम्हाला विसरणे अशक्य आहे.

आजही हमिदाजींचे सामाजिक कार्य आणि विशेषतः महिलांच्या प्रश्नांवरचे कार्य चालूच असते. अशाच कामासंबंधी त्या मेघना गुहा-ठाकूरता यांच्या R.I.B. संस्थेत आल्या होत्या, त्यामुळे आमची आणि त्यांची भेट झाली. आमच्या भेटीनंतर त्या निघाल्या, तेव्हा माझ्या पत्नीने- मीनाने- दिलेले केवड्याचे अत्तर मी त्यांना भेट दिले. तेव्हा निरोप घेताना त्या हसून म्हणाल्या, ''या वेळेस अत्तर दिलेत, पुढच्या वेळेस अत्तर देणारीला घेऊन या.''

**न्या. हेमंत गोखले,** मुंबई
gokhalehemantlaxman@gmail.com
Mob. 9769305849
(लेखक, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती या पदावरून २०१४ मध्ये निवृत्त झाले आहेत.)

सुहास पळशीकर

# आक्रसणारी लोकशाही : विश्लेषणाच्या दोन दिशा

विसावं शतक जर लोकशाहीच्या विस्ताराचे शतक असं मानलं, तर गेल्या पंधरा-वीस वर्षांचा अनुभव आपल्याला असं सांगतो की- बहुधा एकविसावे शतक विसाव्या शतकातील सगळे फायदे गमवणारं शतक ठरू शकतं. लोकशाहीचा सांगाडा राहतो; आत्मा नाहीसा होतो, लोक नावाची गोष्ट आकुंचन पावते. या पार्श्वभूमीवर आता शेवटच्या भागाकडे मी वळतो. हा असा अवघड भाग आहे की, खरं पाहता ज्याचं उत्तर माझ्याकडे नाही. तो असा की, या सगळ्यांचे स्पष्टीकरण आणि विश्लेषणाच्या दिशा कोणत्या असतील?

हे भाषण केले तेव्हा अशक्यप्राय वाटणारी घडामोड २०२१ च्या जानेवारी महिन्यात अमेरिकेत घडली. जसा २०२० च्या महामारीचा लोकशाहीच्या वाटचालीवर दीर्घ काळ परिणाम होणार आहे, त्याचप्रमाणे अमेरिकेतील घडामोडीच्या जखमा जागतिक लोकशाहीला पुढचा दीर्घ काळ अंगावर वाहाव्या लागणार आहेत. त्यामुळे लोकशाहीच्या या अभूतपूर्व ओहोटीसाठी त्या-त्या देशांमधले राज्यकर्ते जबाबदार धरता येतील, काही निवडक देश जबाबदार धरता येतील, देशादेशांतील एकमेकांचे विरोधक तिथल्या लोकशाहीच्या दुर्दशेला करणीभूत आहेत असे म्हणता येईल.

उदाहरणार्थ- भारतात मोदींच्या राज्यात लोकशाही सशक्त झाली आहे, असा तुम्ही दावा कराल किंवा एकट्या मोदींवर सगळा दोष टाकून मोकळे होऊ शकाल. पण फक्त आजचे राज्यकर्ते लोकशाहीच्या ओहोटीला जबाबदार धरणे हे मर्यादित विश्लेषण ठरेल, तर लोकशाहीची पीछेहाट होते आहे हेच नाकारणे हा शहामृग न्याय ठरेल. पक्षीय किंवा देशीय चौकटीच्या पलीकडे जाऊन हे जे काही जागतिक पातळीवर घडतंय, ते लक्षात घेऊन त्याच्या विश्लेषणाच्या किंवा स्पष्टीकरणाच्या काही दिशा संभवतात का?

स्पष्टीकरणाच्या किंवा विश्लेषणाच्या दोन शक्यता असू

अखेरीस, मला ज्याचं राजकीय उत्तर खरोखरच अजिबात माहीत नाही अशा प्रश्नाने मी या भाषणाचा समारोप करेन. लोकमान्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हे व्याख्यान आहे आणि त्यांच्या स्मृतिशताब्दीचं वर्ष आहे. त्यांच्या विचारांच्या संदर्भात ताकद, लोकसंग्रह किंवा लोकसमुदाय नावाची गोष्ट फार महत्त्वाची आहे. त्यामुळे कदाचित आपल्याला परत एकदा त्यांच्याकडे जावं लागेल आणि याचं चिंतन-मनन करून या प्रश्नाचं उत्तर शोधावं लागेल. तो प्रश्न असा की, आपलं भवितव्य अणि लोकशाहीचं भवितव्य एकमेकांशी जोडणारी नवी सार्वजनिक सामुदायिक शक्ती येत्या दशकात कोणती असेल? अशी कोणती शक्ती असेल, जी लोकशाहीच्या ओहोटीच्या काळामध्ये लोकशाहीच्या मागे उभं राहून आणि लोकांना तिच्या पाठीमागे आणून ही ओहोटी थांबवू शकेल?

शकतील, असे मला वाटते. ती दोन्ही ठाम उत्तरं म्हणून मी सांगत नाहीये. एका अर्थाने मी हा प्रयोग करून पाहतोय की, या सगळ्याच्या स्पष्टीकरणासाठी आपल्याला एकच मोठी चौकट वापरता येईल का? जेव्हा आपण अशा प्रकारची सैद्धांतिक स्पष्टीकरणे विकसित करतो, तेव्हा ती जास्तीत जास्त उदाहरणांना लागू पडणारी असावी लागतात; अन्यथा ती उपयोगाची नसतात. मी जर फक्त इंडोनेशिया किंवा म्यानमारला लागू पडणारं स्पष्टीकरण केलं, तर त्याने लोकशाहीला ओहोटी लागण्याची ही जी जागतिक घडामोड आहे तिचे स्पष्टीकरण करू शकत नाही. म्हणून दोन अमूर्त आणि प्रायोगिक प्रयत्न मी करून पाहणार आहे.

**नागरिकांचा निरुत्साह**

लोकशाही जर यशस्वी व्हायची असेल, तर त्याच्यासाठी काय लागतं याचं भान ठेवण्याची जरुरी आहे. उदाहरणार्थ, लोकशाही यशस्वी होण्यासाठी काय 'टूलबॉक्स' लागतील असे जर कोणी विचारले, तर बऱ्याच गोष्टींची यादी करता येईल. तशी ती केली जाते, कारण पाश्चात्त्यांना टूलबॉक्स फार आवडतात. हा शब्दप्रयोग लोकशाहीच्या अनेक अभ्यासकांनी वापरलेलादेखील आहे. पण त्या टूलबॉक्समधील सगळी हत्यारे- संविधान, सत्ताविभाजन, न्यायालयीन स्वातंत्र्य, स्वतंत्र माध्यमे, इत्यादी सर्व... क्षणभर आपण विसरून जाऊ. तरीही एक गोष्ट शिल्लक राहतेच की, जी लोकशाही यशस्वी होण्यासाठी लागते. ती म्हणजे, त्या-त्या समाजातील लोकांची त्या लोकशाहीमध्ये स्वतःची भावनिक आणि व्यावहारिक गुंतवणूक असावी लागते.

लोकांनी जर लोकशाहीमधील 'इन्व्हेस्टमेंट' काढून घेतली, तर लोकांनी पैसे काढून घेतलेल्या बँकेसारखी तिची गत होईल. (आता भारतात बँका बुडतात त्या वेगळ्या कारणाने. त्यामुळे हे उदाहरण गैरलागू आहे!) म्हणजे, अशी कल्पना करा की- जर आज लोक म्हणतात त्याप्रमाणे लोकशाही ही योग्य आणि सर्वमान्य व्यवस्था उरलीच नाही, लोकशाहीला पाठिंबा देणं लोकांनी बंद केलं, तर लोकशाही उरेल काय? तेव्हा मी इन्व्हेस्टमेंट म्हणतो ते या अर्थाने. जर भारतातील जास्त अचूक उदाहरण द्यायचं झालं तर खरं उदाहरण असं आहे की- भारतामध्ये मध्यमवर्गाने एका टप्प्यावर ठरवलं की, आपली मुलं सरकारी शाळांमध्ये पाठवायची नाहीत. त्यामुळे मग सरकारी शाळांचं काही का होईना, मध्यमवर्गाला त्यांची चिंता राहिली नाही. आता गेल्या पाच- दहा वर्षांपासून असा टप्पा आलेला आहे की, आपल्या मुलांना- ज्याला आपण सरकारी पद्धतीची विद्यापीठं म्हणतो, त्या विद्यापीठांमध्ये पाठवायचं नाही. हा प्रघात जर चालू राहिला तर विद्यापीठं आधीच कोसळलेली आहेत, ती आणखी कोसळतील, पण कोणाला त्याची पर्वा राहणार नाही- विशेषतः मध्यमवर्गाला. कारण त्याला त्या विद्यापीठव्यवस्थेशी काही देणं-घेणं नसणार. याचा अर्थ असा झाला की, एखाद्या सुविधेत (किंवा विचारात) गुंतवणूक याचा अर्थ आपण त्याच्यामध्ये स्वतःला गुंतवून घेऊन त्याच्यापासून फायदा मिळणार हा विश्वास बाळगायचा आणि म्हणून मग ती सुविधा किंवा तो विचार, ती व्यवस्था यांची निगराणी राखायची. या अर्थाने लोकांची गुंतवणूक लोकशाहीमध्ये असणं आवश्यक असतं.

**लोकशाहीमागील सामाजिक ताकद**

हे एवढ्या विस्ताराने मी सांगितलं याचं कारण पुढे तुमच्या लगेच लक्षात येईल. ते असं की- ऐतिहासिक दृष्ट्या तुम्ही जर युरोपात पाहिलं तर तुम्हाला असं दिसेल, की लोकशाहीच्या सुरुवातीच्या टप्प्यावरती तिचं भांडवलदारवर्गाला प्रेम वाटत होतं. सरंजामदारांच्या विरोधात एका अर्थाने भांडवलदारवर्ग हा लोकशाहीचा समर्थक फोर्स होता, कारण सरंजामशाही त्यामुळे बाजूला टाकणं त्याला शक्य होणार होतं. पण गंमत अशी झाली की, त्या भांडवलदारवर्गाने आणलेली लोकशाही लवकरच कामगारवर्गाला उपयोगाची वाटू लागली. त्यामुळे कामगारवर्ग हा लोकशाहीचा समर्थक बनला. अशा रीतीने लोकशाहीला एक सामाजिक ताकद प्राप्त झाली.

भारताचं उदाहरण घ्या. १९४७ मध्ये सगळे म्हणत होते की, भारतामध्ये लोकशाही यशस्वी होणार नाही. ती यशस्वी होण्याचं कारण काय? ते म्हणजे स्वातंत्र्याच्या टप्प्यावर इथले जे अभिजन होते, त्यांना हा विश्वास होता की- आपण इथे लोकशाहीच्या चौकटीमध्ये सत्ता गाजवू शकतो. त्यामुळे वासाहतिक राजवटीच्या विरोधात लोकशाहीचे हत्यार उपसून ते उभे राहिले आणि स्वातंत्र्यानंतरदेखील लोकशाही मार्गाने आपली सत्ता चालेल, या खात्रीने त्यांनी लोकशाहीमध्ये स्वतःची गुंतवणूक केली. (म्हणून भारतात अगदी सुरुवातीपासून इथल्या अभिजनांनी प्रौढ मताधिकार मागितला. याउलट, उदाहरणार्थ- श्रीलंकेतील अभिजनांचा एका टप्प्यावर प्रौढ मताधिकाराला विरोध होता.) अभिजनांच्या या भूमिकेमधून भारतात लोकशाहीला एक

(मर्यादित का होईना) सामाजिक ताकद प्राप्त झाली.

पण राष्ट्रीय चळवळीच्या सार्वजनिक स्वरूपामुळे त्याच वेळेला इथल्या सामान्य जनतेलासुद्धा हा विश्वास होता की, मतदान नावाची गोष्ट वापरून आपण राजकारणामध्ये काही तरी हस्तक्षेप करू शकतो. इतकेच नाही, तर इतर वेळीदेखील लोकशाही नावाची राजकीय चौकट हे आपले स्वतःचे हत्यार आहे, अशी सामान्य नागरिकांची भूमिका होती. अशा दोन भिन्न सामाजिक घटकांच्या संयुक्त शक्तीमधून संविधानाला ताकद मिळाली. ते संविधान ज्याला आपण २६ नोव्हेंबर आणि २६ जानेवारीला पवित्र म्हणतो, तसं ते पवित्र बनलं. ते दिवस हे केवळ संविधानाच्या ताकदीची नामचिन्हे आहेत. खरे तर संविधान एका सामाजिक युतीमधून श्रेष्ठ बनलं. हे संविधान असं होतं की, ज्याच्यामुळे या विविध समूहांना हे आश्वासन मिळालं की, त्यांचे हितसंबंध या चौकटीमध्ये राखले जातील. अभिजनांच्या वळचणीला असलेल्या मध्यमवर्गाला या व्यवस्थेत फायदे आपोआपच मिळणार होते, त्यामुळे तो या व्यवस्थेचा समर्थक बनला आणि तिच्या मूल्यचौकटीचा प्रवक्ता बनला.

पुढे हळूहळू सत्तरच्या दशकामध्ये भारतामधला जो मध्यमवर्ग आहे, त्याचा लोकशाहीमधला इंटरेस्ट संपला. गंमत म्हणून, एक खेळणं म्हणून, एक कोडकौतुकाची गोष्ट म्हणून आणि थोडा नाइलाज म्हणून भारतातल्या मध्यमवर्गाने लोकशाहीचं कोडकौतुक चालू ठेवलं. कारण त्यातून त्याला काही गमवावं लागत नव्हतं. पुढे नव्वदच्या आसपास- ऐंशीच्या दशकाच्या शेवटी इथल्या कनिष्ठ समूहांच्या नव्याने हे लक्षात आलं की, लोकशाही हे आपल्या ताकदीचं प्रतीक असणारं पण बऱ्यापैकी गंज चढायला लागलेलं एक हत्यार आहे. त्यामुळे बायका, आदिवासी, दलित, गरीब, ग्रामीण असे वेगवेगळे जनसमूह काही प्रमाणात लोकशाहीमध्ये उत्साहाने जास्त सहभागी व्हायला लागले. आंदोलने, चळवळी आणि मतदान यांचा वापर करू लागले- ज्याचा democratic upsurge म्हणजे लोकशाही उठाव म्हणून उल्लेख केला गेलेला आहे- तो उठाव होता, कारण त्यातून लोकशाही हे मध्यमवर्गाच्या हातातील देखाव्याचे खेळणे राहीलच याची खात्री उरली नाही. या घडामोडीतून भारतातील लोकशाही मोडता-मोडता टिकून राहिली आणि आपल्याला असं वाटलं की, आता ती जास्त सशक्त झाली.

**सर्वांना हवीशी ते कोणालाच नकोशी!**

हा तपशील जर तुम्ही लक्षात घेतलात तर विश्लेषणाची एक चौकट आपल्याला मिळते, ती अशी : असं काही झालंय का, की आता कोणत्याच समाजघटकाला त्याचे सामाजिक आर्थिक हितसंबंध लोकशाहीमधून साधता येतील असा विश्वास वाटेनासा झालाय? युरोपातील वेगवेगळ्या देशांमधले अस्वस्थ स्थलांतरित असोत, अमेरिकेतील श्वेतवर्णीय मध्यमवर्गीय असोत किंवा रस्त्यावर थंडीमध्ये कुडकुडत रस्त्यावर झोपणारे लोक असोत; कोणालाच अमेरिकेमधील लोकशाहीचं प्रेम राहिलेलं नाही. त्यांनी ती अजून टाकून दिलेली नाही(?), पण तिच्याबद्दल प्रेम राहिलेलं नाही, आपुलकी राहिली नाही. हेच फ्रान्स किंवा इंग्लंडमध्ये होतंय का? जशी अमेरिकेतील अतिश्रीमंत गटाला लोकशाहीची गरज उरलेली नाही, तसं अमेरिकेतील कृष्णवर्णीय आणि हिस्पॅनिक जे आहेत त्यांनाही लोकशाही काही देईनाशी झाली. त्यामुळे त्यांचा क्षणिक का होईना, लोकशाहीमधला उत्साह मावळला, स्वारस्य कमी झालं.

म्हणजे आपण असा विचार करून पाहिला पाहिजे की, असं काही तरी या काळात- गेल्या पंचवीसेक वर्षांत घडलं, ज्याचा गव्हर्नन्स किंवा शासनव्यवहार नावाच्या गोष्टीशीसुध्दा संबंध आहे आणि त्याचा एकांगी जागतिकीकरणाशीसुद्धा आहे. त्यातून लोकशाही हे 'आपलं' शस्त्र आहे असं वाटणारे समूह आक्रसले. ज्या काळात लोकशाहीला ही ओहोटी लागली, त्याच काळात दोन गोष्टी अत्यंत आक्रमकपणे घडलेल्या आहेत. एक म्हणजे- जागतिकीकरण. ते एकांगी होतं, एकतर्फी होतं; पण त्याचे गोडवे मात्र गायले गेले ते असे की, ते जणू काही सगळ्या जगाचं राष्ट्रगीत आहे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे- भांडवलशाहीने स्वीकारलेलं नव-आक्रमक (आणि लुटारू- predatory) आंतरराष्ट्रीय स्वरूप. भांडवलशाही ही नेहमीच आंतरराष्ट्रीय असते, हे मार्क्सने सांगितलेलं आहे. पण विसाव्या शतकाच्या शेवटी फायनान्स कॅपिटल किंवा वित्तीय भांडवलाचं महत्त्व अचानक निर्माण झालं आणि त्याच्यातून आक्रमक व उपटसुंभ अशा प्रकारची भांडवलशाही निर्माण झाली. बेझोस हे त्या उपटसुंभ भांडवलशाहीचं एक प्रतीक आहे. आपल्याकडेदेखील अशी उदाहरणं दाखवता येतील. पण आपलं आपल्या भांडवलदारांवर जास्तच प्रेम असल्यामुळे नामोल्लेखाने वाद वाढतील, एवढंच! असे ओव्हरनाईट स्वप्नातील

राजकुमारासारखे, सकाळी उठल्यावर एकदम राजा व्हावं तशा प्रकारे झालेले भांडवलदार आणि झटपट बँका लुटून आपल्याला भांडवलदार होता येईल, अशी महत्त्वाकांक्षा बाळगणारी नवी व्यापारी वृत्तीची भांडवलशाही पिढी यांचा झालेला उदय हे गेल्या तीन दशकांचे एक वैशिष्ट्य आहे. या सगळ्याच लोकांनी कुठे तरी असा अर्थ घेतला असेल का, की, काहीही झालं तरी शेवटी ॲमेझोन किंवा अन्य 'अ'ने सुरू होणारे कर्तबगार वित्तसम्राट म्हणतात तसंच सगळं होणार आहे; काहीही झालं तरी अमुक एक कंत्राट हे अमुक कंपनीलाच मिळणार आहे, वगैरे... तर कशाला उगीच लोकशाहीमध्ये स्वारस्य घ्यायचं? तेव्हा ही मला शक्य अशी एक चौकट वाटते की, जिच्यात लोकशाहीला लागलेल्या ओहोटीचं विश्लेषण आपल्याला उदाहरणे देऊन देशनिहाय करता येईल. जनाधार व जनहित हे दोन्ही हरवून बसल्यामुळे किंवा त्या दोन्हींची पीछेहाट झाल्यामुळे लोकशाहीसाठी लागणारे लोकरूपी इंधन संपत चालले आहे आणि त्यातून लोकशाहीला सांगाड्याचे रूप येते आहे.

**अभिजनांचा उठाव**

याला छेद न देणारी, पण विश्लेषणाची याच्यापेक्षा वेगळी एक चौकट अशी संभवते की- आत्ता लोकशाहीला लागलेली ओहोटी हा जणू काही अभिजनांचा उठाव आहे की काय? कारण अंतिमतः लोकशाही ही अभिजनविरोधी असते. जगाच्या इतिहासात तिने अभिजनांना अत्यंत कमी त्रास दिलाय, पण तरी दिलाय. उमरावशाही नष्ट झाली, अंतिमतः गोऱ्यांचं महत्त्व अमेरिकेत आणि जगभरात कमी झालं. दक्षिण आफ्रिका हे त्याचं मोठं मूर्तिमंत उदाहरण आहे. पुरुषसत्ता टिकून असली तरी तिची अधिमान्यता मोडून पडली आहे. त्यामुळे त्या-त्या समाजातले जे-जे अभिजन आहेत, त्यांना आपोआप आतून कुठे तरी (instinctively) लोकशाहीबद्दल असलेल्या आशंकांमधून ते लोकशाहीपासून दूर जाऊन लोकशाहीला घातपात (sabotage) करण्याचं राजकारण चालू करत आहेत का? अशी ही विश्लेषणाची दुसरी चौकट आहे. मी घातपात हा शब्द वापरतोय... पण माझा कारस्थानांच्या सिद्धांतावर विश्वास नाही आणि त्यामुळे कोणी तरी ठरवून लोकशाही मुद्दाम मोडतंय- हे अभिजन योजनापूर्वक लोकशाही मोडताहेत, असं मी म्हणत नाहीये.

पण आपल्याला हे समजून घ्यायला लागेल की, या अभिजनांना आत्मरक्षणासाठी काही तरी करणं भाग होतं. कारण विसाव्या शतकाच्या शेवटी लोकशाहीचा जो विस्तार झाला, तो तिलाच डोईजड झाला. कदाचित विसाव्या शतकाच्या शेवटी म्हणण्यापेक्षा सत्तरच्या दशकापासून, असं म्हणता येईल. कदाचित तुम्हाला आणखी मागे जाता येईल, म्हणजे अमेरिकेत काळ्यांनादेखील बरोबरीने वागवलं पाहिजे आणि माणूस म्हणून वागवलं पाहिजे याच्यासाठी झालेला जो तीव्र लढा साठच्या दशकात होता, तिथपासूनदेखील याची सुरुवात झाली, असं म्हणता येईल. आफ्रिकेत मंडेला यांनी दिलेला जो लढा आहे तो याच्यात तुम्हाला घेता येईल.

बायकांचा जगभर उठलेला जो आवाज आहे, त्याचाही यात मोठा वाटा आहे- वेगवेगळ्या पद्धतीने. म्हणजे 'आमच्या शरीरावर आमचं नियंत्रण असेल' इथपासून राज्यकारभारात आम्हाला सहभागी होऊ द्या असं म्हणणं आणि 'सरपंच म्हणून मला ध्वजवंदन करू द्या' हा आग्रह धरणं इथपर्यंत असेल. पहिलं अतिक्रांतिकारक विधान 'आमच्या शरीरावर आमचा हक्क' आणि 'सरपंच म्हणून मला ध्वजवंदन करू द्या' हे साधं घटनात्मक विधान आहे. या दोन टोकांच्या विधानांमधून पुरुषसत्तेला मिळालेलं ते आव्हान आहे. भारतासारख्या देशांमध्ये जातींच्या संदर्भामध्ये जे काही घडलं- सत्तरपासून ते नव्वदच्या दशकापर्यंत- त्यातून इथल्या उच्च जातींमध्ये निर्माण झालेली खळबळ असेल किंवा तिच्यातून आलेली सत्तेची अनिश्चितता असेल; या सर्वांमुळे लोकशाहीला खुली वाट देण्यामधले धोके अभिजनांच्या लक्षात येत गेले असणार. श्रीलंकेमध्ये तमिळांच्या विरोधामध्ये तिथल्या सिंघल अभिजनांना जी भीती वाटायला लागली, त्यातून तिथे हेच वातावरण निर्माण झालेलं असेल.

तुम्ही कोणत्याही देशातील उदाहरण घ्या. तुम्हाला असं दिसेल की, लोकशाहीच्या विस्तारामध्ये एक भानगड अशी होऊन बसली की- सैद्धांतिक आणि व्यावहारिक अशा दोन्ही पातळ्यांवर राजकारण नावाची जी काही मर्यादित चौकट होती, त्या चौकटीबाहेर जाऊन कुठेही सत्तेचं केंद्रीकरण नको आणि सगळीकडे समानता पाहिजे, असे तात्त्विक व व्यावहारिक आग्रह धरले जायला लागले . संरचनात्मक पातळीवर जर तुम्ही याचा विचार करायला लागलात. तर याचा अर्थ असा झाला की जगभरच्या entrenched किंवा रुतून बसलेल्या सत्ताधारी संरचनांना लोकशाहीने आव्हान दिलं. (अर्थातच त्या संरचनात्मक

वाटचालीची झळ तेवढ्याच ताकदीने समाजात सत्तास्थानांवर रुतून बसलेल्या विशिष्ट समूहांच्या सभासदांना वैयक्तिक दृष्ट्यादेखील बसली आणि लोकशाही-विरोधाचं मानवी इंधन तयार झालं.) स्वाभाविकच त्यांना त्याचा प्रतिकार व प्रतिवाद हा विसाव्या शतकाच्या अखेरीस जरी करता आला नसला, तरी एकविसाव्या शतकामध्ये वेगवेगळ्या मार्गाने आणि वेगवेगळ्या निमित्ताने त्यांनी लोकशाहीच 'कमी' करायला- तिची छाटणी करायला सुरुवात केली का? लोकशाही हवीच, पण तिच्यामुळे विकास अडून राहिला तर काय करायचे- अशा संभावित चिंता त्यामुळेच व्यक्त होऊ लागल्या का?

त्यातून मग काय झालं? तर, लोकशाही तर नाकारायची नाही, पण लोकशाहीमधले हे जे गाभ्याचे वाघ आहेत ते अलगद बाजूला ठेवणारे लोकशाहीचे नवे सिद्धान्त आणि लोकशाहीची नवी रूपं लोकांच्या पुढे मांडायची- असं काही तरी सुरू झालंय का? लोकशाही आणि विकास, लोकशाही आणि आर्थिक वृद्धी, लोकशाही आणि राष्ट्र अशी नवनवीन द्वंद्वे उभी करून एक तर लोकशाही बदनाम करायची किंवा तिचा संकोच करण्यासाठीचे जनमत तयार करून 'लोकशाही मार्गाने'- बहुमताने, लोकसंमतीने- लोकांच्या गळ्यात निर्बंधांची दोरी बांधायची, असं काही तरी अनेक ठिकाणी चालू आहे का? त्यामुळेच व्यक्तिस्वातंत्र्य, अल्पसंख्य समूहांचे अधिकार, संस्थांची स्वायत्तता अशा गोष्टींना लोकशाहीमधील फापटपसरा मानून त्यांचा मूल्यात्मक अधःपात कसा होईल, हे पाहिले जाते आहे का?

### सैद्धांतिक सुवर्णमृग

हा विश्लेषणाचा दुसरा मार्ग उपलब्ध असू शकतो. या दोन्ही मार्गांपैकी कुठल्याही मार्गाने तुम्ही गेलात, तरी एक सावधगिरीचा इशारा दिल्याशिवाय थांबणं बरोबर वाटत नाही- तो असा- इथून पुढे लोकशाही वाईट आहे म्हणून लोकशाही संपणार नाहीये. लोकशाही चांगलीच आहे, पण तुम्हाला कळतो तो लोकशाहीचा अर्थ बरोबर नाहीये म्हणून लोकशाहीची नवी रूपं येतील आणि अशा नव्या रूपात आलेली- मायावी रूपात आलेली लोकशाही आपल्याला भुरळ घालून अस्सलच्या जागी नक्कल प्रस्थापित करेल का? आपल्याकडचा जर दाखला द्यायचा झाला तर- मायावी रूपात येऊन सीताहरण झालंच होतं, तसं लोकशाहीचं हरण होण्याची शक्यता आहे का? त्याच्यासाठी कोणती मायावी रूपं येत आहेत, हेही लक्षात घेतलं पाहिजे; कारण मायावी रूपाची लोकशाही येण्यापेक्षा थेट लोकशाही संपली, तर लोकांचे नवे लढे लोकशाहीसाठी सुरू होऊ शकतात. मायावी रूपांनी दिशाभूल होण्याची शक्यता जास्त! म्हणून त्या मायावी रूपांचा निर्देश मला शेवटी करणं आवश्यक वाटतं.

उदाहरणार्थ- एक युक्तिवाद असा होऊ शकतो, ज्याला 'इलेक्टोरल ओन्ली' असं म्हणता येईल. निवडणुका होत आहेत, तुम्हाला उभे राहायचं तर तुम्ही उभे राहा. तुमच्या पाठीमागे पाच लोक तरी आहेत का ते बघा; आम्हाला सव्वाशे कोटींचा पाठिंबा आहे. अमेरिकेत ट्रम्प यांनी तेच म्हणून पाहिलं, तशा बहकलेल्या बेभान भक्तांची भुतावळ थेट अमेरिकी कायदे मंडळाच्या इमारतीत घुसवली, भावनोद्रेक घडवलेली झुंड हा लोकप्रियतेचा आधार बनवला (नागरिक आणि झुंडी यांच्यातला फरक अधोरेखित केला). हा सगळा युक्तिवाद तांत्रिक- कायदेशीर दृष्ट्या अनेक वेळेला बरोबर असतो आणि त्यामुळे 'लोकांना' काय हवं ते ओरडून-दरडावून सांगणारे नेते व पक्ष हात-पाय पसरतात. आपण आतापर्यंत आधीच्या भागात पाहिलं त्याप्रमाणे निवडणूक म्हणजे लोकसंमती किंवा बहुसंख्या म्हणजे लोकशाही केवळ आवाज म्हणजे जर लोकशाही- असं मानलं, तर निवडणुकांचा सांगाडा आपल्यापुढे उभा करून 'लोकशाही आहे आणि तेवढी पुरेशी आहे' असे सांगण्याचे प्रयत्न होतील. लोकप्रिय नेत्याची लोकांनी केलेली निवड हे असंच एक मायावी हरिण असणार आहे.

दुसरं हरिण असणार आहे, ज्याला इंग्रजीमध्ये पॉप्युलिझम म्हणतात. युरोपात या हरणाची, या मायावी रूपाची चर्चा खूप झालेली आहे. लोकैकवाद असं मी त्याला मराठीमध्ये म्हटलेलं आहे. लोक हेच अंतिम आहेत. आता हे तर हरिण इतकं मायावी की, आपण लोक आहोत आणि लोक अंतिम आहेत (किंवा परमेश्वर आहेत वगैरे...) हे ऐकल्यानंतर आपली छाती अभिमानाने फुलून येते. लोकांसाठीच हे सगळं चाललेलं आहे आणि याच्यातून शेवटी लोकांचंच हित होणार आहे, ही जी लोकैकवादाची भाषा आहे- जिचा अभ्यास अनेक अभ्यासकांनी अत्यंत तपशीलवार केलेला आहे- ते दुसरं अत्यंत आकर्षक मायावी हरिण आहे. ट्रम्प किंवा एर्दोगान ही अशा प्रकारचे लोकैकवादी राजकारणाची अस्सल उदाहरणं म्हणून आपल्याला दाखवता येतील. किंवा ब्राझीलमध्ये

बोल्सेनारो. भारतातल्या अनेक राजकारण्यांची राजकारण करण्याची रीत लोकैकवादी असते. पूर्वीही होती आजही आहे. पण भारतातली जनता प्रवृत्तीने अजून पुरेशी लोकैकवादी बनलेली नाही. म्हणजे तिला अमूर्त लोक नावाच्या कल्पनेचं आकर्षण आहे, पण त्यासाठी सगळ्या संस्था सरसकट मोडीत काढाव्यात का याचा संदेह आहे. पण काही झालं तरी ते मायावी हरिण आहे. ते केव्हाही तुमच्या दारात येऊन लोकशाहीला आणि तुमच्या विवेकाला पळवून नेईल.

तिसरं मायावी हरिण जे- ज्याचा वापर जगभरचे राज्यकर्ते करतील, करतात आणि लोकशाही आतून पोखरतात- ते म्हणजे majoritarianism किंवा बहुसंख्याकवाद. लोकशाहीमध्ये लोकांनी मतं दिली की, ज्याला जास्त मतं मिळतील ती बहुसंख्या ही एक असते. त्या देशात स्वतःला त्या देशाचे अस्सल भक्त आणि नागरिक मानणारे जे लोक असतात, त्यांची दुसरी बहुसंख्या असते. ते असं म्हणतात की- आम्ही बहुसंख्य आहोत आणि आम्ही म्हणजेच देश आहोत, बाकीचे कोणी नाहीत. याला majoritarianism असं म्हणता येईल. मागे मी डोहर यांचा उल्लेख केला. ते अर्थातच इस्राईल आणि युरोपसंदर्भात बोलत असल्यामुळे, त्यांनी त्याला एथनिक डेमोक्रॅसी असं म्हटलेलं आहे. Katherine Adeney यांनीही तीच चौकट वापरून भारताचं विश्लेषण एथनिक डेमोक्रॅसी असं केलेलं आहे. एखाद्या समाजाने आपण बहुसंख्य आहोत आणि हा देश आमचा आहे, म्हणून आम्ही म्हणू तसं इथे सगळं झालं पाहिजे असं म्हणणं- असा त्याचा अर्थ. आत्ताच्या भाषणाचा तो विषय नाही. पण श्रीलंकेच्या इतिहासात तुम्ही डोकावून पाहिलंत तर श्रीलंकेत यादवी होण्याचं मुख्य कारण म्हणजे सिंहल समुदायाचा बहुसंख्यांकवाद. तेव्हा बहुसंख्यांकवाद.

**समारोप**

माझं शेवटी असं प्रतिपादन आहे की- येतं दशक आणि कदाचित शतक मला माहीत नाही, शतक ही खूप लांबची व मोठी गोष्ट आहे... पण किमान येतं दशक, ज्यात आपण प्रवेश करतो आहोत, ते लोकशाहीच्या ओहोटीच्या एका नव्या टप्प्याचं असणार आहे. त्या टप्प्यात लोकशाहीबद्दल कोणी वाईट बोलणार नाही, पण लोकशाहीचा अर्थ बदलून लोकशाहीच्या पाठीमागे असलेली सामुदायिक आघाडी मोडीत काढून लोकशाही पोखरण्याचे अनेक प्रयत्न होतील.

अखेरीस, मला ज्याचं राजकीय उत्तर खरोखरच अजिबात माहीत नाही अशा प्रश्नाने मी या भाषणाचा समारोप करेन. लोकमान्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हे व्याख्यान आहे आणि त्यांच्या स्मृतिशताब्दीचं वर्ष आहे. त्यांच्या विचारांच्या संदर्भात ताकद, लोकसंग्रह किंवा लोकसमुदाय नावाची गोष्ट फार महत्त्वाची आहे. त्यामुळे कदाचित आपल्याला परत एकदा त्यांच्याकडे जावं लागेल आणि याचं चिंतन-मनन करून या प्रश्नाचं उत्तर शोधावं लागेल. तो प्रश्न असा की, आपलं भवितव्य अणि लोकशाहीचं भवितव्य एकमेकांशी जोडणारी नवी सार्वजनिक सामुदायिक शक्ती येत्या दशकात कोणती असेल? अशी कोणती शक्ती असेल, जी लोकशाहीच्या ओहोटीच्या काळामध्ये लोकशाहीच्या मागे उभं राहून आणि लोकांना तिच्या पाठीमागे आणून ही ओहोटी थांबवू शकेल? हा आजच्या काळातला लोकशाहीच्या सिद्धांतीकरणातला सगळ्यात अवघड आणि आपल्याला बहुधा अनुत्तरित करणारा प्रश्न आहे, असं मला वाटतं. या प्रश्नाच्या निमित्ताने एकूणच लोकशाहीचे नव्या चौकटीत सिद्धांतन करण्याचे आव्हान अभ्यासकांच्या पुढे असणार आहे, तर लोकशाहीची ऊर्जा जागी ठेवण्यासाठी नव्या सामाजिक शक्ती लोकशाहीच्या समर्थनासाठी सतत उभ्या करणे हे लोकशाहीवादी क्रियावंतांच्या पुढचे आगामी आव्हान असणार आहे.

या प्रश्नांची उत्तरं तुम्हाला सगळ्यांना सापडावीत- किमान ती शोधण्याची ईर्ष्या तुमच्यात शिल्लक राहावी; त्यासाठी लागणारा सार्वजनिक विवेक जागवणे, जतन करणे आणि त्याच्या आधारे वाटचाल करणे आपल्याला शक्य व्हावे, अशी आशा व्यक्त करून आणि मला इतिहास विभागाने हे विचार मांडण्याची संधी दिली याबद्दल इतिहास विभाग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे पुन्हा एकदा मी आभार मानून हे भाषण संपवतो. धन्यवाद.

**सुहास पळशीकर,** पुणे
suhaspalshikar@gmail.com

(दि.२ डिसेंबर २०२० रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागात सुहास पळशीकर यांनी लोकमान्य टिळक स्मृतिव्याख्यान दिले. संपूर्ण भाषणाचे रेकॉर्डिंगवरून **शब्दांकन** करण्याचे काम **सतीशकुमार पडोळकर,** हिन्दी विषयाचे व्याख्याते, लोणीकाळभोर यांनी केले आहे. ते भाषण लेखस्वरूपात प्रसिद्ध करताना लेखकाने त्याचे संपादन करून आवश्यकतेप्रमाणे त्यात नव्याने भरदेखील घातली आहे.)

बराक ओबामा

# ‘अ प्रॉमिस्ड लॅन्ड’ या पुस्तकाच्या निमित्ताने संवाद

(भाग ३)

**प्रश्न** – तुम्ही अजूनही ज्याला वास्तववादी, आशावादी असे संबोधता येईल किंवा वर्णन करता येईल अशी व्यक्ती आहात. अमेरिका आदर्शवत् नसली तरी तिला आदर्शवत् करता येईल. एकूण अमेरिकेची परिस्थिती पाहता त्यात वाईटापेक्षा चांगले अधिक आहे, वर्तमानापेक्षा भविष्य चांगले असू शकते– या तुमच्या धारणा आजदेखील पूर्वीइतक्याच पक्क्या आहेत, हे तुम्ही पुस्तकाच्या आरंभीच स्पष्ट केले आहे. पण आता बायडेन यांचा विजय झाला असला तरी ट्रंपयुगामुळे अमेरिकेकडे पाहण्याचा तुमचा दृष्टिकोन बदलला आहे काय किंवा अमेरिका म्हणजे काय, या प्रश्नाचे उत्तर बदलले आहे काय?

– पिरॅमिड भेटीच्या प्रसंगाचा उल्लेख पुस्तकात उगाच आलेला नाही, त्यामागे एक हेतू आहे. तुम्ही स्वतःसमोर काळाचा किती मोठा पट ठेवता; यावर तुम्ही आशावादी आहात का निराशावादी आहात, हे अवलंबून असते. काही सहस्रकांचा विचार केला तर मानवाने निश्चितच प्रगती केली आहे. चेंगीझखानचे एखादे चरित्र वाचल्यावर हे लक्षात येते. चेंगीझखान मंगोल महासत्तेचा नेता होता. अमेरिका जितकी महासत्ता आहे, त्यापेक्षा अधिक काळ मंगोल साम्राज्य महासत्ता होते. ते जेव्हा एखाद्या शहरावर हल्ला करत, तेव्हा तेथील रहिवाशांसमोर ते दोन पर्याय ठेवत– पहिला म्हणजे, तुम्ही शहराचे दरवाजे उघडले तर आम्ही पुरुषांना लगेच मारून टाकू, स्त्रियांना ताब्यात घेऊ आणि मुलांना गुलाम करू, पण त्यांना मारून टाकणार नाही. तुम्ही विरोध केलात, आम्ही शहर जिंकले तर तुम्हाला तापलेल्या तेलात भाजून काढत तुमची कातडी सोलून काढू. आता इतिहासात दिसणाऱ्या अमानुषतेची, लाचखोरीची, भ्रष्टाचाराची तुलना आजच्या परिस्थितीशी करा. पूर्वीच्या मानाने आपण खूपच बरे आहोत.

आता दुसऱ्या महायुद्धानंतरचा काळ घेऊ या. त्याला आपण सुवर्णयुग म्हणतो. अमेरिका एकसंध होता, तर

आता एक बाब रोचक आहे. शाळा–कॉलेजमधील काळात तुम्ही विद्यार्थी–जगतातील गट–तट, दादागिरी, अन्याय होणे आणि संधी नाकारली जाणे, उथळपणा हे सगळे पाहता–अनुभवता. तुम्हाला वाटते की, मी एकदाचा मोठा होऊन यातून बाहेर पडलो की, पुन्हा असल्या गोष्टी पाहायला लागणार नाहीत. मग तुम्ही राज्य विधान मंडळात जाता. तिथेदेखील तुम्हाला मूर्खपणा आणि क्षुद्रपणा दिसतो. मग तुम्ही संसदेत जाता, मग जी–२० परिषदेला जाता. तिथे सर्व वातावरण अधिक सुसंस्कृत असेल; लोक अधिक विचारी, काटेकोर व निःस्वार्थी असतील, अशी तुमची अपेक्षा असते. मग तुमच्या लक्षात येते की, तुम्ही शाळा–कॉलेजच्याच वातावरणात परत आला आहात. माणसे एकमेकांशी सर्वत्र आणि सर्व काळात सारखीच वागतात.

बाकीच्या जगात विध्वंसाने थैमान घातले होते. कोणताही आर्थिक निकष-मापदंड लावला तरी आपली प्रगतीच होत होती. सर्वांचेच आयुष्य सातत्याने सुधारत होते. पण तुम्ही जर कृष्णवर्णीय असाल, स्त्री असाल किंवा समलिंगी व्यक्ती असाल, तर बहुधा तुमच्यासाठी चित्र फारसे चांगले नव्हते. त्या सुवर्णयुगात जी परिस्थिती होती, त्यापेक्षा ती आज अधिक चांगली आहे. म्हणजे आजच्या परिस्थितीची तुलना ज्या काळाशी केली जाते, त्यावर सद्य:स्थिती आशादायक आहे का निराशादायक आहे, हे ठरेल.

मनुष्यजातीमध्ये सध्यापेक्षा अधिक कनवाळू किंवा परोपकारी, न्यायी, निःपक्षपाती, विवेकी, सहिष्णू होण्याची क्षमता आहे, यावर माझा नेहमीच विश्वास राहिलेला आहे. आता हे सगळे काही अटळपणे घडून येणारे नाही. इतिहासाचा प्रवास सरळ रेषेत कधीच होत नाही. पण जर या मूल्यांच्या प्रचार-प्रसारासाठी पुरेशा संख्येने सद्हेतूंनी प्रेरित झालेले लोक असतील, तर परिस्थिती सुधारू शकते. प्रयोग म्हणून अमेरिकेचे जगासाठी एक आगळे-वेगळे महत्त्व आहे. इतिहासातील अपघातांमुळे आपण जगातील सर्वांत शक्तिशाली देश झालो आहोत, या कारणासाठी अमेरिकेचे महत्त्व नाही; तर एक मोठी, बहुवांशिक, बहुसांस्कृतिक लोकशाही व्यवस्था उभी करण्याचा पहिला खराखुरा प्रयोग म्हणजे अमेरिका होय, म्हणून अमेरिकेचे महत्त्व आहे. ही अशी आपली लोकशाही व्यवस्था आहे. पणण पुढेही ती याच स्वरूपात टिकून राहील का, हेसुद्धा आपल्याला माहीत नाही.

या प्रकारचे प्रयोग काही पुरेशा संख्येने आणि पुरेशा काळासाठी यशस्वी झालेले नाहीत. त्यामुळे अमेरिकेचा हा प्रयोग यशस्वी होईलच, याची खात्री देता येत नाही. पण तो यशस्वी झाला, तर ती एक चांगली गोष्ट ठरेल. कारण, सध्या पृथ्वीवर आठ अब्ज लोक आहेत. तंत्रज्ञानामुळे आणि हवामानबदलामुळे निर्माण होणाऱ्या ताण-तणावांमुळे आपण सर्व एकमेकांच्या अधिकाधिक संपर्कात येणार आहोत किंवा अवलंबून राहणार आहोत. त्यामुळे एकत्र राहायचे मार्ग आपल्याला शोधून काढायचे आहेत. मानवी इतिहासातल्या बऱ्याच मोठ्या काळात सामाजिक स्तरीकरणाची व्यवस्था अस्तित्वात होती. या व्यवस्थेमुळे अपरिहार्यपणे संघर्ष उभे राहत होते. अशी जातिव्यवस्था निर्माण न करता, आपल्याला एकत्र राहता येईल का, याचा आपल्याला शोध घ्यायचा आहे. कालचक्र आपल्याला उलटे फिरविता येणार नाही. कधी काळी सरंजामी व्यवस्थेतील एखादा शेतकरी उपाशी असायचा, मात्र समोर दिसणाऱ्या राजवाड्यातील राजाकडे पाहून त्याला सगळं आलबेल असल्यासारखं वाटत असे. आता या शेतकऱ्यांकडे फोन आले आहेत. गावातील जमीनदार जे खातो-पितो, ते त्यांच्या नजरेतून सुटत नाही. त्यावर काही जण प्रश्नही विचारतील, त्याला का आणि मला का नाही? आपण एका विशिष्ट वांशिक गटाचे आहोत वा स्त्री आहोत किंवा आपली लैंगिक ओळख वेगळी आहे म्हणून आपण कोणी तरी दुय्यम दर्जाचे आहोत, असे मानण्याचा काळ तसेच वाट्याला जे काही जीवन किंवा जी परिस्थिती आलेली आहे ती मुकाट्याने स्वीकारण्याच्या वृत्तीचा काळ कधीच मागे पडला आहे.

**प्रश्न** – म्हणजे मग तुम्हाला निराश वाटायला लावेल असे काहीच नाही काय?

– आता हे पाहा, पुस्तक वाचताना तुम्हाला अधूनमधून माझ्या वाट्याला येणारा तणाव आणि नाउमेद करणारे क्षण दिसतील. कधी कधी गंभीर परिस्थतीचा सामना मी विनोदबुद्धीने करायचो. आपण निराशेला शरण जात आहोत हे लक्षात आले की, व्हाईट हाऊसमधील माझा कर्मचारी वर्ग, आम्ही सगळे बऱ्याच वेळा ही निराशा टाळण्यासाठी विनोदाचा आसरा घेत असू. हे सगळे दुसऱ्या खंडात येईल. सँडी हुक[४४] घटना घडल्यानंतर जेव्हा संसदेने त्याबद्दल काहीच उपाययोजना केल्या नाहीत, त्या क्षणी मनात विचार आला– हे सर्व जे सुरू आहे, ते अनाकलनीय आहे. समस्या वेगळी आहे आणि आपण भलत्याच बाबींवर लक्ष केंद्रित करीत आहोत.

एकाच वेळी असंख्य लोकांना गोळ्या घालून ठार मारले जाते आणि याविषयी समाजातून काहीच हालचाल होताना दिसत नाही, ही बाब माझ्यासाठी अगदीच अनाकलनीय होती. मोठ्या शहरातील गरीब मध्यवस्त्यांमध्ये कृष्णवर्णीय तरुण मुले गोळीबारात ठार मारली जाण्याच्या घटना रोजच्याच आहेत. या घटनांमुळे देशभरातील असंख्य कुटुंबांना भोगावे लागणारे दुःखही कमी नाही. वर्गात बसणाऱ्या पाच-सहा वर्षांच्या मुलांनाही निर्दयपणे ठार मारले गेले. त्या भीषण घटनेवेळी प्रथम पोहोचल्यामुळे तिचे साक्षीदार ठरलेल्या पोलिसांवर आणि इतर तातडीच्या सेवांमधील कर्मचाऱ्यांवर या घटनेचा विपरीत मानसिक परिणाम झाला. त्यातून बाहेर येण्यासाठी त्यांना रजा द्यावी




लागली आणि समुपदेशनाची सोय करावी लागली. कारण, हा भीषण प्रसंग घडून गेल्यानंतरचे विदारक चित्र या मंडळींनी सर्वांत आधी पाहिले होते. आम्ही अक्षरशः काहीच केले नाही. माझ्या प्रशासनाने कार्यपालिकेच्या अधिकारक्षेत्रात मोडणाऱ्या अधिकारांचा वापर करून काही आदेश काढले, नवे कायदे वगैरे असे आम्ही काहीच केले नाहीत.

हे असे क्षण असतात जेव्हा तुमच्या मनात असा विचार येतो की- आपण ज्या धारणा गृहीत धरून किंवा गृहीतकांच्या-ठोकताळ्यांच्या आधारे जगत आहोत किंवा काम करत आहोत, ते सर्व आता समाजातून नाहीसे झाले आहेत. मग तुम्हाला बरे वाटेल असे काही तरी घडते. कोणी तरी तुम्हाला येऊन सांगतो, माझ्या मुलाच्या नोकरीच्या सेवाशर्तींमध्ये कर्मचाऱ्याला वैद्यकीय विम्याची तरतूद नव्हती, मग अफोर्डेबल केअर ॲक्ट मान्य झाला आणि मी त्याच्या मागे लागून त्याला तपासणी करायला भाग पाडले. तपासणीत त्याच्या शरीरात धोकादायक गाठ सापडली. पण ती आता काढून टाकण्यात आली आहे. पुढच्या आठवड्यात नातवाचा जन्म होणार आहे.

**प्रश्न –** तुम्ही थक्क करणारा एक प्रसंग पुस्तकात नोंदवला आहे. मिशेल तुमच्याकडे वळून म्हणतात, 'बघ, ते आपल्याला घाबरले आहेत.' हे अयोग्य आहे, नाही?

बरे, तुमच्या पुस्तकातील सगळ्यात जबरदस्त-परिणामकारक संवाद तुम्ही एक तर मिशेल यांच्या किंवा तुमचा अंगरक्षक-मदतनीस रेजी लव्ह यांच्या वाट्याला दिलेला आहे.

– सगळ्यात जबरदस्त-परिणामकारक संवाद-वाक्ये नेहमी मिशेलचीच असतात, कारण तिचे विचारच तसे आहेत. रेजीचेसुद्धा तसेच आहे म्हणून त्यांच्या वाट्याला असेच संवाद-वाक्ये आलेली आहेत. फक्त त्याची अप्रतिम वाक्ये किती महत्त्वाची आहेत, याबाबत तो अनभिज्ञ आहे, हाच काय तो फरक आहे.

**प्रश्न –** एकूण वांशिक अस्मितेविषयी आपल्याकडची जी परिस्थिती आहे, त्याबद्दल तुमच्या पत्नीचे विचार काहीसे वेगळे आहेत. पहिल्या खंडात तुम्ही वांशिक अस्मिता, वंशद्वेष यांबद्दल फारसे विवेचन करत नाही. तुम्हाला होणाऱ्या विरोधामागे उदारमतवादी-पुरोगामी डेमॉक्रॅटिक पक्षाचे नेते ही प्रतिमा कारणीभूत आहे, की तुम्ही कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष आहात हे कारण त्यामागे आहे?

– या सगळ्याला कोणता घटक किती प्रमाणात कारणीभूत आहे किंवा या विरोधात एखाद्या घटकाचा वाटा किती, हे निश्चित करणे किती अवघड आहे. हे मी पुस्तकात लिहिलेच आहे. अमेरिकेच्या इतिहासावर आणि संस्कृतीवर आपल्या वंशद्वेषाच्या इतिहासाचा प्रचंड असा प्रभाव आहे. त्यामुळे अशी टक्केवारी काढणे अवघड आहे. आता एखादा म्हणाला की, माझ्या मते- राज्यांना आहेत त्यापेक्षा अधिक किंवा केंद्रापेक्षा अधिक अधिकार हवेत; तर या भूमिकेच्या मुळाशी वंशद्वेषाची भावना अजिबातच नाही, असे ठामपणे म्हणणे अवघड आहे. कदाचित स्थानिक बाबींवर स्थानिकांचीच पूर्ण सत्ता आणि अधिकार असावा असे त्यांचे मत आहे, एवढ्याचदेखील त्याचा अर्थ असू शकतो. पण राज्यांना अधिक अधिकार असावेत, ही चर्चा मुळात कशाच्या संदर्भात सुरू झाली तर- ती १९ व्या शतकामध्ये उत्तर व दक्षिणेकडील राज्यांमधील गुलामगिरी टिकवावी-टिकावी की नाही, यावरील वादविवादातून झाली. त्यानंतर जिम क्रो कायदे आणि बसिंगला[४५] झालेला विरोध यांचा संदर्भ या मागणीला आहे. या संदर्भांची किंवा कारणांची यादी बरीच मोठी आहे. आता मला होत असलेला विरोध हा मी कृष्णवर्णीय आहे म्हणून किती

आणि उदारमतवादालाच-पुरोगामी भूमिकांनाच असलेल्या विरोधामुळे किती, हे सांगणे कठीण आहे. क्लिंटन दांपत्याच्या विरोधातदेखील असेच विषारी आणि विखारी हल्ले झालेच की! या विरोधामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे १९६० च्या दशकात आपल्या देशात सुरू झालेला आपल्या देशाची संस्कृती म्हणजे नेमके काय याबद्दलचा सार्वजनिक रीत्या झालेला वाद-विवाद. व्हिएतनाम युद्धाबाबत मतभेद, अमली पदार्थांचा वाढता वापर, लैंगिक संबंध अधिक मुक्त होणे, रॉक आणि रोल संगीत आणि फिलीस श्लॅफ्ली[४६] व बेला बझ्झुग[४७] यांच्यातील चर्चा इत्यादी या वाद-विवादाचे काही पैलू होते.

पण मी अधिकारपदावर येणे म्हणजे प्रस्थापितांकडून सत्ता निसटण्याचे द्योतक होते याबाबत कोणाचेच दुमत असेल, असे मला वाटत नाही. सर्वोच्च सत्तास्थानी माझ्या असण्याने अनेक लोक चिंतित झाले- काही मंडळी उघडपणे, तर काही आपल्या नेणिवेत चिंतित झाली. या चिंतेचा फायदा उठविण्यासाठी काही मंडळी टपून बसलेली होतीच की. मी आणि मिशेलने हाताच्या मुठी वळवून त्या एकावर एक ठेवल्या किंवा समोरून एकमेकांना भिडविल्या तर- फॉक्स न्यूजवरील एखाद्या चर्चेच्या कार्यक्रमातील एखादा सहभागी जेव्हा विचाराचा सशस्त्र अतिरेकी भेटल्यावर जसे हाताच्या मुठी एकावर एक ठेवतात किंवा त्या एकमेकांना भिडवितात तसेच तर हे दोघे करीत नाहीयेत ना, अशा भावनेने. तेव्हा हा केवळ सूचक उल्लेख नसतो. त्यातून काय संदेश दिला जात आहे, ते स्पष्टच असते. आता अफोर्डेबल केअर ॲक्टला विरोध करण्यासाठी जे काही फलक तयार करण्यात आले, त्यातील एका फलकावर जर नाकातून एक हाड आरपार गेलेल्या अशा आफ्रिकेतील मांत्रिकाच्या वेषातील माझे चित्र काढलेले असेल, तर तो फलक धरणाऱ्यांना काय म्हणायचे आहे किंवा त्यांच्या मनात काय आहे हे समजणे अवघड नाही. आणि हे पाहा- मी पदावर आल्यानंतर बऱ्याच काळानंतर जेव्हा रिपब्लिकन पक्षाचे विविध निर्वाचित पदांवरील लोक एकमेकांना ई-मेल्स पाठवतात आणि त्या जेव्हा सार्वजनिक होतात, तेव्हा त्यात काय असते? तर, मिशेलची तुलना एखाद्या प्राण्याशी केलेली असते किंवा माझा जन्म हा माझी आई आणि एखाद्या प्राण्याच्या संबंधातून झाला, असा मजकूर असतो. ही मंडळी रिपब्लिकन पक्षाची विविध निर्वाचित पदांवरील आहेत. कोणी सोमाजी-गोमाजी नाहीत. तेव्हा असा एक अंत:प्रवाह आहेच की.

आता मी कृष्णवर्णीय आहे म्हणूनच हे सगळे व्हायला लागले का किंवा त्यामुळेच अशी मते व्यक्त व्हायला लागली का? तर, नाही. आपल्या देशात जी एकूण चर्चा होते, त्यामध्ये असे मुद्दे फार पूर्वीपासून केंद्रस्थानी होते. चर्चेच्या केंद्रस्थानी केवळ वांशिक अस्मिता आणि वंशद्वेषाची भावना हेच मुद्दे होते असे नाही, तर आर्थिक वर्ग किंवा वर्गीय भावना (आता आपल्याला आर्थिक वर्ग याबद्दल फारसे बोलायला आवडत नाही, हा भाग अलाहिदा) तसेच स्त्रियांचे प्रश्नसुद्धा केंद्रस्थानी होतेच. आता या संदर्भातील आणखी काही मुद्दे पाहू. अमेरिकेतील काही लोक अमेरिकेतल्या इतर काही लोकांपेक्षा 'अधिक' अमेरिकन आहेत, तसेच काही जण आपल्या राजकीय व्यवस्थेचे पूर्णार्थाने सदस्य, नागरिक व्हायला इतरांपेक्षा अधिक लायक आहेत- या धारणा पूर्वीपासूनच आहेत की. 'आम्ही संयुक्त राज्य अमेरिकेचे लोक'[४८] असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा लोक या संकल्पनेच्या व्याप्तीत कोणाकोणाचा समावेश होतो, हादेखील चर्चेचा मुद्दा राहिलेला आहे. तो नेहमीच तीव्र मतभेदांचा मुद्दा राहिला आहे. आपल्याकडे कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष नव्हता, तेव्हादेखील हे सुरू होतेच. या सर्व मुद्यांमध्ये राजकारणाला आणि चर्चाविश्वाला आकार देण्याची बरीच ताकद आहे.

**प्रश्न –** आपण एक लेखक आहोत, याची तुम्हाला प्रकर्षाने जाणीव होती म्हणून हे पुस्तक लिहायला इतका वेळ लागला का?

– पुस्तक लिहीत असताना असा एक काळ होता, जेव्हा मी स्वतःलाच रागवत राहायचो. का, तर मी एकेका परिच्छेदावर एक-एक दिवस विचार करायचो. माझ्या लक्षात आले की, असे करत बसण्याइतपत माझ्याकडे वेळ नाही. मला थांबलेच पाहिजे.

**प्रश्न –** आता कंपन्यांनी आपापले कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी जी काही धोरणात्मक चौकट आखायची होती, त्याबद्दल तुम्ही लिहायला घेतले तेव्हा स्वतःशीच ठरवले होते का की- आपण ही हकिगत अगदी गद्यप्राय लिहायची, त्यात कुठेही काव्यात्मक शैलीत लिहायचे नाही.

– या पुस्तकाच्या माध्यमातून मी एक कथा सांगत आहे. पण त्याचबरोबर मी या काळाचा इतिहासही मांडतो आहे. निव्वळ घटना-घडामोडी सांगणारी हकिगत लिहीत

असतो, तर काही बाबी मी वगळल्या असत्या. कंपन्यांनी आपापले कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी ज्या धोरणात्मक चौकट आखायच्या, त्या प्रक्रियेबाबत मी मग तपशिलाने लिहिले नसते किंवा मला डॉड-फ्रँक[४९] कायद्याच्या तपशिलात जायची गरज नव्हती. पण इतिहासाबद्दल लिहिणारा एक लेखक म्हणून मला हे तपशील देणे आवश्यक आहे. मी या वेळी काय आणि कसा विचार करीत होतो, हे पुढच्या पिढीतील- भविष्यातील लेखक-इतिहासकार व अभ्यासकांना हे सर्व कळावे, या दृष्टीने मी केलेला हा आतापर्यंतचा सर्वोत्तम प्रयत्न आहे. मी सांगत असलेली हकिगत ही माझी बाजू आहे. लोकांना हे समजेल याची मला शाश्वती हवी होती.

फक्त एकापाठोपाठ घडणाऱ्या घटना-घडामोडींची निव्वळ हकिगत देण्यावर मी भर दिला असता, तर एखादे प्रकरण अशा एका उत्कंठावर्धक क्षणावर संपते आहे काय की, जेणेकरून वाचकांनी पुस्तक पुढे वाचत राहावे याचा इतका विचार केला नसता. जागतिक पातळीवरच्या एखाद्या नेत्याच्या लकबीचे मी अचूक वर्णन केले आहे काय, जेणेकरून त्या नेत्याचे व्यक्तिमत्त्व अधिक खुलून दिसेल किंवा त्याचे चित्रण अधिक वास्तववादी झाले आहे काय, याचीही चिंता मग मी केली नसती. पुस्तकात काही ठिकाणी कथनातील जो एक प्रवाहीपणा असायला लागतो, तो मी जाणूनबुजून सोडून दिल्याचे दिसेल. का, तर काही बाबी मला अधिक तपशीलवारपणे आणि स्पष्टपणे सांगायच्या आहेत. पुस्तकात काही ठिकाणी अनेक वर्णने आहेत, जी माझ्या मते उत्तम अशी आहेत. ती आहेत तशीच ठेवावीत, असे मला वाटायचे. मात्र पुस्तकाचे संपादक विचारायचे, हे ठेवायची खरंच गरज आहे काय? मग मी म्हणायचो- माफ करा, पण मला हे वर्णन आवडलेले आहे आणि मला ते तिथेच ठेवायचे आहे.

**प्रश्न –** जी-२० शिखर परिषदेत सहभागी होणाऱ्या मंडळींना देण्यात येणारी सुमार दर्जाची पेन...

– तुम्ही जी-२० शिखर परिषदेत उपस्थित असता आणि आपली भूमिका मांडत असता. मात्र त्याच वेळी हे सर्व काम कसे चालते याचाही विचार करत असता. या परिषदेचे स्मरण राहावे म्हणून त्याचे चिन्ह असेले पॅड आणि पेन्सिल तिथे असते, चघळायला दिल्या गेलेल्या छोट्या गोळ्या असतात आणि सुमार दर्जाची पेनही असतात. जी-२० परिषदेमध्ये एक प्रकारचा डामडौल असतो आणि खरे सांगायचे झाले तर, या अशा परिषदा त्या अमेरिकेतील स्थानिक पातळीवरचा एखादा व्यापारमेळावा यात फारसा गुणात्मक फरक नसतो. दोन्ही ठिकाणी निव्वळ शोभेसाठी ठेवलेल्या निरुपयोगी वस्तू असतात. तिथे एक प्रकारचे सवंगतेचे वातावरण असते. इथल्या घटनाक्रमांचा लोकांना परिचय करून देणे आणि हे काही तरी अगदीच परके, न समजण्यासारखे आहे असे लोकांना वाटू नये, हा यामागचा माझा हेतू आहे.

**प्रश्न –** परराष्ट्र धोरणाची चर्चा मी पुढचा खंड आल्यानंतरसाठी राखून ठेवणार आहे. माझ्या या विधानाचा दुसरा अर्थ असा की- आपण बिन्यामिन नेतान्याहू[५०] यांचा एकदाही उल्लेख न करता दोन तास बोलत आहोत. पण नेतान्याहू आणि त्यांच्यासारख्या तुम्हाला न रुचणाऱ्या मंडळींबद्दल तुम्ही ज्या पद्धतीने लिहिले आहे, त्याबद्दल मला एक प्रश्न विचारायचा आहे. नेतान्याहू आणि मॅककोनेल व इतर काही मंडळींबाबत लिहिताना तुम्ही मोजून-मापून लिहिले आहे. त्यांच्या भूमिका आणि त्यांची वागणूक वाचकांना समजून घेता यावी, म्हणून तुम्ही मोठी संदर्भचौकट पुरवली आहे.

– जगाकडे पाहण्याचा माझा आणि नेतान्याहू यांचा दृष्टिकोन वेगवेगळा आहे, ही बाब उघडच आहे. मॅककोनेल यांच्याबद्दलही असेच आहे. मात्र माझ्या मते, पुतिन यांच्याप्रमाणेच नेतान्याहू यांचे व्यक्तिमत्त्वही रोचक आणि चित्तवेधक आहे. ज्या परिस्थितीत त्यांचा राजकीय उदय झाला- याच परिस्थितीने त्यांच्या राजकारणाला आकार दिला- ती, तिचा एकूण इतिहास माहिती असल्याशिवाय किंवा या सगळ्याचा संदर्भ घेतल्याशिवाय तुम्हाला ही मंडळी किंवा रशिया किंवा इस्राईल समजणार-उमगणारच नाही. आता मी अशा पार्श्वभूमीबाबतचे तपशील दिले आहेत याचा अर्थ त्यामागे माझे काही तरी राजकीय फायद्या-तोट्याचे गणित आहे अथवा त्या दृष्टीने मी विचार करीत आहे किंवा जुने राजकीय हिशोब चुकते करीत आहे, असा होत नाही. माजी राष्ट्राध्यक्ष असण्याचा एक फायदा हा की- तुम्ही काय जे लिहाल, त्याचे काय आणि कसे परिणाम होतील याचा विचार करीत बसावा लागत नाही. माझे पुस्तक वाचताना ओबामा आणि या माणसाची काही तरी खुन्नस आहे, असे दिसते. आम्ही ओबामांचे पुस्तक वाचत असल्यामुळे आम्ही त्यांचीच बाजू घेतली पाहिजे आणि तो दुसरा माणूस अगदीच फालतू, नालायक

असणार– असा वाचकांनी विचार करावा किंवा अशी त्यांची समजूत व्हावी, असे मला वाटत नव्हते. आता इस्रायलच्या आजूबाजूची राजकीय परिस्थिती, त्या देशाचा इतिहास, त्यांचे अनुभव, त्यांच्या परिसरात पाळेमुळे असलेले व त्या देशाला ठरणारे खरेखुरे धोके– या सगळ्यांच्या पार्श्वभूमीवर इस्रायलमधील लोक हे विशिष्ट धाटणीने आपल्या देशाची ताकद वापरली गेली पाहिजे असे म्हणणाऱ्या नेत्याच्या मागे का उभे राहतात आणि या दृष्टिकोनात काही बाबींबद्दलची ओबामांची मते यांच्यात परस्परविरोध का उत्पन्न होऊ शकतात हे वाचकांना समजण्यासाठी मी हे सगळे लिहिलेले आहे. भविष्यात इस्रायलच्या राजकारणात सक्रिय होऊ शकेल असा त्या देशातील एखादा तरुण किंवा तरुणी हे वाचेल, असे गृहीत धरून मी पार्श्वभूमी आणि संदर्भचौकटी यांच्याकडे लक्ष दिले आहे.

**प्रश्न –** राष्ट्राध्यक्ष असणे हीच काहीशी जगावेगळी आणि विलक्षण बाब आहे. हा जगावेगळेपणा किंवा विलक्षणपणा तुम्हाला लिखाणात पकडता आला आहे, असे तुम्हाला वाटते का? तुमचे हे पुस्तक एका राष्ट्राध्यक्षाचे आपल्या कारकिर्दीबद्दलच्या आठवणी सांगणारे आहे. या त्याच्या स्वरूपामुळे लिहिताना आपण काय आणि कसे लिहू शकतो यावर बंधने आली, असे तुम्हाला वाटते का?

– राष्ट्राध्यक्षपदाचे अंगभूत असे एक विचित्र वैशिष्ट्य आहे आणि ते इतरांपासून तुमचे आपोआप विलगीकरण करते. म्हणजे तुम्ही सहज सुचले म्हणून थोडा फेरफटका मारून येऊ शकत नाही, उद्यानात सहज बसून सँडविच खाऊ शकत नाही किंवा एखाद्या गाण्याच्या कार्यक्रमाला जाऊ शकत नाही. हे सर्व सुरक्षिततेच्या कारणांमुळे आणि पदाच्या कामाच्या–जबाबदाऱ्यांच्या स्वरूपामुळे होते. राष्ट्राध्यक्षपदावर असताना मला वारंवार पडणाऱ्या एका स्वप्नाबद्दल मी लिहिले आहे. या स्वप्नात मी एका रस्त्यावरून चालत जात आहे. मी कोण आणि काय आहे याची आजूबाजूच्या लोकांपैकी एकालाही कल्पना नसते. आपण कोण आहोत हे कोणालाच माहिती नाही याचे काही एक महत्त्व आणि मोल आहे. ते अनुभवल्याशिवाय तुम्हाला त्याचे हे महत्त्व किंवा मोल कळत नाही. आणि हे बघा– या ज्या काही अडचणी आहेत, त्या काही सामान्य स्वरूपाच्या नाहीत. तुम्ही यशाचा विशिष्ट टप्पा गाठल्यावरच तुम्हाला भेडसावणारी ही एक उच्च प्रतीची समस्या आहे. मी याबद्दल तक्रार करत नाही, मात्र हा जगावेगळाच एक अनुभव आहे.

हे असे असले तरी राष्ट्राध्यक्षपदावरच्या किंवा त्या पदासाठीची निवडणूक लढविणाऱ्या माणसाला विशेष असा एक फायदा होतो. आपल्या समाजात विविध स्तर आहेत आणि एरवी तुम्ही त्यांपैकी काही मोजक्या घटकांतील लोकांनाच भेटता. पण पदामुळे आता तुम्हाला अधिक स्तरांतील लोकांना भेटता येते. त्यामुळे तुम्हाला देशातील विविधतेचा आणि समानतेचा अधिक चांगला अंदाज येतो. त्याचा तुम्हाला निश्चित फायदा होतो. तुम्ही त्यांचे म्हणणे नीट ऐकले, तर ते सगळे तुम्ही आत्मसात करता. हा अतिशय महत्त्वाचा आणि अर्थपूर्ण असा फायदा आहे. माझ्या ठायी आजही जो आशावाद आहे, त्यामागील अनेक कारणांपैकी जनसंपर्क हे एक मोठे कारण आहे.

**प्रश्न –** ज्यांना तुम्ही खऱ्या अर्थाने तुच्छ लेखता, अशा लोकांचा एक गट आहे. तो म्हणजे २००८ च्या वित्तीय संकटाच्या काळातील वॉल स्ट्रीटवरील असे काही लोक, जे श्रीमंत आहेतच आणि तुमच्या मते ज्यांना आजूबाजूच्या जगाशी काहीच देणे–घेणे नसून त्यांचा उद्देश केवळ अधिक श्रीमंत होणे हा आहे.

– तुम्ही २००८ चे वित्तीय संकट आणि त्यानंतरच्या घडामोडी यांच्यावरील प्रकरणे वाचलीत, तर मला अशा लोकांबद्दल सहानुभूतीच वाटते हे तुमच्या लक्षात येईल. त्यांनी कष्ट केले आणि ते प्रचलित नियमांच्या चौकटीत राहूनच ते वागले (अर्थात या नियमांबद्दलची त्यांची जी समज होती, तीस अनुसरून त्यांच्या मते जी चौकट निर्माण होते, त्याच्या अधीन राहून), हे मी स्पष्ट करतो. मात्र जगातील इतर लोक कसे जगतात, हे या मंडळींना समजतच नाही किंवा त्याच्याशी त्यांना काही देणे–घेणे नाही– ही माझी धारणा आहे, हेदेखील मी स्पष्ट करतो. आजूबाजूच्या घटनांविषयी त्यांना कसलेच कुतूहल नाही. निराशावादाला बळकटी देणारी एकूण धोकादायक अशी ही परिस्थिती आहे. लुइझियाना राज्याच्या किनाऱ्याजवळील तेलविहिरीत २०१० मध्ये स्फोट होऊन समुद्रात तेलगळती सुरू झाली तेव्हा त्या विहिरीची मालकी ज्या बीपीकडे[५१] होती, तिचे त्या वेळचे प्रमुख उघडपणे काय म्हणतात? तर, हे सर्व लवकरात लवकर उरकून जाऊन आपले आयुष्य पूर्वपदावर यावे, ही आपली एकमेव इच्छा आहे. मासेमारी करणाऱ्या मंडळींची उपजीविकाच आणि किनारपट्टी

उद्‌ध्वस्त होत असताना अशी विधाने केली जातात. या मंडळींमध्ये आजूबाजूच्या जगाबद्दल एक प्रकारची अनभिज्ञताच आहे.

राजकारण आणि परराष्ट्र धोरणाचे जे जग आहे– ज्यात काय चालते, हे आपल्याला दिसत नाही आणि जिथे आपल्याला प्रवेशच नाही असे लोकांना वाटते– ते लोकांना अधिक चांगल्यापणे समजले पाहिजे, हा पुस्तक लिहिण्यामागचा माझा एक मुख्य उद्देश होता. विविध व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचे काही विचित्र वाटतील असे खास पैलू आणि त्यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचे इतके वर्णन करण्यामागचा माझा हेतू ही मंडळीदेखील अंतिमतः माणसेच आहेत, ते कोण आहेत हे तुम्ही समजून घेऊ शकता आणि मग त्यांचे मूल्यमापन करू शकता, याची लोकांनी आठवण करून देणे हा आहे.

आता एक बाब रोचक आहे. शाळा–कॉलेजमधील काळात तुम्ही विद्यार्थी–जगतातील गट–तट, दादागिरी, अन्याय होणे आणि संधी नाकारली जाणे, उथळपणा हे सगळे पाहता–अनुभवता. तुम्हाला वाटते की, मी एकदाचा मोठा होऊन यातून बाहेर पडलो की, पुन्हा असल्या गोष्टी पाहायला लागणार नाहीत. मग तुम्ही राज्य विधान मंडळात जाता. तिथेदेखील तुम्हाला मूर्खपणा आणि क्षुद्रपणा दिसतो. मग तुम्ही संसदेत जाता, मग जी–२० परिषदेला जाता. तिथे सर्व वातावरण अधिक सुसंस्कृत असेल; लोक अधिक विचारी, काटेकोर व नि:स्वार्थी असतील, अशी तुमची अपेक्षा असते. मग तुमच्या लक्षात येते की, तुम्ही शाळा–कॉलेजच्याच वातावरणात परत आला आहात. माणसे एकमेकांशी सर्वत्र आणि सर्व काळात सारखीच वागतात. या वागण्याच्या पद्धतीचे रूप पालटते आणि त्याची अभिव्यक्ती वेगवेगळ्या पद्धतीने होते. लोकांच्या स्वभावातील–व्यक्तिमत्त्वातील शक्तिस्थाने व मर्मस्थाने–वैगुण्ये सगळ्या संस्कृतींमध्ये सारखीच असतात आणि या सगळ्या गोष्टी राजकारणाचा भागच आहेत. हे वाचून लोकांना बळ मिळावे, अशी माझी इच्छा आहे. हे पुस्तक कोणी वाचलेच पाहिजे असे विचारलेत, तर मी म्हणेन– जगाबद्दल नुकतेच कुतूहल जागृत झालेल्या आणि ज्याला किंवा जिला काही तरी अर्थपूर्ण करायचे आहे, अशा तरुणाने किंवा तरुणीने हे पुस्तक वाचले पाहिजे. मला असा वाचक अभिप्रेत आहे. माझी इच्छा आहे की, त्यांनी हे पुस्तक वाचावे आणि म्हणावे– बरे, हे सगळे काही फार अवघड वाटत नाही. यात मी काही तरी योगदान देऊ शकतो आणि परिस्थिती बदलण्यात हातभार लावू शकतो.

(हा तिसरा व अंतिम भाग अंशत: संपादित केला आहे.)

**टीपा**

४४. सँडी हुक घटना– २०१२ मध्ये कनेक्टिकट राज्यातील सँडी हुक प्राथमिक शाळेत घुसून एका माथेफिरूने अंदाधुंद गोळीबार केला. त्यात २० विद्यार्थ्यांसह एकूण २६ जण ठार झाले.

४५. बसिंग– अमेरिकेत शासकीय शाळांमध्ये साधारणपणे त्या–त्या शाळांच्या परिसरातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. विविध शहरांमध्ये कोणत्या भागात कृष्णवर्णीय घरे घेऊ शकत नाहीत किंवा राहू शकत नाहीत, याबद्दल कडक नियम आणि कायदे होते. त्यामुळे बहुतांश शाळांमध्ये एकाच वांशिक गटाचे विद्यार्थी असायचे. विविध न्यायालयीन निर्णयांनंतर शासकीय शाळांमधील विद्यार्थिवर्ग बहुवांशिक व्हावा, यासाठी एकाच वंशाचे प्राबल्य असलेल्या भागातील त्या–त्या वंशाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरातील शाळेपेक्षा त्याच शहरातील काहीशा दूरवरच्या शाळेत दाखल करण्यात आले. विद्यार्थ्यांची वाहतूक बसमधून केली गेली, म्हणून ‘बसिंग’ असा या धोरणाचा उल्लेख होतो.

४६. फिलिस श्लॅफ्ली– अमेरिकेतील प्रसिद्ध परंपरानिष्ठ आणि स्त्रीस्वातंत्र्य–स्त्री–पुरुष समता–स्वातंत्र्यविरोधी लेखिका व कार्यकर्त्या.

४७. बेला बझ्झुग– डेमॉक्रॅटिक पक्षाच्या लढाऊ नेत्या आणि प्रसिद्ध स्त्रीवादी कार्यकर्त्या. संसदेच्या कनिष्ठ सभागृहाच्या– प्रतिनिधी गृहाच्या– काही काळ सदस्य.

४८. आम्ही संयुक्त राज्य अमेरिकेचे लोक– या वाक्यांशाने अमेरिकेच्या राज्यघटनेची सुरुवात होते.

४९. डॉड–फ्रँक वॉल स्ट्रीट रिफॉर्म अँड कंझ्युमर प्रोटेक्शन ॲक्ट– २००८ च्या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या वित्तीय क्षेत्रावरील नियंत्रणे अधिक कडक करणारा २०१० चा कायदा. यासंदर्भात ओबामांनी जो प्रस्ताव मांडला, त्याचे विधेयकात रूपांतर करून संसदेकडून तो मान्य करून घेण्याचे मुख्य श्रेय डेमॉक्रॅटिक पक्षाचे नेते व सिनेटच्या बँकिंगविषयक समितीचे अध्यक्ष ख्रिस डॉड आणि डेमॉक्रॅटिक पक्षाचे नेते व अमेरिकी संसदेच्या कनिष्ठ सभागृहांच्या– प्रतिनिधीगृहाच्या– वित्तीय सेवाक्षेत्र विषय समितीचे प्रमुख बर्नी फ्रँक यांचे असल्यामुळे कायदा त्यांच्या दोघांच्या नावाने ओळखला जातो.

५०. बिन्यामिन नेतान्याहू– इस्राईलचे पंतप्रधान

५१. बीपी– ब्रिटिश पेट्रोलियम. जगातील अग्रगण्य गणल्या जाणाऱ्या तेलउत्पादक कंपन्यांपैकी एक.

**अनुवाद : अभय दातार,** नांदेड

abhaydatar@hotmail.com

(The Atalantic या इंग्रजी नियतकालिकात १६ नोव्हेंबरच्या अंकात **जेफ्री गोल्डबर्ग** यांनी घेतलेली ही मुलाखत आहे.)

सूरज येंगडे

# दलितांचे दुःख व अश्रू मध्यमवर्गीय भारतीयांचे होत नाहीत

(भाग ३)

मी स्वतःवरची टीकाही स्वतःच निर्माण करेन. जात हा प्रस्तुत ठरणारा घटक आहे. तुम्ही दलित नायक का निर्माण केला नाहीत? 'आम्हाला भारतातल्या दडपशाहीविरोधात लढायचं आहे' असं लोक म्हणतात; तेव्हा मी विचारतो, 'कोणाच्या दडपशाहीविरोधात लढायचंय? आणि तुम्हाला का लढायचंय?' हे अतिशय महत्त्वाचं आहे. जाणीवपूर्वक गोंधळात टाकलेल्या क्षेत्राचा ताबा घेण्यासाठी आता आमच्यासारखे लोक पुढे येत आहेत आणि हा प्रवास अतिशय अवघड होता. मी स्वतःचं पुनरुज्जीवन साधू नये, असं तुम्हाला वाटतं का? मी स्वतःची मुक्ती साधू नये, असं तुम्हाला वाटतं का? शिक्षण, स्वतःचा सूर, सौंदर्य, बुद्धिमत्ता या सगळ्या सामर्थ्यानिशी, तुम्ही म्हणाल त्या अटीची पूर्तता करत मी आता सज्ज झालोय; तर तुम्हाला माझ्याकडून हे स्थान हिरावून घ्यायचंय का? तुम्ही मला खाली खेचू पाहताय का?

**प्रश्न –** 'द रॅडिकल आंबेडकर' या पुस्तकाचं तुमच्यासोबत सह-संपादन करणारे आनंद तेलतुंबडे आणि इतर दलित कार्यकर्त्यांना या वर्षी आंबेडकर जयंतीला अटक करण्यात आली. भीमा-कोरेगाव प्रकरणात यूएपीएसारखा असाधारण कायदा वापरून ही कारवाई झाली. सगळीकडे टाळेबंदी लागू केली जात असताना जागतिक साथीच्या काळात हे घडलं. टाळेबंदीमध्येही यूएपीएचा [१०] वापर थांबलेला नाही. हे अटकसत्र आणि इतर अनेक राजकीय कैद्यांवरील कारवाई, असाधारण कायद्यांचा सर्रास वापर- याचा भारतीय लोकशाहीवर कोणता परिणाम होईल?

– हे भारत सरकार ब्रिटिश काळातील कायदे वापरतं आहे. ते ब्रिटिश साम्राज्याची संतती आहेत. ब्रिटिश काळातील जुलूमशाहीशी आपले संबंध जोडलेले असतील, तर आपण भारतीय असल्याचा दावा करू शकत नाही. असं म्हटल्याने आपल्यासाठी लढलेल्या पूर्वजांच्या त्यागाचं अवमूल्यन होईल. देशद्रोहाचे कायदे ब्रिटिश राजवटीने तयार केले. ते परके होते. त्यांना आपल्याबद्दल काहीच सहानुभूती वाटत नव्हती. त्यांना शोषण करायचं होतं आणि शक्य तितकं ओरबाडून न्यायचं होतं. कधी ना कधी आपल्याला हे सोडून जावं लागेल, हे त्यांना माहीत होतं.

देशद्रोहाचे कायदे आणि यूएपीए 'बेकायदा कृती (प्रतिबंध) अधिनियम' हे मूलतः दलितविरोधी व आदिवासीविरोधी कायदे आहेत.

**प्रश्न –** आणि मुस्लिमविरोधीसुद्धा आहेत.

– होय, हे कायदे मुस्लिमविरोधीसुद्धा आहेत. काँग्रेस सरकारने अनेक तरुण मुस्लिम मुलांना पकडून तुरुंगात खितपत ठेवलं. परंतु, टाडा दहशतवादी व विध्वंसक कृती (प्रतिबंध) अधिनियम आणि पोटा दहशतवाद प्रतिबंधक अधिनियम आणि विशेषतः यूएपीए या कायद्यांशी निगडित

आकडेवारी पाहिली, तर त्याचा सर्वाधिक फटका आदिवासींना बसल्याचं दिसतं.[११] आदिवासींना सरकार नक्षलवादी म्हणतं, त्यामुळे त्यांच्यावर प्रमाणाबाहेर संख्येने कारवाया झालेल्या आहेत. भारतासमोरचा सर्वांत मोठा अंतर्गत धोका नक्षलवादाचा आहे, असं मनमोहनसिंग म्हणाले होते. पण भारतासमोरचा सर्वांत मोठा अंतर्गत धोका- विविध संघटनांद्वारे कार्यरत असलेल्या- ब्राह्मणवादाचा आहे, असं त्यांनी म्हणायला हवं होतं.

आदिवासी भागांमध्ये नेमणूक झालेल्या सैनिकी अधिकाऱ्यांच्या जातीही तुम्ही पाहा. त्यातील बहुतांश उच्चजातीय आहेत. आणि हे बरोबर परिणामकारक ठरतं, कारण त्यांच्याकडे सहानुभूती नसते. तुम्ही, मी आणि इतर अनेक जण इथे बसलोय, तिकडे जंगलात काय होतंय हे आपल्याला कळणारही नाही. आदिवासी गावात एखादा बनिया काय करत असतो? तो कर्ज देतो. या समुदायांकडची पिढ्यान्‌पिढ्या राखलेली संपत्ती तो घेतो. अशा प्रकारच्या ब्राह्मणी दडपशाहीविरोधात आदिवासी लढत आहेत, ते मूलतः राज्यसंस्थेविरोधात आहेतच असं नाही. पण द्विज कॉम्रेड त्यांना राज्यसंस्थाविरोधी म्हणून पुढे आणण्याचा प्रयत्न करतात.

हे कायदे तत्काळ रद्द व्हायला हवेत. लोकशाहीमध्ये त्यांना जागा नाही. मी अशा प्रकारे दलित-आदिवासी हस्तक्षेप करतो, तेव्हा या समूहांची दुरवस्था मला अधोरेखित करायची असते. इतर प्रभुत्वशाली जाती चळवळीला मदत करत आहेत. भीमा-कोरेगाव प्रकरणातही आपण हे पाहिलं आहे. कोणीही बोलायला नसलेल्या अवस्थेत सुनावणीविना लोकांना १८० दिवस तुरुंगात डांबण्यात आलेलं आहे! हा भारतातला ग्वान्टानामो बे तुरुंगासारखाच प्रकार आहे.

हे उत्पादित नक्षलवादी आहेत, उत्पादित राष्ट्रद्रोही आहेत, उत्पादित मतभिन्नतादर्शक आहेत. तुम्ही आणि मी सरकारशी असहमत आहोत; मग काय आपण नक्षलवादी होतो काय? शिवाय, दलित परिवर्तनकारी चळवळ दडपण्यासाठी सरकार हे करतं आहे. दलितांना नक्षलवादी व्हायचं नाहीये. पण ते नक्षलवादी आहेत, असं म्हणून सरकार दलितांना सातत्याने धमकावतं. यातून दलितांना सहजपणे बाजूला सारता येतं. इथे दलितांना मधे न आणणं राज्यसंस्थेसाठी सोईचं आहे, कारण दलित आंबेडकरी दृष्टी ठेवून यात गुंतले, तर राज्यसंस्थेसाठी मोठी समस्या निर्माण होईल.

हे कायदे रद्द केले, तर दडपशाहीविरोधात सक्रिय प्रकारचं ऐक्य तुम्हाला दिसून येईल. हिंसा असेल, तर त्याला मिळणाऱ्या प्रतिसादामध्ये हिंसा असणारच. माझ्या डोळ्यांसमोर तुम्ही माझ्या आईवर बलात्कार करता, मग आणखी दुसरी व्यक्ती माझ्या मुलीवर बलात्कार करायला पुढे येते, मग तुम्ही माझ्या वडिलांचा गळा चिरता- अशाने मला मानसिक आघात विसरताच येत नाहीत. या देशातल्या दलित व आदिवासींवरील आघातांची पुनरावृत्ती भारतीय राज्यसंस्था करते आहे. त्यांना हिंसक प्रतिक्रिया हवी आहे, कारण हिंसा झाली नाही, तर- हा फुकोविचारातला साधा युक्तिवाद आहे- पोलिसी राज्यसंस्थेची गरज उरणार नाही; किंबहुना, राज्यसंस्थेचीच गरज उरणार नाही. सैनिकी कंत्राटं आणि भारतीय राज्यसंस्थेचं सैनिकीकरण यांवरील खर्चाला ते वैधता देत आहेत. या क्षेत्रामध्ये माहितीच्या अधिकाराचा कायदा लागू होत नाही, त्यामुळे मागल्या दाराने काय होतं आणि अब्जावधी डॉलरांचे करार कसे होत आहेत, हे आपल्याला कळत नाही. कडक शिस्त लावल्याने दैनंदिन जीवन या क्षेत्राच्या पथ्यावर पडतं आणि दलित नि आदिवासी लोकांच्या शरीरांवर त्यांना सातत्याने मालकी सांगता येते.

असंच ब्राह्मणांच्या वसाहतींमध्ये केलं, तर संवाद बदलेल. केवळ दलित व आदिवासींच्या वसाहतींमध्येच हे घडत असल्यामुळे विशिष्ट प्रकारचा प्रतिसाद दिला जातो.

अजूनही काश्मिरी पंडितांचा प्रश्न प्रस्तुत आहे. त्यांना त्यांचा त्याग आणि त्यांच्यातल्या जीव गमावलेल्यांना विसरता येत नाहीत. आम्ही प्रत्येक जीवाचा आदर करतो, विशेषतः विनाकारण कत्तल झालेल्यांबाबत अशीच भावना बाळगतो. पण काश्मिरी पंडितांचा प्रश्न संपूर्ण हिंदूंवरील दडपशाहीचं प्रतिनिधित्व करत असल्याप्रमाणे राज्यसंस्था कसा वापरते, ते पाहा. दलित किंवा आदिवासींची दडपशाही संपूर्ण हिंदूंवरील दडपशाही का मानली जात नाही?

मुंबईत रमाबाईनगर इथे दलित वस्त्या जाळल्या गेल्या,[१२] तेव्हा तो भारतावरचा हल्ला मानला गेला का? हा हिंदू धर्मावरचा हल्ला होता का? म्हणजे ब्राह्मणी प्रजासत्ताकामध्ये दलित व आदिवासी यांचा काही वाटा नाही, हे यावरून सिद्ध होतं. त्यांचे प्रश्न हे भारतीय ठरत नाहीत. त्यांचं दुःख व अश्रू प्रत्येक मध्यमवर्गीय भारतीयाचे

अश्रू होत नाहीत. हे सगळं झाल्यानंतरही राज्यसंस्था त्यांच्यात कोणती गुंतवणूक करते आहे? त्यांच्यासमोर केवळ आरक्षणाचे तुकडे फेकले जातात. त्याचीही अंमलबजावणी होत नाही. माझी टीका या पार्श्वभूमीवरची आहे.

नवउदारमतवादी हितसंबंधांना उलटंपालटं करणं गरजेचं आहे. याबद्दलचं संभाषण अवघड आहे. मी ते करतोय, ते पुढे न्यायचा प्रयत्न करतोय आणि माझ्यावरही बरीच टीका झालेली आहे, पण मी यावर बोलत राहणार आहे.

**प्रश्न –** दलितांवरील/दलितांविरोधातील जातीय हिंसाचाराला, विशेषतः लैंगिक हिंसाचाराला इतकं अभय कसं मिळतं?

– शिक्षेबाबत अभय मिळण्याची संकल्पना जातीय हिंसाचारामध्ये मुळातच आहे. जातिव्यवस्थेच्या कामकाजामध्ये शिक्षेपासूनचं अभय अनुस्यूत आहे. जातीची यंत्रणा चालवणाऱ्या वाहक घटकांपैकी हा एक आहे. शिक्षेपासून अभय मिळत असल्यामुळे हिंसक अथवा अहिंसक कृतीला मोकळीक मिळते. या प्रक्रियेत उत्तरदायित्वाची संकल्पना हरवून जाते. शिक्षेपासून अभय मिळणं हा प्रत्येक दडपशाहीचा मूलाधार आहे.

कर्तेपणाची संकल्पना समोर आली की, शिक्षेपासूनचं अभय आणि उत्तरदायित्व एकमेकांत विलीन होतात. दलित स्त्रीचं शरीर आपलं गुलाम आहे, असं मानून दडपशाही करणारा माणूस पुढे येतो; तेव्हा त्याला शिक्षेपासून अभय मिळणार असल्यामुळे त्या दलित स्त्रीच्या कर्तेपणाचं अवमूल्यन होतं. शिक्षेपासून अभय मिळणार असेल तर मूल्यात्मकता, नीतिमत्ता व वैधानिकता अशा तीन तत्त्वांद्वारे उत्तरदायित्वाने त्याचा प्रतिकार करायला हवा. सध्या ही तीन तत्त्वं अपराध्याच्या मनोवृत्तीविरोधात सक्रिय असल्यामुळे कुणीही उठून एखाद्या स्त्रीवर बलात्कार करू शकत नाही. पण जातिव्यवस्था उत्तरदायित्वाच्या या तीनही तत्त्वांचं अवमूल्यन करते– मी जातिव्यवस्था असं म्हणतो, तेव्हा त्यातून अस्पृश्यता अभिप्रेत आहे.

अस्पृश्यता म्हणजे शिक्षेपासून अभय देणारं सर्वोच्च स्थान आहे, विशेष म्हणजे सर्वाधिक असुरक्षित शरीरांना त्याची झळ जास्त बसते. जातिव्यवस्था सर्व दलित शरीरांना असुरक्षित करते. 'मी–टू' चळवळीमध्ये शिक्षेपासून अभय मिळण्याच्या संकल्पनेला उघडच आव्हान देण्यात आलं होतं, अगदी नजरेच्या पातळीवरही हे आव्हान दिलं गेलं. नीतिमत्ता, मूल्यात्मकता नि वैधानिकता या उत्तरदायित्वाच्या तीन तत्त्वांद्वारे जातिव्यवस्थेमध्ये रूढ झालेल्या गोष्टींना उत्तरदायी ठरवणं शक्य आहे.

आपण भारताच्या संदर्भात बोलतो तेव्हा 'मी–टू' चळवळीने परंपरेला– विशेषतः या सर्व आविष्कारांना जन्म देणाऱ्या परंपरेला– आव्हान द्यायला हवं. दुर्गापूजेची कथा हे भारतातील 'मी–टू' चळवळीचं आद्यरूप आहे. प्रभुत्वशाली जातीमधल्या स्त्रीने दलित, आदिवासी किंवा असुर माणसाची हत्या करणं. अस्पृश्यतेसंदर्भातील कित्येक अपराधांना शिक्षेपासून अभय मिळतं आणि अशा घटनांच्या दस्तावेजीकरणाबाबत प्रचंड ऐतिहासिक पोकळी आहे; पण ते जाणून घेण्यात 'मी–टू' चळवळीतल्या वरील विचारसरणी मानणाऱ्या हॅशटॅगकर्त्यांना रस नाही. या ऐतिहासिक पोकळीसोबतच कर्तेपणाचीही पोकळी आहे. भारतातल्या 'मी–टू' चळवळीने याचा विचार केलेला नाही. (मी–टू चळवळीचा भाग असलेल्या) स्त्रियांच्या अनुभवांना मी कमी लेखतो, असा याचा अर्थ नाही. पण त्यात स्वतःच्या कृतीविषयी जागरूकता नसेल, तर (जातीमध्ये रुजलेली) सत्तेची उतरंड कायम राहील.

## चार
## दलित चित्रपट

**प्रश्न –** दलित चित्रपट महोत्सवाचा[१३] प्रकल्प तुम्ही का हाती घेतला? हा महोत्सव अमेरिकेत, न्यूयॉर्कमध्ये आयोजित करायचं का ठरवलं?

– मी द्यू बोय यांच्याविषयीच्या कॉर्नल वेस्ट यांच्या व्याख्यानांना २०१६ च्या संपूर्ण सहामाहीमध्ये जात होतो. तेव्हा एकदा असं कळलं की, द्यू बोय यांनी 'द स्टार ऑफ इथिओपिया'[१४] या एका शोभायात्रेचं आयोजन केलं होतं. त्यात त्यांनी काळ्या किंवा आफ्रिकी संस्कृतीच्या उगमाचं सादरीकरण केलं होतं. उपस्थितांना त्यातून इथिओपिया, सुदान, झिम्बाब्वे नि इजिप्त अशा देशांची झलक पाहायला मिळाली. काळ्या सभ्यतेच्या संपन्नतेचा मागोवा घेण्यासंदर्भातही त्यांनी त्यांच्या पुस्तकात लिहिलं आहे. अभिनवता व सर्जन नसलेल्या गोऱ्या वासाहतिक लोकांच्या सुमार प्रमाणकांनी आमचं मूल्यमापन करू नका, हे सांगणं असं एक कारण यामागे होते. आपण स्वतःला गोऱ्यांच्या नजरेमध्ये मर्यादित करून ठेवलं, तर यातल्या काही समस्यांपासून आपल्याला मुक्त होता येणार नाही.




त्यांना ऐतिहासिक मिथकांचा सखोल वेध घेऊन काळ्या लोकांच्या अस्तित्वाचा कालानुक्रम स्पष्ट करायचा होता. प्रागैतिहासिक काळ्या माणसांनी जगाला लोखंड वितळवून जोडायची भेट दिली, असा उल्लेख त्यांनी केला होता.

ड्यू बोय यांनी त्यांच्या आयुष्यात तीन चरित्रं लिहिली. दुसऱ्या चरित्रामध्ये त्यांनी 'द स्टार ऑफ इथिओपिया'च्या आयोजनातील अनुभवावर चिंतन केलेलं आहे. ते मंचाकडे पाहतात, तेव्हा त्यांना भावनिक कल्लोळ जाणवतो आणि मंचावर काळ्या स्त्रिया चालताना पाहून त्यांना अभिमान वाटतो, हे मी वाचलं; तेव्हाच मी म्हटलं, 'डॅम!!' तर, दलित चित्रपट महोत्सवाची कल्पना मला अशी सुचली. महोत्सवाच्या सुरुवातीला मी याचा उल्लेखही केला होता.

ड्यू बोय यांच्यासारखीच माझी योजना होती. दलित कलेला दाद दिली जावी, अशी माझी इच्छा होती. कारण, अनेकदा दलित कलेला दाद दिली जाण्याऐवजी तिचा अपहार केला जातो. अपहार करणाऱ्या अनेकांना ते दाद देत आहेत असं वाटतं, पण प्रत्यक्षात तसं नसतं. दलित सौंदर्य व दलित प्रतिभेला हवासा वाटणारा मंच मिळवून देणं, हा एक भाग होता. मी फक्त ही संकल्पना मांडून मंच उपलब्ध करून दिला. प्रेक्षक आले. कार्यक्रमावेळी स्वयंसेवकांनी केलेल्या मदतीचा उल्लेख करायलाच हवा.

भारतातल्या अतिशय गुणवान आणि कौतुकास पात्र चित्रपटकर्त्यांना आम्ही मंच दिला. भारतामधील प्रादेशिक सीमा आणि प्रादेशिकतावादामुळे अनेकांना या व्यक्तींचं काम पाहता येत नाही, पण भारतात दलित सर्वत्र आहेत. देशात कुठेही गेलं तरी दलित दिसतातच आणि ते समान मूल्यांबद्दल बोलत असतात. उदाहरणार्थ– तुमच्या (शौना यांच्या) कर्नाटकमध्ये मरिअम्मा आणि पोचअम्मा आहेत. आमच्याकडे (महाराष्ट्रात) मरिआई, पोचाई यासारख्याच नावाने वेगळ्या देवता आहेत. अम्मा आणि आई या दोन्हींचा अर्थ सारखाच आहे. आपल्याला जोडणारे अतिशय सूक्ष्म धागे आहेत. सिनेमाच्या बाबतीत बोलायचं तर, तमिळ सिनेमा भरभराटीला आलेला आहे पण तमिळनाडूबाहेरचे खूप कमी लोक प्रत्यक्षात तमिळ सिनेमा पाहतात किंवा ग्रहण करतात. अर्थात, खासकरून उत्तरभारतीय प्रेक्षकांसाठी तयार केलेला किंवा डब केलेला चित्रपट याला अपवाद ठरेल. अशात पा. रंजीतसारखा दिग्दर्शक येतो आणि एक चित्रपट बनवतो अन् धमाका होतो! माझ्या मूळ शहरात, नांदेडमध्ये तरुणांनी रंजीतच्या चित्रपटांचे डिस्प्ले पिक्चर लावलेले आहेत. तसंच नागराज मंजुळे यांनी केलेला चित्रपट भाषिक राज्यांच्या सीमा ओलांडून गेला. तमिळनाडू, तेलंगण, केरळ नि उत्तर भारत अशा ठिकाणीही लोकांनी तोंडात बोटं घातली!

याचा अर्थ, सर्व प्रकारच्या सीमा ओलांडून जायचं सामर्थ्य या कलेमध्ये आहे. केवळ भाषिक नि भौगोलिक सीमा नव्हे, तर स्वतःच्या ऐतिहासिक सीमांपलीकडेदेखील ही कला जाऊ शकते. या अनुभवांकडे पाहिल्यावर मग ड्यू बोय यांनी त्यांच्या शोभायात्रेकडे कसं पाहिलं याचा विचार मला करायचा होता.

हार्वर्डमध्ये इंडिया कॉन्फरन्स या प्रतिष्ठित परिषदेमध्ये एका परिसंवादाचं आयोजन मी केलं, तेव्हा दलित चित्रपट महोत्सवही झाला. तेव्हा मला दिसलं की, ही सर्व मंडळी स्टार होती. प्रत्येकाला त्यांच्यासोबत फोटो काढायचे होते! आणि एक लक्षात घ्या– पा.रंजित तमिळ बोलतात, नागराज मंजुळे मराठी नि हिंदी बोलतात, निहारिका सिंग इंग्रजी बोलतात. तर, तीन भिन्न जातींमधल्या तीन भिन्न भाषा असलेल्या तीन भिन्न व्यक्ती तिथे आलेल्या होत्या, पण त्यांची आपापल्या समुदायाशी बांधिलकी होती. हेच त्यातलं सौंदर्य होतं.

दलित वस्त्यांमध्ये किती अभिनवता आणि

सर्जनशीलता अस्तित्वात आहे, हे लक्षात यावं यासाठी मी हा मुद्दा मांडतोय. त्यांची दखल घेतली जात नाही. जगातल्या आणि न्यूयॉर्कमधल्या लोकांना हे कळावं, असं मला वाटत होतं. अगदी वेस्ट कोस्टहून आणि कॅनडाहूनदेखील लोक या महोत्सवासाठी आले होते. आफ्रिकी चित्रपट, ब्लॅक चित्रपट यांसारखा दलित चित्रपट हा एक जाँन्र प्रस्थापित केल्यानंतर आम्ही हा महोत्सव वार्षिक स्तरावर आयोजित करू किंवा किमान दोन वर्षांतून एकदा या कार्यक्रमाचं आयोजन करू.

मला आंतरराष्ट्रीय दलित साहित्य संमेलनाचंही आयोजन करायचं आहे, भारतातल्या वेगवेगळ्या राज्यांतून लोकांना तिथे निमंत्रित करायचं आहे. प्रत्येक राज्याची अचंबित करणारी दलित साहित्यपरंपरा आहे. याबद्दल अधिकाधिक जाणून घेतल्यावर अशा परंपरांची व्याप्ती बघून मला दबून जायला होतं. मानवी भावनांवरची पकड आणि ते व्यक्त करण्यामधील प्रवाहीपण, हे दोन्ही एकाच वेळी जडही आहे आणि हलकंही आहे. बिगरइंग्रजी दलित साहित्याचं सौंदर्य यातच आहे. आंतरराष्ट्रीय दलित साहित्य संमेलनाद्वारे काही प्रकाशनाचे उपक्रम सुरू करायचाही माझा मानस आहे. त्यात विविध लोकांचं लेखन आम्ही इंग्रजीत भाषांतरित करून घेऊ आणि जगभरात ते लेखन पसरेल. कॅनडामध्ये किंवा इतर कुठे आमचं प्रकाशन असेल आणि भाषांतराचा प्रकल्प आम्ही हाती घेतला, तर जगाला त्या लेखनाबद्दल कळेल. साहित्यिक राजकारण अशा प्रकारचं आहे. यात आपण जाडजूड पुस्तकंच भाषांतरित करायला हवीत असं नाही, तर छोटेखानी निबंधही त्यात भाषांतरित व्हावेत. साहित्यिक आणि कलाविश्वासाठी पुरस्कारही सुरू करायची माझी इच्छा आहे. दलित लेखक नि कलावंतांना त्यांच्या विलक्षण कौशल्यांसाठी पुरस्कृत करताना आम्हाला आनंद होईल. विरोधी छावण्यांच्या बाणांपासून ते स्वतःच्या समुदायाचं रक्षण करत आहेत.

**प्रश्न –** दलित चित्रपटांनी लोकप्रिय नजर गोंधळते किंवा बुचकळ्यात पडते, हे कळण्याजोगं आहे; पण बहुजन किंवा दलित प्रेक्षकत्व असं ज्याला संबोधलं जातं, त्याचं काय करायचं? [१५]

– हे पाहा, चित्रपटांच्या तंत्रज्ञानाकडे मी वॉल्टर बेंन्यामिनच्या चौकटीतून पाहतो. चलत्-चित्रपटांच्या बाबतीत बेंन्यामिनचं वाङ्मय अतिशय व्यामिश्र आणि त्याच वेळी अतिशय साधंही असल्याचं दिसतं. चलत्-चित्रपट किंवा मोशन पिक्चर हा एके काळी समुदायाचा अनुभव असायचा, पण आता तो वैयक्तिक अनुभव झाल्याचं दिसतं आहे– विशेषतः लोक लॅपटॉप/फोन वापरून असे चित्रपट पाहतात, त्यामुळे चित्रपटांची सामुदायिक तर्कचौकट बदलून गेली. मला आठवतंय की, नव्वदच्या दशकात आम्ही कुटुंबातले सगळे लोक डबे घेऊन चित्रपट बघायला जायचो, सोबत नेलेलं खायचो. दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये आत्त्या, काका, चुलत-आत्ते-मामे भावंडं असे सगळे असायचे. मजा करण्यासाठी स्थानिक चित्रपटगृहाची तिकिटं काढली जात होती.

बहुजन प्रेक्षकत्वाचं सत्ताशास्त्र प्रस्थापित झालेलं नसल्यामुळे मी याला बहुजन प्रेक्षकत्व असं संबोधणार नाही. हा राजकीय रीतीने बोलण्याचा प्रकार आहे. कारण आपण बहुजनांबद्दल बोलत असलो, तर त्यात शूद्रही येतात आणि ते प्रादेशिक तसंच राष्ट्रीय चित्रपट उद्योगावर प्रभुत्व गाजवत आहेत. उदाहरणार्थ– आंध्र प्रदेशात किंवा तमिळनाडूत किंवा महाराष्ट्रात शूद्र किंवा मी ज्यांना ओडीसी (अदर डॉमिनन्ट कास्ट्स : इतर प्रभुत्वशाली जाती) असं संबोधतो, ते समूह आर्थिक दृष्ट्या ब्राह्मणी कार्यक्रमाच्या पायऱ्या चढत गेले आहेत. त्यांना स्वतःच्या मानहानिकारक भूतकाळाविषयी माहिती आहे, त्यामुळे ते याचा प्रतिकार करण्याचा मार्गही शोधू पाहत असतात. प्रादेशिक अवकाशात निर्माण झालेले अनेक जातविरोधी चित्रपट याच जाणिवेची निष्पत्ती आहेत.

गरीब, कष्टकरी वर्गातल्या दलितांच्या प्रेक्षकत्वाविषयी मला बोलायचं असेल तर, एक ॲकॅडमिक प्रतिपादन म्हणून असं म्हणता येतं की– या प्रेक्षकवर्गाकडे येणाऱ्या विचारांना पडद्याने चाळणी लावलेली असते. शेवटी चित्रपटाचं तर्कशास्त्र एकतर्फी असतं– तुम्ही पडद्याशी उलट बोलू शकत नाही. 'झूम' ॲपचा वापर केल्या जाणाऱ्या आजच्या जगात हे बदलतं असू शकतं, त्यात परस्परांशी देवाण-घेवाण करणारा चित्रपट असणं शक्य आहे. पण अन्यथा, आहे हे असं आहे. दलित प्रेक्षकत्वाबद्दल नागराज मंजुळे यांनी अतिशय चांगला मुद्दा मांडला होता. मोठ्या पडद्यावर अँग्री यंग मॅनच्या रूपातला अमिताभ बच्चन दिसायचा तेव्हा त्यात आपल्याला दलित दिसायचा, असं मंजुळे म्हणाले. शेवटी, झोपडपट्टीत राहणारे, 'विजय' असं नाव असणारे टॅक्सीचालक कोण आहेत? आमच्या वस्तीत कोणी तरी 'संजय' नावाचा माणूस असायचाच– आणि

आम्ही त्याला 'संजय दत्त' म्हणायचो किंवा कोणी तरी 'विजय' असायचा आणि आम्ही त्याला 'विजय चौहान' म्हणायचो. चित्रपटांमधल्या पात्रांच्या नावांवरून हे व्हायचं.

कष्टकरी, खडतर जीवन जगणाऱ्या जनतेला चित्रपटांमधून काहीएक आश्वस्तता पुरवणारा आवश्यक घटक म्हणून चित्रपटांचं स्थान होतं. दडपलेल्या समुदायाच्या भावनिक संयोगांची पुरेशी दखल घेतली जात नाही. त्यांच्या भावनांना मूल्य प्राप्त होत नाही. गरीब दलितांच्या अश्रूंची ओळख पटवण्यासाठीच्या चौकटी आपल्याकडे नाहीत. आपण दलितांचे अश्रू कसे ओळखायचे? ते भावनेतून आलेले असतात, आघातातून आलेले असतात की दडपलेल्या आकांक्षांमुळे आलेले असतात? याकडे पाहण्याचे वेगवेगळे मार्ग कोणते?

पडद्यावरून आलेल्या संकल्पना परिष्कृत केल्या जातात आणि भावनांची ही प्रक्रिया कशी पार पडते, यावरून प्रेक्षकत्वाला आकार मिळतो. पण चित्रपटामध्ये दाखवलेलं सगळं काही दलितांनी ग्रहण केलेलं नाही. त्यांनी त्यांच्या सोईने जे काही पाहिलं, ते आत्मसात केलं. मी एक उदाहरण देतो : हृतिक रोशन चित्रपटांमध्ये काम करू लागला, तेव्हा- म्हणजे १९९० च्या दशकाअखेरीला, २००० च्या आरंभी प्रचंड लोकप्रिय झाला होता. माझ्या दलित वस्तीमधले- घेट्टोतले- मित्र त्याला दलित मानत असत. कारण त्याचं आडनाव जोशी, दीक्षित किंवा पांडे अशांपैकी नव्हतं. 'तो हृतिक रोशन आहे, म्हणजे तो दलितच असेल' असं माझा एक मित्र म्हणाला होता. गरीब घरातून आलेला एक देखणा पुरुष- जो लाजरा आहे, पण निग्रही आहे- असं ते पात्र होतं. माझ्या दलित मित्रासाठी अशी व्यक्ती दलित असणंच शक्य होतं. याचा अर्थ असा की, दलित प्रेक्षकवर्गाने ही स्मृती स्वतःची मानली आहे.

या चित्रपटांमध्ये विनोदी प्रसंगही आहेत- सर्वसाधारणतः गडद रंग असलेल्या, फारशा देखण्या नसलेल्या पात्रांचा समावेश या प्रसंगांमध्ये होतो. गोऱ्या कातडीने ग्रासलेल्या चित्रपटांमध्ये ही अशी व्यंगं चित्रित केली जातात. अशा व्यक्तींशी आम्हाला लगेच जवळीक वाटायची, त्यामुळे आमच्या घरांमध्ये या प्रसंगांसारखा अभिनय केला जायचा. जॉन लिव्हर दलित आहेत आणि आम्हाला त्यांचा अभिनय लगेच आपलासा वाटायचा, आम्ही त्यांच्या संवादांची उजळणी करायचो. आमच्या दैनंदिन जीवनामध्ये जगण्यासाठी जे काही आवश्यक असेल, ते आम्ही घेतलं.

चित्रपट म्हणजे केवळ मनोरंजन नसतं, अनेकदा अपमानाने भरलेलं मनोरंजन त्यात असतं. दोनेक वर्षांपूर्वी मी दलित सिनेमावर[१६] एक लेख लिहिला होता. लेखानंतर मी केलेल्या निरीक्षणानुसार, समाजमाध्यमांवरच्या विविध पानांवर विशिष्ट प्रसंगांचा अर्थ लावला जाऊ लागला आणि त्यातून जातीची समस्या कशी दिसते, हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न होत होता. जात इतकी दृश्यमान आहे, तरीही ती चाळणीतून बाजूला काढली जाते; पण दलितांची या वस्तुस्थितीबाबत कधीही गैरसमजूत झालेली नव्हती. मात्र, ते कायम थेट उल्लेखांच्या शोधात होते- उदाहरणार्थ, आंबेडकरांचा उल्लेख. 'जुडवा'मध्ये सलमान खानचं एक अतिशय लोकप्रिय गाणं होतं- ईस्ट ऑर वेस्ट, इंडिया इज द बेस्ट... तर त्या गाण्यात 'बाबा आंबेडकर वाह वाह!' अशी एक ओळ आहे. मला हे गाणं इतकं का आठवतं? कारण, त्यात तो 'बाबा आंबेडकर- वाह वाह!' असं म्हणतो. यातून आम्हाला किती आत्मविश्वास मिळत होता, याची कल्पना तुम्ही करू शकाल का? त्यामुळे दलितांमध्ये सलमान खान लोकप्रिय झाला. बुधवारी संध्याकाळी दूरदर्शन वाहिनीवर 'चित्रहार' हा अर्ध्या तासाचा गाण्यांचा कार्यक्रम लागायचा. तिथे हे प्रचंड लोकप्रिय गाणं लागेल हे आम्हाला माहीत होतं, त्यामुळे ही वेळ आम्ही चुकवायचो नाही. या संपूर्ण गाण्यात आमच्या अभिमानाचा क्षण कधी येतो, ते आम्हाला माहीत होतं- 'बाबा आंबेडकर' असा उल्लेख येतो तो क्षण आमचा होता. लाखो दलित या दोन सेकंदांच्या उल्लेखाचा आनंद व्यक्त करतायत, याची कल्पना करून पाहा.

आजही दलित विवाह किंवा खासगी अवकाशातील कहाण्या पडद्यावर दिसत नाहीत. दलितांचं जीवन एक तर आंबेडकरांच्या वाटेने किंवा फुल्यांच्या वाटेने दाखवलं जातं. त्यांच्याव्यतिरिक्त दलितांचं अस्तित्व राहत नाही. त्यामुळे आम्हाला उपलब्ध असलेल्या सांस्कृतिक वाटा दलित चित्रपटांमधून जाणाऱ्या असतील. प्रेक्षकत्वाचा संपूर्ण प्रश्न अशा रीतीने पाहायला हवा.

**प्रश्न –** संशोधन आणि राजकारण या दोन्हींकडे जातीच्या दृष्टिकोनातून कसं बघायचं, या मध्यवर्ती प्रश्नाद्वारे ही सुटी-सुटी मुलाखत एकसंध झालीय, असं मला वाटतं. जातीसंदर्भातील गोंधळ आणि तिची सूक्ष्म पण सर्वव्यापी कार्यरत असलेली रूपं भारतातल्या राजकीय

ज्ञाननिर्मितीमधली ब्राह्मणी रचना कशी टिकवून ठेवतात?

– त्यामुळे जातीची संवेदना अतिशय वैयक्तिक असते. लोकांना जातीचा अभ्यास करावासा वाटू शकतो, पण त्यांना स्वतःच्या जातीबद्दल बोलायचं नसतं. गोंधळ माजवण्याचा प्रकल्प पूर्णतः वसाहतोत्तर आहे. भारताच्या स्वातंत्र्यानंतर चार दशकं अभ्यासविश्वाने जाति–व्यवस्थेविषयी गोंधळ माजवायचं काम केलं. हेच लोक अमेरिकी ॲकॅडमिक विश्वामध्ये काम करतात. या सगळ्यामुळे दलित पूर्णतः अप्रस्तुत ठरले आणि केवळ व्यवस्थेने पिडलेले म्हणूनच त्यांची प्रस्तुतता उरली. पण दलित याहून अधिक काही आहेत. दलित असणं काळाच्या मालकीशी संबंधित आहे. दलित भविष्य ठरवतात.

त्यामुळेच हिंदू–मुस्लिम विभाजनासंदर्भात दलित किंवा जातीय दृष्टिकोनाबाबत लोक नाराज होतात, कारण त्यांना एखादा संपूर्ण दृष्टिकोन स्वतःच्या अभ्यासाच्या उभारणीसाठी वापरायचा असतो. भारतातल्या इतक्या शतकांच्या मुस्लिम सत्तेचा अभ्यास तुम्ही करत असाल, तर या सत्ताधाऱ्यांनी अस्पृश्यता नष्ट का केली नाही, हा प्रश्न विचारणं प्रस्तुत ठरणारच आहे. त्यांनी दलितांना संपन्न होण्यासाठी अधिक संधी का निर्माण केल्या नाहीत? भारतीय इतिहासाविषयीच्या मुघल किंवा अफगाणी किंवा तुर्की वृत्तान्तांमधून एकही ठळक दलित नाव का समोर येत नाही? जमातवाद ही जातिव्यवस्थाच आहे– हा युक्तिवाद करणारा मी काही पहिला नव्हे. दिलीप मेनन यांनी [१७] आणि इतरही अनेकांनी हा युक्तिवाद केला आहे. मी केवळ ते नव्याने मांडतो आहे. मी मुस्लिमविरोधी नाही. मी हिंदूविरोधी नाही. आधीचे प्रश्न नव्या प्रश्नांद्वारे अग्रक्रमावर आणणं, एवढाच माझा उद्देश आहे. हे मी नांदेडमध्ये बोललो असतो, तर कोणीही माझं ऐकलं नसतं. पण आता मी हे बोलतोय.

मी स्वतःवरची टीकाही स्वतःच निर्माण करेन. जात हा प्रस्तुत ठरणारा घटक आहे. तुम्ही दलित नायक का निर्माण केला नाहीत? 'आम्हाला भारतातल्या दडपशाहीविरोधात लढायचं आहे' असं लोक म्हणतात; तेव्हा मी विचारतो, 'कोणाच्या दडपशाहीविरोधात लढायचंय? आणि तुम्हाला का लढायचंय?' हे अतिशय महत्त्वाचं आहे. जाणीवपूर्वक गोंधळात टाकलेल्या क्षेत्राचा ताबा घेण्यासाठी आता आमच्यासारखे लोक पुढे येत आहेत आणि हा प्रवास अतिशय अवघड होता. मी स्वतःचं पुनरुज्जीवन साधू नये, असं तुम्हाला वाटतं का? मी स्वतःची मुक्ती साधू नये, असं तुम्हाला वाटतं का? शिक्षण, स्वतःचा सूर, सौंदर्य, बुद्धिमत्ता या सगळ्या सामर्थ्यानिशी, तुम्ही म्हणाल त्या अटीची पूर्तता करत मी आता सज्ज झालोय; तर तुम्हाला माझ्याकडून हे स्थान हिरावून घ्यायचंय का? तुम्ही मला खाली खेचू पाहताय का?

अनुवाद : प्रभाकर पानवलकर

**सूरज येंगडे,** अमेरिका

suraj.yengde@gmail.com

**टिपा :**

10. https://www.indiaresists.com/the-a-to-z-of-uapa-a-concerned-citizens-guide-to-uapa/

11. https://www.scribd.com/document/459802700/The---to-Z-of-U-P----Concerned-Citizen-s-Guide-to-U-P-fromšembed

12. ह्युमन राइट्स वॉचचा Ahdmb- https://www.hrw.org/reports/1999/india/India994-08.htm

13. https://www.dalitfilmfest.com/

14. http://scua.library.umass.edu/duboisopedia/doku.php?id=about:staršofšethiopia

15. Indian Cinema and the Bahujan Spectatorship- Jyoti Nisha, EPW, 16 May 2020, https://www.epw.in/engage/article/indian-cinema-and-bahujan-spectatorship

16. https://www.tandfonline.com/doi/abs/10.1080/00856401.2018.1471848?journalCode=csas20

17. The Blindness of Insight: Essays on Caste in Modern India- Dilip M. Menon, Navayana, https://navayana.org/products/the-blindness-of-insight/?v=7516fd43adaa

('बॉर्डरलाइन्स' या संकेतस्थळावर २३ नोव्हेंबर २०२० रोजी प्रकाशित झालेल्या **शौना रॉड्रीग्ज** यांनी घेतलेल्या मुलाखतीचं हे मराठी भाषांतर आहे. इंग्रजीतील मुलाखतीचा दुवा : https://www.borderlines-cssaame.org/posts/2020/11/23/dalit-is-the-new-political-and-epistemic-horizon-an-interview-with-suraj-yengde.)

संजीवनी खेर

# गुमनाम है कोई...

ज्या संस्कृतीत ती लहानाची मोठी झाली, त्यात मोठ्या आवाजात बोलणंदेखील असभ्यता मानली जाई; तिथं स्त्रीने मोठमोठ्या सभांमध्ये तावातावाने मुद्दा पटवून देणं, ही कल्पना करणंसुद्धा अवघड होतं. खुर्शिदबेनने आपल्या मोठ्या बहिणींबरोबर आरएसेस संस्था सुरू केली. तिच्यावर बंदी आली म्हणून देशसेविका संघ सुरू केला त्यावरही बंदी आली. त्यानंतर गांधीसेवा सेना सुरू केली. स्त्रियांत साक्षरता-प्रसार, विदेशी मालावर बहिष्कार, दारूच्या दुकानासमोर निदर्शनं करण्यात ती पुढाकार घेत असे. ब्रिटिशांची धोरणं अन्यायकारक असत. तुरुंगात उच्च वर्गातील राजकीय कैद्यांसमवेत गुन्हेगारी वृत्तीच्या, वेश्या, कुष्ठरोगी स्त्रियांना ठेवत असत. लहान-सहान गोष्टींवरून कैद होई. लाहोर खटल्यानंतर भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांना फाशीची शिक्षा झाली. या खटल्यानंतर मुंबईत स्त्रियांनी एक भव्य मोर्चा काढला होता.

झपाटल्यासारखे काम करणारी, पाश्चात्त्य संगीताचे रीतसर शिक्षण घेऊन त्यात प्रावीण्य मिळवलेली गर्भश्रीमंत घराण्यातील खुर्शिद नौरोजी. गांधींजींच्या अनेक सेक्रेटरींपैकी एक बनली. सरहद गांधी अब्दुलगफार खान यांच्यासमवेत काम केलेल्या ह्या तरुणीबद्दल कुठेच फारशी माहिती उपलब्ध नाही. साऊथ कॅरोलिना विद्यापीठातील इतिहासतज्ज्ञ विद्वान डॉ. दिनियार पटेल यांनी त्या काळची वृत्तपत्रं चाळली, अनेकांना भेटले, परंतु त्यांनाही फारशी माहिती कळली नाही. या धाडसी कर्तबगार तरुणीच्या कामाबद्दल त्यांनी गांधी भवनमध्ये एक भाषण दिले होते. त्यावरून मी त्यांना मेल लिहिली होती. त्या उत्तरादाखल त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या वृत्तपत्रांची कात्रणे मला मेल केली. मुंबईत प्रतिष्ठित पारशी विद्वानांकडेदेखील मी विचारणा केली. सर्वांनी तिचे नाव ऐकले होते, पण तिचा फोटो वा अधिक माहिती मिळाली नाही. पण खुर्शिद नौरोजी मला चकवत, खुणावत राहिली.

मुळात ती आणि तिच्या तिघी बहिणी क्रांतिकारकांच्या विचारांच्या होत्या. तिच्या मोठ्या तिघी बहिणींनी वकिलीत असलेल्या तीन सख्ख्या कॅप्टन बंधूंशी विवाह केला होता. तिघी कायदा मोडायचं, तर नवरे कायदेशीर खटल्यांचे काम करीत असत. गोशी, पेरिन आणि नर्गिस या तिघींचा गांधीजी, जवाहरलाल आणि वल्लभभाई यांच्याशी निकटचा संबंध होता. त्यांच्या हिवाळी बंगल्यांवर-पाचगणी, हिमाचल येथील बंगल्यांवर सभा होत. ही मंडळी विश्रांतीसाठी तिथे मुक्काम करीत. नौरोजींचा मुलगा अर्देसर हा अचानक वारला, तेव्हा त्यांच्या सुनेला सात मुलं होती नि ती आठव्यांदा गरोदर होती. नौरोजी घराणे केवळ धनाढ्यच नव्हते, तर अत्यंत आधुनिक विचारांचे होते. ह्या सुनेला त्यांनी गुजरातच्या राजघराण्यातील स्त्रिया आणि मुलं-मुली यांच्या शिक्षणासाठी काम पाहायला सांगितले. नौरोजींचा आणि राजघराण्यातील लोकांचा चांगलाच

घरोबा होता. त्या वेळी राजघराण्यातील स्त्रिया बाहेर जाताना पडदा पाळत असत. त्यामुळे या पारशी घरातील स्त्रीच्या सहवासातल्या स्त्रिया जगाची माहिती घेत ते जाणत असत.

गोशी, पेरिन आणि नर्गिस यांना आरंभीच्या क्रांतिकारकांच्या कामाचे खूप आकर्षण होते. कायदा मोडल्याच्या कारणाने तुरुंगाच्या वाऱ्या करणाऱ्या या अभिजन स्त्रियांचा वीर सावरकर, मा.कामा यांच्याशी परिचय झाला होता. पण नंतर त्यांनी गांधीजींच्या कामात स्वत:ला झोकून दिले. खुर्शिद ही तर इतर बहिणींसारखी चांगलीच तापट होती. पण सार्वजनिक कामात गेल्यावर ती बरीच शांतपणे काम करू लागली. गांधींचे म्हणणे होते की, ‘एव्हरिथिंग इज फेअर इन लव्ह अँड वार’ हे योग्य नाही; कारण प्रेमात नि युद्धात जर वाटेल त्या मार्गाने ध्येय साध्य केले, तर त्यानंतर आपण कुठल्या नैतिकतेने पुढे जायचे? मूळ पायाच चुकीचा असेल. तेव्हा साधनंही स्वच्छ असायला हवीत.

खुर्शिदबेन ही अत्यंत सृजनशील कामात मग्न असे– मग ते खादीचे असो, पिकेटिंगचे असो वा तुरुंगवासात गुलाबाची बाग फुलवायची असो. त्या काळात उषाबेन मेहता या गांधी स्मारक निधीच्या प्रमुख होत्या. त्यांनी खुर्शिदच्या आठवणी सांगताना म्हटले आहे की, तिला बागकामाची आवड होती. आजोबांचे तेज तिच्या वागण्या-बोलण्यात होते. प्रा. अलु दस्तुर म्हणाल्या होत्या की, खुर्शिदबेनची राहणी ब्रिटिश पद्धतीची होती, पण वागण्यातून स्वदेशप्रेम उतू जात असे. तुरुंगात ब्रिटिश अधिकारी जाणून-बुजून अनेक स्तरांतील स्त्रियांना एका ठिकाणी ठेवत असत. ही अत्यंत आधुनिक घरातली मुलगी, विलायतेत शिकलेली. तिचा पोषाख, वागणे अत्यंत अभिरुचीपूर्ण आणि बोलणेही मार्दवयुक्त होते. बराकीतील इतर स्त्रियांचे बोलणे, वागणे, बसणे, उठणे सारेच तिला अनोखे वाटे. त्यांच्याशी संवाद करणे तिला अवघड होते, पण तिने त्यावर विजय मिळवला. सामान्यांत कसे मिसळायचे याचे धडे तिला अशा सक्तीच्या सहवासातूनच मिळाले असणार.

तिच्या या अभिजन संस्कृतीतलाच एक महत्त्वाचा हिस्सा होता, तिचे पाश्चात्त्य संगीतातले प्रावीण्य. मला वाटतं, स्वातंत्र्यलढ्यातील कुठलीही स्त्रीसेनानी खुर्शिदबेनसारखी पाश्चात्त्य संगीतात प्रवीण नसेल. सरोजिनीजी भारतीय रवींद्र संगीतात बुडलेल्या असत. पण तरुण खुर्शीदचा आवाज, त्याची तीव्रता ही पाश्चात्त्य संगीताचे कार्यक्रम करायला योग्य होती. तिने मुंबईच्या कावजी जहांगीर (१९२५) सभागृहातील कार्यक्रमात वाहवा मिळवली होती. तिचे पियानोवादनही तिच्या वर्तुळात नावाजले जात होते. लेखन-वाचनाची तिला आवड होती, त्यात ती रमत असे. अशा या तरुणीने आपले आयुष्य ऐषोरामात, कलासंगीताचा आनंद घेत घालवले असते तर ती साहजिक गोष्ट ठरली असती. परंतु खादीसाठी, स्त्रियांच्या शिक्षणासाठी, दारूच्या दुकानासमोर निदर्शनं करण्यासाठी ते वाचावं, हे अकल्पनीय आहे.

ज्या संस्कृतीत ती लहानाची मोठी झाली, त्यात मोठ्या आवाजात बोलणंदेखील असभ्यता मानली जाई; तिथं स्त्रीने मोठमोठ्या सभांमध्ये तावातावाने मुद्दा पटवून देणं, ही कल्पना करणंसुद्धा अवघड होतं. खुर्शिदबेनने आपल्या मोठ्या बहिणींबरोबर आरएसेस संस्था सुरू केली. तिच्यावर बंदी आली म्हणून देशसेविका संघ सुरू केला त्यावरही बंदी आली. मग त्यांनी गांधीसेवा सेना सुरू केली. स्त्रियांत साक्षरता-प्रसार, विदेशी मालावर बहिष्कार, दारूच्या दुकानासमोर निदर्शनं करण्यात ती पुढाकार घेत असे.

ब्रिटिशांची धोरणं अन्यायकारक असत. तुरुंगात उच्च वर्गातील राजकीय कैद्यांसमवेत गुन्हेगारी वृत्तीच्या, वेश्या, कुष्ठरोगी स्त्रियांना ठेवत असत. लहान-सहान गोष्टींवरून कैद होई. लाहोर खटल्यानंतर भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांना फाशीची शिक्षा झाली होती. या कुप्रसिद्ध लाहोर खटल्यानंतर मुंबईत स्त्रियांनी एक भव्य मोर्चा काढला होता. काळे झेंडे हाती घेऊ या स्त्रिया भगतसिंगांच्या देशभक्तीचे गुणगान करीत त्यांच्या हौतात्म्याला मानवंदना देण्यासाठी सीपी टँक मैदानावर जमल्या होत्या. त्यात खुर्शिद नौरोजीचे भाषण खूपच प्रभावी झाले. भगतसिंगांच्या धैर्याचे, देशभक्तीचे आणि बलिदानाचे गुणगान करून त्यांची प्रखर देशभक्ती न विसरण्याचे आवाहन तिथे जमलेल्या स्त्रियांना केले. गांधीजींच्या अहिंसामाहात्म्यानेच आज इतक्या संख्येने स्त्रिया घराबाहेर पडून देशाला स्वतंत्र करायच्या विधायक चळवळीत आल्या आहेत. आपले सामर्थ्य आणि भगतसिंगांचे हौतात्म्य कधीही विसरू नका. साहजिकच चिथावणीखोर वक्तव्यासाठी त्या स्त्रियांना अटक झाली. तिने तुरुंगाच्या वाऱ्या अनेकदा केल्या होत्या.

तिची अटक गांधीजींना मुळीच पटली नव्हती. त्यांनी लोकांना कळवले होते की, ब्रिटिशांचे वागणे अन्यायकारक आहे. तिला ते फ्रंटियर प्रॉव्हिन्सेसमध्ये जाण्यापासून रोखू शकत नाहीत. तेथील पठाणांना युद्धप्रयत्नांपासून परावृत्त करणे हा खुर्शिदबेनचा उद्देशच नव्हता. लोकांना हे कळलेच पाहिजे की, तिच्याप्रमाणेच अनेकांना विनाआरोपपत्र ठेवता अटक केले गेले आहे. खुर्शिदबेनवरही आरोपपत्र ठेवलेले नाही. तेथे जाऊन लोकांना भेटणे, हा काही गुन्हा होऊ शकत नाही. युद्धाला विरोध हा ना काँग्रेस पक्षाचा, ना खुर्शिदबेनचा इरादा आहे. ब्रिटिश सत्ता एका तरुण निरपराध स्त्रीवर अन्याय करीत असताना आपण त्याचा विरोध केलाच पाहिजे.

खुर्शिदबेनने पठाणांच्या राज्यात जाताना सरकारला रीतसर कळवले होते की, ती बादशाहखानना भेटायला जात आहे. त्यांच्या बिरादरीला सुधारायचे त्यांचे जे प्रयत्न चालले आहेत, त्यात ती त्यांना मदत करू इच्छित होती. अनेक पठाण त्या भागात सामान्य जनतेत दहशत माजवत होते. लूटमार, लोकांना पळवून नेऊन खंडणी मागणे, श्रीमंतांना बळजोरीने लुटणे हा त्यांच्या चरितार्थाचा उद्योग होता. हे सारे थांबवण्यात सरकारला अपयश येत होते. गांधीजींच्या मार्गाने त्यांना सामोपचाराने सरळ-साध्या जीवनात आणायचा प्रयत्न ती करीत होती. खुद्द अब्दुलगफार खानसारखा सच्चा गांधीवादी नेता तिच्या कामाचं कौतुक करत होता. ते स्वत: अत्यंत साधेपणाने राहत. अत्यंत आक्रमक अशा पठाणांचे नेतृत्व करणे सोपे नव्हते. ते स्वत:ची कामं स्वत: करीत. स्वत:चा स्वयंपाक करणे, कपडे धुणे, हे त्यांचे नित्याचेच काम होते. ते तिला मार्गदर्शन करीत.

तेथील आदिवासी लोकांतही तिने गांधीजींच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी तीन महिने मुक्काम केला होता. तेथील सरकारी अधिकाऱ्यांना तिच्या सच्च्या हेतूंची खात्री होती. तिच्या सुरक्षेची ते काळजी घेत असत. पण सरकारने तिला फ्रंटियर प्रांतात काम करू देण्यासाठी जाऊ द्यायला नकार दिला. नव्हे, तिला कैद केले. तिच्यावर खटला चालवून तीन महिने तुरुंगवास किंवा १०० रुपये दंडाची शिक्षा दिली. तिने दंडाला नकार देऊन तुरुंगवासाची शिक्षा पत्करली.

तिने डेप्यु.सेक्रेटरी रिचर्ड टोटेनहॅमना दिल्लीला एक पत्र लिहिलं.

४ जाने १९४०

माननीय सर,

माझी सुटका होण्यापूर्वी मला एक पत्र मिळालं. त्याची भाषा माझ्यावर अन्याय करणारी नि अनुचित आहे. मी अटकेपूर्वी नॉर्थ-वेस्टर्न फ्रंटियरच्या बन्नू जिल्ह्यात लोकांना भेटत होते. मी पीर, मलिक, खान अशा वेगवेगळ्या स्तरांतल्या लोकांशी संवाद साधत होते. त्यांना अहिंसेचा, सामंजस्याने एकत्र राहण्याचा संदेश देत होते. ते लोकदेखील शांतपणे माझं भाषणं ऐकत असत. प्रश्न विचारत असत. तेथील दरोडेखोरांनाही मी सांगत होते की- चोऱ्या, दरोडे, अपहरण या मार्गांचा अवलंब सोडावा, हे भ्याडपणाचे लक्षण आहे. नि:शस्त्र स्त्रिया, मुले, माणसे यांना धमकावून, त्रास देऊन पैसा गोळा करण्याचा मार्ग सोडून त्यांनी सन्मार्गावर यावं. आपल्याच लोकांना छळणं, अमानवी रीतीने वागणं त्यांच्या पठाणी दिलदारीच्या परंपरेला शोभत नाही. मी तेथील हिंदूंना आवाहन केलं की, त्यांनीही आपल्या शेजाऱ्यांशी स्नेह जोडायचा, नातं जोडायचा प्रयत्न धाडसाने करावा. जवळीक साधावी. वास्तविक पठाणांची परंपरा दुबळ्यांना आधार-मदत देण्याची आहे. दरोडेखोरांपासून इतरांना वाचवण्यात सहभाग घ्यावा. स्त्रिया, मुले, दुबळी माणसे यांवर अत्याचार करण्यात काय पुरुषार्थ आहे? मी जे लिहितेय, त्यात काही असत्य आहे का याची खात्री तुम्ही तुमच्या अधिकाऱ्यांकडून करून घ्या. कारण माझ्या सर्व भाषाणांवेळी सीआयडीचे लोक हजर असतातच.

मी तिथून वालो तांग भागात निघाले, तेव्हा मी सरकारी आधिकाऱ्यांना रीतसर माहिती दिली होती. तेथे मी आदिवासींशी बोलायला ४ डिसेंबर ४० रोजी जात होते. तेथील पळवून नेलेल्या हिंदू स्त्रियांना, पुरुषांना सोडवायला जाताना मला अटक झाली. तुमच्या सीआयडीच्या लोकांना विचारून त्याची शहानिशा करून घ्या. माझ्या बोलण्या-वागण्यात ब्रिटिश सरकारविरोधात काही होते का? युद्धात भाग घेऊ नका, असं मी काही सांगितलं होतं का? मी तर माणुसकीच्या नात्यानेच लोकांनी वागावं यासाठी धडपडत होते. मला तेथे जाण्यापासून रोखू नये. मी जे लिहिलंय याहून तुमची माहिती काही विपरीत असेल तर सांगा. मी लिहिलंय त्यात काही खोटं असेल, तर मी शिक्षेला तयार आहे. तुमच्या उत्तराच्या अपेक्षेत-

**- के.अ.द. नौरोजी.**

पण सरकारने त्या पत्राला उत्तर दिले नाही. उलट, तिला तिथून थेट मुंबईला आणले गेलं नि तिथेही तिला मुंबई सोडून कुठेही जाता येणार नव्हते. तिने सरकारला पुन्हा आपल्यावरील अन्यायाविरुद्ध पत्र लिहिले.

'मला माझ्या अपराधाची काही कल्पना न देता अटक करणे, माझ्या पत्राला उत्तर न देणे हे सरकारला शोभत नाही. मला हे कळतंय की– सध्याच्या युद्धजन्य स्थितीत ब्रिटिश सत्तेला मी पूर्वोत्तर प्रदेशात जाऊ नये, असं वाटत असेल ते तर गैरसोईचे झालंय म्हणून माझं तिथे जाणं रोखणं मी समजू शकते. पण मला मुंबईला स्थानबद्ध करण्यामागे काय उद्दिष्ट आहे? यात माझ्या स्वातंत्र्याचा संकोच आहे. मला जर जुलैपर्यंत मोकळं केलं नाही तर मी हा बंदी हुकूम मोडणार आहे.

– **के.ए.डी. नौरोजी**'

त्यानंतर तिला मुंबई प्रेसिडेन्सी सोडून कुठे जाता येणार नाही, असे कळवले गेले. आता ती वर्ध्याला जाऊ शकत नव्हती. आजारी कमला नेहरूंना भेटायला अलाहाबादच्या हॉस्पिटलला जाऊ शकत नव्हती. ती ३१ जुलैपर्यंत वाट पाहत होती. तिने १ ऑगस्ट १९४१ रोजी बंदी तोडायच्या आधीच तिला येरवडा जेलमध्ये नेण्यात आलं. या साऱ्या घटना गांधीजींनी वर्तमानपत्रांना दिल्या आणि नौरोजींच्या नातीवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली होती. सरकार बधत तर नव्हतेच, पण अनेकांना विनाचौकशी–विनाआरोपत्रं अटकेत टाकलं जात होतं. सामान्यांचा रोष वाढत गेला. गांधीजींचे असहकार–अहिंसा यांना आव्हान मिळत राहिलं, पण निष्ठावानांनी अनाम राहूनही या कार्यात आपलं ठोस योगदान दिलंच.

खुर्शिदबेनबद्दल एवढीच माहिती मिळाली, ती मनाला छळत राहिली. तिच्याविषयीचा आदर गांधींनी व्यक्त केला, त्याहून अधिक काय व्यक्त करणार!!

(लेखमाला समाप्त)

**संजीवनी खेर,** मुंबई
sanjeevanikher@gmail.com
Ph. 9821411472, 02224141669

## १ जानेवारीपासून साधनाच्या वर्गणीत वाढ

साधना साप्ताहिकाचे वर्षभरात मिळून ४८ अंक प्रकाशित होतात, त्यात तीन दिवाळी अंक (बालकुमार, युवा, मुख्य) आणि अन्य पाच विशेषांक असतात. हे सर्व अंक दर आठवड्याला वर्गणीदार वाचकांना पोस्टाने पाठवले जातात. वर्षभरातील या घरपोच अंकांसाठी वार्षिक, द्वैवार्षिक व त्रैवार्षिक वर्गणी भरण्याची सोय असते. प्रत्येक दोन किंवा तीन वर्षांनंतर या वर्गणीत थोडी वाढ केली जाते. त्यामुळे १ जानेवारी २०२१ पासून साधनाची वार्षिक द्वैवार्षिक व त्रैवार्षिक वर्गणी अनुक्रमे ९०० रुपये, १८०० रुपये, २७०० रुपये अशी आहे. ही वर्गणी चेक, कॅश, बँक ट्रान्सफर इत्यादी मार्गाने भरता येते.

चेक पाठवणार असाल तर साधना साप्ताहिक या नावाने काढावा. बँक ट्रान्स्फर करणार असाल तर
**साधना साप्ताहिक,**
Savings account Number 60025586634 / IFSC M-HB0000001
Bank of Maharashtra, Bajirao road branch, Pune 411002.
वर्गणी पाठवताना किंवा बँकेत जमा केल्यावर, कृपया तुमचे नाव व पत्ता
आम्हाला फोन, SMS वा मेलद्वारे कळवा आणि त्यासोबत तुमचा फोन नंबर व e id सुद्धा...
आमचा पत्ता
**व्यवस्थापक, वितरण विभाग,**
साधना साप्ताहिक, ४३१, शनिवार पेठ, पुणे ४११०३०.
Ph. 020-24451724, Mob. 70282 57757 / weeklysadhanagmail.com


Today's good mood is brought to you by
monginis
Go ahead. Celebrate!
Get this Designer Ceramic Mug worth ₹200/- FREE*
BLOOM YOUR HAPPINESS WITH
monginis
*on purchase of 1.5 Kg & above Monginis Birthday Cake, Wedding Cake or Special Cake. T&C apply. Limited period offer.
Have you tried our latest items ?
New items launched every month
Prawns Rissois
Duet Choco Bix
Chicken Chops
Brownie Magic
Chocolate Croissant

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6 / 31-12-2023
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Registration No. PCW/080/ 2021-2023
Posted at PUNE PSO GPO 411001 / Every Monday / Date of Posting : 25-1-2021 / Date of Publication : 25-1-2021

## बॅरिस्टर नाथ पै यांच्या
## ५० व्या स्मृतिदिनी प्रकाशित झालेले नवे पुस्तक...




# बॅ. नाथ पै

लढवय्या देशभक्त । द्रष्टा लोकनेता
असामान्य संसदपटू

मूळ इंग्रजी पुस्तक : अदिती पै

मराठी अनुवाद : अनंत घोटगाळकर

पृष्ठे २३२ । किंमत २५० रुपये
सवलतीत २०० रुपये (ट.ख. वेगळा)

नाथांचा जीवनप्रवास मला निसर्गसुंदर कोंकणाची आठवण करून देतो. कोकणातील गूढ नागमोडी रस्त्यांवरून धोकादायक वळणे घेत, कधी चढ तर कधी उतार पार करत होणारा प्रवास आकर्षण आणि धास्तीने भारलेला असतो! नाथांचे जीवनही असेच होते. ते स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतात, शिक्षणात मोठी चमक दाखवतात, कायद्याच्या उच्च अभ्यासासाठी इंग्लंडमधील शिष्यवृत्ती मिळवतात. त्यांची कारकीर्द असे नवनवे वळसे घेत कळस गाठते. तिथून मग त्यांचे जीवन एक तीव्र वळण घेते. ते भारतात परत येतात, बेळगावहून विधानसभेची पहिली निवडणूक लढवतात, ती निवडणूक हरतात आणि बॅरिस्टर होण्यासाठी पुन्हा इंग्लंडला जातात. नियती परत त्यांना भारतात– या वेळी राजापुरात आणते आणि तिथून ते लोकसभेची निवडणूक लढवतात. त्यानंतर तीन लोकसभा निवडणुकांमध्ये ते सलग निवडून येतात आणि वयाच्या केवळ ४८ व्या वर्षी आपला कायमचा निरोप घेतात.

या पुस्तकात नाथांच्या छोटेखानी परंतु अत्यंत नाट्यपूर्ण घटनांनी भरलेल्या कारकिर्दीवर प्रकाश टाकला आहे. वेंगुर्ल्याच्या रमणीय दीपस्तंभाजवळ तासन्तास बसणारा हा मुलगा पुढे जाऊन देशातील सर्वाधिक वाखाणल्या गेलेल्या संसदपटूंपैकी एक बनतो आणि लोकनेता म्हणून गणला जातो.

– शरद पवार (प्रस्तावनेतून)

प्रकाशक
शैलेंद्र पै
वांद्रे (पूर्व), मुंबई–५१

मुख्य वितरक
साधना मीडिया सेंटर
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
Ph. 020 24459635
mediasadhana@gmail.com

also available at amazon.in